# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख १ माहे मार्च सन १८८० इसवी. अंक ९

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकांकडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

---

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळी पुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दसरे खेपेस | ०२ |

---

## नोटिस

कोंडाजी वल्दद झिंगराजी व उमाई मर्द झिंगराजी राऊत रहाणार मौजे वणोजे प्रगणें व तालुके मंगरूळपीर जिल्हे वाशीम यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचा वडील भाऊ आकाजी हा मरण पावला तेव्हां त्याची बायको ह्मणजे आमची भावजई नामे बायजा ही तुमची बहिण असल्यामुळें तुह्मी आपले घरीं चार दिवस घेऊन गेले तेव्हां तिचे अंगावरील डागिने तिजबरोबरच होते. नंतर ती एक वर्षांनीं आमचे एथें येऊन तिने आपले मेलेले पोराचे डागिने नेले व बैल नेला या सर्व इस्टेटीचे योगानें ती आपला उदर निर्वाद आपल्या अन्नें चालवीत असे. हल्लीं ती बायजा सुमार दोन तीन महिन्यांपूर्वीं मरण पावली. ती तुमचे गावीं व शेजारीं रहात असल्यामुळें व ती तुमची बहीण असल्यामुळें तिची सर्व जिनगी तुह्मी आपले घरीं नेली व ती जिनगी आह्मी तुह्मास दोन तीन वेळा मागावयास आलो असतां तुह्मी देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून ४ दिवसांचे आंत खालीं लिहिलेली जिनगी आमचे स्वाधीन करावी. कारण बायजा आजारी असतांही आह्मी आपला भाऊ राघोजी यास पाठविले होते व त्याच्याजवळ बायजानें आपले जवळ असलेले सामान सांगितलें होतें तें असें:—

सोनें सवा तोळा मुलाचे कानांतील दोन बाळ्या व नथ मिळून. कोपरवाळ्या वीस तोळे वजनाच्या चांदीच्या. ह्मैस एक रंग काळा गेले वर्षीं ४० रुपयास घेतलेली. ४० रुपये रोख. तंबाखू तीन मण. मिरच्या दोन मण. जवारी १४ मण. सरकी दहा मण. व शिवाय खाण्या पिण्याचीं भांडीं वगैरे.

येणेंप्रमाणें सामान मरण समयीं होतें तें तुह्मी आमचे परवानगीवाचून नेलें त्याचे आह्मी खरे वारस असल्यामुळें तुह्मास नेण्याचा अधिकार नाहीं करितां सदरी मुदतींत माल देऊन आमची पावती घ्यावी न दिल्यास फिर्याद करून या नोटिसीचे खर्चासुद्धां भरून घेऊ. कळावें तारीख २५ माहे फेब्रुवारीं सन १८८० इसवी.

( सही ) रायसिंग वल्दद भंगाजी देशमुख वस्ती जमकेश्वर प्रगणें पिंजर निशाणी खुद हातची.

---

## नोटिस.

गणू वल्दद गंगाजी बेलोकार रहाणार मौजे भालेगाव तालुके मलकापुर यासी पुंजाजी वल्दद जानजी हडम रहाणार मौजे अत्रद तालुके खामगाव याजकडून नोटिस देण्यांत येते अशी कीं, आमचे कन्येचें तुह्मासी लग्न होऊन सुमार १० वर्षे झालीं. प्रथम दोनतीन वर्षांत तह्मी पोरीची ने आण केली परंतु सुमार ७ वर्षांपासून तुह्माला रक्तपित्तीचा दर्द उमळला तेव्हांपासून आजवर पोरगी एकसारखी माझे घरीं आहे. तिजकरितां अन्नवस्त्राकरितां दरसाल ५० पन्नास रुपये प्रमाणें ३५० साडेतीनशें रुपये मला अधिक खर्च लागला. हे रुपये ही नोटिस पावल्यापासून ४ दिवसांचे आंत मला आणून द्यावे. व आतां तुह्माला महारोगानें ग्रस्त केलें आहे त्या अर्थी आमचे पोरीचा तुह्माला कांहीं उपयोग राहिला नाहीं व तिचा आतां संसारही तुमच्यानें होणें नाहीं ह्मणून पुढें अधिक वाढताखर्च न ठेवतां फारकती द्यावी. आजवर पोरगी अज्ञान होती ह्मणून आह्मी वागविलें पण पुढें आमच्यानें तशीच वागवत नाहीं. तिला दुसरा घरठाव करून देणें जरूर आहे. ह्मणून फारकतीही चार दिवसांचे आंतच द्यावी मुदतींत रुपये व फारकती न आल्यास लागलीच तुह्मावर कोर्टांत फिर्याद करून रुपये भरून घेऊं व कायदेशीर दसरा घरठाव पोरीला करून देऊ हें खूप समजावें ही नोटिस दिली सही तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १८८० इसवी.

( सही ) पुंजाजी वल्दद जानजी हडम रहाणार अत्रद निशाणी खुद हातची.

---

## नोटिस.

रामा वल्दद गंगाराम सुतार रहाणार नागपुर पिसवद एथें मौजे किन्ही इलाके मोगलाई यांत धोंडी मर्द रामा सुतार रहाणार मौजे चांधई परगणे चिखली तालुके चिखली जिल्हे बुल्ढाणें. इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, मी तुह्मी लग्नाची बायको असून लग्न होण्यास अजमास १२ वर्षे झालीं, परंतु आजपावेतों तुह्मी आपले घरीं मला नेलें नसून, अनरीतिप्रमाणें माझा संसारही केला नाहीं. मी वयांत येऊन सहा वर्षे झालीं तरी माझे बापाचे घरीं राहून निर्वाह करीतें आहे. माझे संबंधानें माझे बापास दरसाल अन्न वस्त्र व पोटगीबद्दल रुपये दरसाल पन्नास प्रमाणें अजमास १२ वर्षांचा खर्च रुपये सहाशें लागला आहे. परंतु तुह्मी कधींही माझे खाणें पिणें वगैरेबद्दल समाचार घेतला नाहीं. करितां ही नोटिस देण्यांत येते कीं, सदहू नोटिस पावलें तारखेपासून पंध्रा दिवसांचे आंत वर लिहिलेला खर्च देऊन मला आपले घरीं घेऊन जावें. याप्रमाणें तुमचेकडून मुदतीचे आंत न झाल्यास ही नोटिस फारकत समजून मी कायदेशीर दुसरा विवाह करीन. मग मजवर तुमचा कोणतेही प्रकारे हक्क रहाणार नाहीं. यास्तव नोटिसीनें कळविण्यांत आले आहे या बद्दलचा योग्य रीतीनें विचार करून रुपये घेऊन यावें व ते रुपये माझे बापांस देऊन मजला आपले घरीं घेऊन जावें. मी खुशीनें तुमचें बरोबर येण्यास व संसार करण्यास तत्पर आहे. कळावें. तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १८८०

( सही ) धोंडी मर्द रामा सुतार रहाणार चांधई परगणेव तालुके चिखली जिल्हे बुल्ढाणें. निशाणी हातची बांगडा.

---

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० पत्रकर्ते महाराज आपल्याकडे दोन ओळी लिहून पाठविल्या आहेत त्यास कृपा करून आपण आपल्या सुंदर पत्रीं जागा द्याल अशी आशा आहे.

दारव्हा एथें कांहीं दिवसांपूर्वीं मुलांस बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाला त्या वेळेस तहशिलदार साहेब व गावांतील बरेच गृहस्थ जमले होते. थोड्यांत हेडमास्तर यांनीं सभेस आलेले लोकांचे आभार मानून मुलांकडून कसरत वगैरे करविल्यानें कोणकोणते फायदे होतात या विषयावर भाषण केलें नंतर त्यास अनुसरून तहशिलदार साहेब यांनीं भाषण करून लोकांचे मनांत फार चांगल्या रीतीनें वर लिहिलेली गोष्ट भरवून दिली. लोकांनीं आपल्या खुशीनें कबूल केलें कीं आह्मी वर्गणी देण्यास तयार आहो तेव्हां लागलीच यादहोऊन ३४ रुपये जमले. पैकीं सर्वांच्या मतें १५ रुपये हिंदुस्थानी मुलांचे फी व बुकाकरितां दिले. मे. मुबारकअली यांचा स्वभाव फार चांगला आहे यांची लोकांस न्याय वगैरे देण्याची शैली उत्तम आहे. यांस इतर मुसलमानांप्रमाणें आपल्या जातीचा पक्षपात बिल्कूल नाहीं ते आपल्या जातीच्या लोकांपेक्षां इतर जातीस फार मान देतात. हे एथें आल्यापासून सरकारी बगीच्याची फार मेहनत करून त्यास सुशोभित केलें. पत्रविस्तार फार झाला करितां पुरें करितो. कळावें ता. १३ फेब्रुवारी सन १८८० इसवी.

सभेस जाणारा एक क्ष.

---

रा. रा. ज्ञानप्रकाशकर्ते यांसः—

वि० वि० काल रोजीं सायंकाळीं कांहींसे नवीन पद्धतीवर कीर्तन झालें. त्याजबद्दल आपले सुंदर पत्रीं हकीकत येण्याकरितां चार ओळी पाठविल्या आहेत त्या कृपा करून प्रसिद्ध होण्यांत याव्या.

रा० रा० गणेश वासुदेव जोशी यांचे एथें त्यांचे नातवाचे उपनय झालें. या संबंधानें वैदिक व शास्त्री व गृहस्थ मंडळीची सभा काल रोजीं पेठ काळेवार श्री विष्णुमंदिरांत झाली. सभेस पुण्यांतील सर्व शास्त्री व वैदिक मंडळी व गृहस्थ व सरदार व रा. बहादुर वगैरे बहुतेक मंडळी आली होती. जोशी बावा यांणीं निमंत्रण चिठ्ठ्या ज्या पाठविल्या त्यांत लिहिल्याप्रमाणें " उपनयन " या विषयावर कीर्तन स्वतः जोशी बावा यांनीं केलें. सुमारें तीन कलाक कीर्तन चाललें होतें. कीर्तनांत " सद्गुरु वाचोनि सापडेना सोय" या अभंगावर कीर्तन चालू करून आश्वलायन सूत्रांतील "अष्टमवर्षे ब्राह्मण उपनईत " आणि " द्वादशवर्षाणी वदब्रह्मचर्य ग्रहणांत्तं वा या आधारावर उपनयन या शद्बाचा अर्थ 'जवळ नेणें' ह्मणजे गुरुजवळ नेणें असा आहे. सोळा संस्कार एकंदर मनुष्यांचे जन्मांत व्हावयाचे त्यांपैकीं अकरावा संस्कार "उपनयन" हा आहे व या संस्कारनें मनुष्यास जी विद्या व ज्या विद्येनें ऐहिक आणि पारमार्थिक ज्ञान प्राप्त होण्याचा आरंभ करण्याचा आहे. हा संस्कार फार महत्वाचा सर्व लोक मानीत असून हा संस्कार अनादि काळापासून वेद आज्ञेप्रमाणें होत आहे. त्या संस्कारानें बारा वर्षपर्यंत ठेवून मुलास गुरुचे एथें ठेवावयाचे आहे, व मनुष्यास जे चार आश्रम तो पहिला आश्रम आरंभ करण्याचा हा संस्कार आहे, व त्या संबंधानें वेद आज्ञे प्रमाणें ब्रह्मचर्य बारा वर्षे तर प्राचिन काळी ठेवितच होते. इतकेंच नाहीं. परंतु जितके दिवस ज्यास्तीं ब्रह्मचर्य राहिले तितके ठेवीत असून ब्रह्मचर्य आश्रमांत मोठमोठाली पराक्रमांची कार्यें त्यांजकडून घडून येत असत बृहस्पतीचा पुत्र कच याणें अमृतसंजिवनी विद्या जी संपादन केली ती ब्रह्मचर्यांतच केली, व वामन अवतार होऊन दैत्याचे त्रासापासून पृथ्वीस सोडविलें तेंही ब्रह्मचर्यांतच झालें श्री कृष्ण परमात्मा यांणींही सधिपान ऋषी यांचे आश्रमीं राहून विद्या संपादन केली. या प्रमाणें ह्या उपनयन ह्मणजे ब्रह्मचर्य आश्रमाचा प्राचीनकाळीं प्रकार असून दिवसेंदिवस त्या संस्काराची अव्यवस्था होत होत तो संस्कार घटकाभर मौंजेचा आणि त्यासंबंधानें शेंकडो रुपये खर्च होण्याचा होऊन जाऊन मुख्य ज्या गोष्टी त्या अगदीं अविधी होत आहेत, यामुळें आपले देशांत अनेक नाशाची झाली आहेत. हा संस्कार इमारतीचा जसा पाया असतो त्याप्रमाणें मनुष्य देहाचे इमारतीचा हा पाया आहे. इमारतीचा पाया कच्चा असला ह्मणजे वरील इमारत कितीही चांगली केली तथापि ती निरुपयोगी होते त्याप्रमाणें ह्या व उपनयन ब्रह्मचर्य संस्कारांत कच्चेपणा राहिला ह्मणजे मनुष्य दे

ह निरउपयोगी झाला, त्या प्रमाणें हल्लीं या संस्काराचे संबंधानें अव्यवस्था होऊन आपले देशांतील प्रजा अगदीं निरउपयोगी झाली आहे. हा संस्कार मुळींच राहिला नाहीं असें ह्मटलें तरी चालेल. नावाचें उपनयन करून लागलेच समावर्तन ह्मणजे सोडमुंज करून शेवटील संस्कारावर मनुष्याची स्थिति आणून ठेवतात, यामुळें गुरूपासून प्राप्त होणारी विद्या व ज्या विद्येपासून ज्ञान होणार, व ज्या ज्ञानापासून ऐहिक आणि परमार्थ साधण्याचा त्याची मुळींच प्राप्ती होत नाहीं, यामुळें मनुष्यदेह ज्या ज्ञानानें थोर मानला आहे तें ज्ञान नसल्यामुळें जनावरांत त्याची गणना होत चालली आहे. तेव्हां ह्या संस्काराचे संबंधानें लोकांनीं थोडाबहुत विचार करावा तरच कांहीं तरणोपाय आहे नाहीं तर दिवसें दिवस फारच कठीण येणार आहेत असा कथाभाग सांगून कीर्तन पुरें केलें.

कीर्तन पुरें झाल्यावर वे० शा० रा० रा० राम दीक्षित आपटे हे उभे राहून जोशीबावा यांचे उद्योगाविषयीं व शेवटीं हा कीर्तनाचा भाग त्यांणीं आपल्याकडे घेतला, यांत आतां परमार्थही ते साधणार असें बोलून सभेचे तर्फे आभार मानून विशेष असें बोलून दाखविलें कीं, जोशीबावा यांणीं जें कीर्तनांत सांगितलें तें सर्व शास्त्राधाराप्रमाणें आहे अविधि व कांहीं विनाकारण असे रीतीचा हल्लीं उपनयनाचा विधी चालला आहे. यामुळें खर्च मनस्वी होऊन ज्या गोष्टी अवश्य घडण्यास पाहिजेत त्या घडत नाहींत. आजच सभेंत बसले असलेले कितीएक वैदिक व शास्त्री यांची जोशीबावा यांचे बोलण्याविषयीं थोडी कुरकुर होती, परंतु जोशी बावा ज्या सशास्त्र गोष्टी सांगतात त्यांची आतां कुरकुर उपयोगी नाहीं. कांहीं तरी अव्यवस्था होते आहे ती कमी होण्याचाच आतां उद्योग केला पाहिजे हेंच उत्तम आहे. या प्रमाणें बोलल्यावर सभासदांस अत्तर, गुलाब व फुलें वगैरे देऊन सभा विसर्जन झाली.

जोशी बावा यांणीं कीर्तनांत हल्लीं जो अविधी व विनाकारण खर्च उपनयनांत होत आहे त्यांत गडकनेर व समारंभानें अक्षत काढणें, मातृभोजनाचा चाखोळा, किंमतवान भिक्षाळा घालणें व रात्रीं भिक्षाळेचा समारंभ काढणें, यवनाचे ताशे मरफ्यांचीं वाद्यें व बेंडबाजे लावणें, व कळवांतणीचे नाच व दारू उडविणें वगैरे गोष्टी अगदी अविधी आहेत ह्मणून सांगितलें आहे व त्याचप्रमाणें दीक्षित यांचाही अभिप्राय आहे, तेव्हां आतां लोकांनीं या संबंधानें थोडा विचार करावा. पुढील एकादशीस बहुतकरून विवाह संस्काराचे संबंधानें कीर्तन होईल असें दिसत आहे. कळावें लोभ करावा ही विनंती.

पुणें तारीख २२ फेब्रुवारीं १८८९

कीर्तनास हजीर असणार[।].

---

पातूर ता. २५।२।८० इ.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि. वि. पुढील चार ओळी आपणाकडेस लिहून पाठविल्या आहेत तरी येत्या अंकीं आपल्या सुंदर पत्रीं जागा मिळेल अशी उमेद आहे.

हवा— दिवसेंदिवस थंडी कमी होत चालली आहे मधून मधून अभ्रें येतात त्यांणी आंब्याचा मोहोर झडून पिकास धोका बसेल असें वाटतें.

यात्रा— मी समजत होतों कीं येथील यात्रा बरीच मोठी भरत असेल परंतु दोन च्यार वेळां मी सर्व यात्रेंतून फिरलों. तथापि उमरावतीच्या आठवड्याच्या बाजारापेक्षां मला त्यांत जास्त कांहींच दिसलें नाहीं. कांहीं दुकानांतून जितका माल आहे तितका साधारण बाजारांतल्या दुकानांत नसतो इतकेंच काय तें विशेष. लोक ह्मणतात कीं अद्याप पुष्कळ माल आणि दुकानें यावयाचीं आहेत. ह्मणून यात्रेच्या संबंधानें आज कांहीं ज्यास्त लिहूं शकत नाहीं.

उचले— इतर कांहीं असो पण उचल्यांची मात्र समृद्धी आहे. जेथें नानाप्रकारचे मालांनीं भरलेलीं दुकानें आहेत त्यांत हांड्या, ग्लासें, घड्याळें, चित्रें वगैरे मोहिनी घालणारे पदार्थ हारीनें मांडिले आहेत. खेड्या पाड्यांतील लोक ते पाहून आश्चर्य करीत आहेत. कोणी कांहीं मौजेचे पदार्थ घेण्याकरितां आपल्या पिशवींत हात घालून पैसे काढीत आहेत अशा गर्दींत उचल्यांचे शेत पिकतें. यात्रा पुरी भरली नाहीं तोंच मात्रागमन्यांनीं आपलें काम सुरू केलें तथापि पोलिसचा बंदोबस्त विशेष सक्तीचा असल्यानें त्यांचे कांहीं चालत नाहीं.

मे. साविल साहेब पोलिस इन्स्पेक्टर यांची नेमणूक इकडील रेंजावर झाल्याचें एकून फार संतोष होतो.

पातूरच्या आसपास डोंगर फार आहेत त्यांत वडर, वंजारी वगैरे जातिच्या लोकांची वस्ती आहे. हे लोक व यांच्या बायका दिवसास गवत व लांकडाच्या मोळ्या विकण्याचे मिषानें गांवांत येतात परंतु चोरीकरण्यास सुलभ ठिकाण कोणतें आहे इकडे त्यांचें संपूर्ण लक्ष असते यांजवर पोलीसची नजर चांगलीच असली पाहिजे आह्मांला पोलीस अंमलदार चीफ का० हेडकानस्टेबल इत्यादी जसे असावे तसे मिळाले आहेत ही आनंदाची गोष्ट आहे. तशांत सदरहू साहेबांची नेमणूक झाली मग काय विचारावयाचें आहे. यांणीं देउळगांव येथील राजाचा संबंध ज्यांत होता असा मोठा गुन्हां पत्यांत आणिला. बारशीटाकळी येथील चोरीचा पत्ता मोठे चमत्कारिक युक्तीनें लाविला.

अलीकडे आलेगांव एथें मारवाड्याचे घरून सरासरी १९०० रुपयांचा माल चोरीस गेला होता त्यांपैकीं १६०० चा माल यांचे सक्त मेहेनतीनें सांपडला. चोरांचा थांग अद्याप लागला नाहीं. हे साहेब घरफोडीच्या गुन्ह्याचा तपास करण्याकरितां एथें आले आहेत. दर्गेखा नावाचा एथें एक संभावित सावकार आहे. थोडे दिवस झाले त्यांचे जामदार खान्याची भिंत फोडून आंतून कोणी ५००० रुपयांचा माल नेला. अद्याप जरी सदर्हू साहेबांस चोरट्यांचा थांग लागला नाहीं तथापि तपास जारीनें सुरू आहे. यांणीं यात्रेचाही बंदोबस्त चांगला ठेविला आहे- सदर्हू साहेब इकडील रेंजांवर चिरकाल असल्यानें रयतेस सुख होईल. असें ह्मटलें असतां काडी इतकी ही अतिशयोक्ति होणार नाहीं असें मला वाटतें.

एक

क्ष.

---

# वऱ्हाडसमाचार.

मिति माघ कृष्ण ५ शके १८०१

## आमच्या देशाची सुधारणा कशी होईल?

आपच्या या अफाट हिंदुस्थान देशांतील हल्लींच्या निकृष्ठ दशेस पोंचलेल्या लोकस्थितीकडे विलक्षण प्रकारल्या जाती भेदाकडे, व नानातऱ्हेच्या मताभिमानाकडे नजर फेंकली असतां लागलीच वरील प्रश्न पुढें येऊन उभा राहतो. कीं, जातील एक एक प्रकार सुद्धां आमच्या सुधारणेच्या नाशास पुरें होऊ शकेल. मग या तिन्ही प्रकारच्या घोटाळ्यांत सांपडलेल्या आपच्या देशाची अवस्था कशी असावी हें जर लक्ष्यपूर्वक पाहिलें तर केवळ एका भयंकर तुफाणांत सांपडलेल्या हतभागी गलबताप्रमाणें आहे असें स्पष्ट दिसून येईल.

मुळारंभीं आमचे देशांत व्यवस्थापकांनीं ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, व शूद्र हे चार वर्ण स्थापित करून त्यांजकडे विचार, संरक्षण, व्यापार व सेवा कृषिकर्म वगैरे हीं कामें सोंपून देशाची व्यवस्था बिनधोक व निरंतर चालावी अशी योजना करून ठेवली होती. जोंपर्यंत या चार वर्णांचे हातून आपापलीं कामें योग्य रीतीनें बजाविलीं जात असत तोंपर्यंत देश किती सुखी नांदला असेल याविषयीं फार दूर प्रयंतर पहावयास नको. परदेशस्थ लोकां कडून याला "सूवर्ण भुमिका" हें नाव मिळालेलें यवढें बस्स आहे. परंतु मोठी दुःखाची गोष्ठ कीं, सदरील चार वर्ण सुख संपत्तीच्या भरांत अनुक्रमें क्रियाभ्रष्टा, ऐशआरामी, व्यवहारशुन्य, व आळसी होऊन पदभ्रष्ट झाले. हल्लीं ती मूळची वर्ण व्यवस्था जरी विनसली जाऊन लयास गेल्या सारखीच झालेली आहे; तथापि जातिभेदाचें भारूड त्याचे शत गुणित वाढलें आहे.

हा वाढलेला जातिभेदाचा घोटाळा लक्ष्यपूर्वक अवलोकन करून पाहिला तर यात पुष्कळ प्रकार होतात. पहिला उद्योग धंद्यांनें जसें. कोळी, पारधी, सुतार, लोहार, शिंपी, सोनार, जिनगर, चांभार, ढोहोर, परीट, भंगी, कासार, न्हावी, गुरव, मांग, महार इत्यादि दुसरे पंथानें कबीरपंथी, रामानुज पंथी, सतनामि, मानभाव पंथी जती, इत्यादि पारसनाथी. आतां तिसरे देवतोपासनेवरून शैव लिंगायत, शाक्त गोंदळी, गार्हापत्य, शौर्य, वैष्णव, खंडोबाचे वाघे. दत्तात्रयाचे गोसावि, रामाचे बैरागी, आतां आश्रमावरून ब्रह्मचारी, गृहस्थ, सन्यासी, दिगंबर, परमहंस. आतां मतावरून सिद्धांती, वेदांती, मूर्तिपूजक, नैश्वर्य, (नास्तिक) एकैश्वर्य, अलीकडील समाजांचीहि यांतच गणती होईल जसे. प्रार्थना समाज, ब्रह्म समाज, मित्र समाज गायण समाज इत्यादि.

हे वर लिहिलेले प्रकार सदरील निवडक सदरांतून केवळ वेंचे आहेत हें कोणाचेही ध्यानीं येण्यासारखें आहे व त्यांतील ही पोटभद पुन्हा असंख्य आहेत एवढ्या मोठ्या घोटाळ्यांत कोणी कोणाचे ऐकणार आहे काय? नाहीं. "तानाशाके तानमे सबीतान गल्तान है और अपनें अपने तानमे चिडेयाभी मस्तान है" अशी स्थिति होऊन राहिली आहे. यावर जर कोणी विचारील कीं याप्रमाणें आपापल्या कामांत तरी सर्व गर्क आहेत कां तर त्यावर सुद्धां उत्तर "नाहीं" हेंच द्यावें लागेल, कारण 'एक देव एक धर्म एक निष्टा परतंप' अशा प्रकारचे पुरुष या वरील प्रकारांतून फार विरळा सापडतील. एकच गृहस्थ प्रेमळ भक्तीनें शिवाचे सोमवार प्रदोष, शिवरात्र; महा विष्णुची एकादशी, देवीचें नवरात्र, सूर्याचा रविवार हीं उपोशनें करून शिवाला रूद्र, सूर्याला अर्घ्यदान, देवीला गोंदळ, खंडोबाला जाग्रण, पिराला मलीदा आणि आश्राला दहीभाताचें वोणें समर्पण करणारी एक एक व्यक्ती असें कोट्यावधि लोक आमचे देशांत सांपडतील. तेव्हां धर्माची किती दुदर्शा ह्मणावयाची.

श्रीरामदास स्वामींनीं ह्मटलें आहे.

नाहीं एक उपासना ॥
कैचीभक्तीची भावना॥१॥
नाहीं निश्चय अंतरीं॥
मन फिरे दारोदारीं॥२॥
ज्यासी नाहीं एक देव॥
साता पांचा ठायीं भाव॥३॥
नानाकार झालें मन ॥
कैचे निष्टेचें भजन ॥४॥
रामीं रामदास ह्मणें ॥
निष्टेवीण सर्व सुणें ॥५॥

अशी जर आमची आवस्था झाली आहे तर मग आमची सुधारणा कशी व्हावी व आह्मास सुख आणि स्वतंत्रता हे जे जगांतील अमेलिक पदार्थ ते आह्मास कसें प्राप्त होतील? होणार नाहींत. प्रथम हा घोटाळा दूर झाला पाहिजे.

या विषयाकडे लक्ष गुंतून कित्येक विद्वान् देशाभिमानी व महात्म्ये पुरुषांनीं सतत प्रयत्न चालविले आहेत. या हिंदुस्थानाला पूर्ववत बावण कशी सोने बनविण्याचे इराद्यानें नानाप्रकारचे पारीस आणून याला घासतात पण हें अजून लोखंडाचे अवस्थेंस येऊन न पोंचता पितळ होऊन राहिलें आहे. सबब तें सोने होऊं शकत नाहीं. कारण पारिसानें फक्त एका लोहाचें सोनें होतें ह्मणून या पितळेला घासून कित्येक पारिसाचें पीठ झालें तरी हे पितळेंचे पितळच रहातें याचें सोनें परमेश्वर कृपेवाचून होणें कठीण दिसतें.

---

## उमरावतीच्या आगीची हकीकत.

गेल्याचे मागील बुधवारीं उत्तर रात्रीं उमरावती एथें बोहरी ओळींत अग्निनारायणानें जो प्रळय करून सोडला तेणेंकरून एक प्रहरभर तरी सर्वांचे तोंडचें पाणी पळालें असेल यांत संशय नाहीं. अपरात्रीं ह्मणजे बारावर दोन वाजतां बोहऱ्याचे दुकानास आग लागली व वायूच्या साह्यानें ती एक दोन तासाचे आंत दोनही बाजूच्या १८।२० दुकानांतून व्यापून सर्व अग्निमय करून सोडलें

तेव्हां खरोखरच शहरवासी लोकांचीं अंतःकरणें किती घायाळ व हतवीर्य झालीं असतील याची कल्पना आमचे वाचक सहज करतील. उमरावती हें शहर मोठी पेठ असून जुन्या रीतीप्रमाणें मोठ्या दाट वस्तीचें आहे. ह्मणून अशा गडबडीचे प्रसंगीं फार कठीण खरे तथापि तेथील म्युनिसिप्यालिटीनें जागोजाग पाण्याचे हऊद ठेविलेले आहेत व आग विजविण्याचे बंब आहेत ह्मणून मोठीशी काळजी नव्हती परंतु सदर्हू संटकसमयीं त्या बाळगलेल्या साधनांचा कमिटीकडून उपयोग करवला नाहीं. बऱ्याच उशिरानें ह्मणजे १८१९ दुकानें पेटल्यावर त्या ठिकाणीं बंब आला जवळच महादेवाचे देवळानजीक हाउद होता पण त्याचा स्क्रूच कोणाच्यानें निघाला नाहीं. तथापि अशा वाणीचे प्रसंगीं तेथील पोलिस इन्स्पेक्टर रा. रा. कृष्णराव सखाराम दुराणी यांणीं अतिशय श्रम करून अग्निनारायणास बऱ्याच अंशीं शांत केलें. त्याचप्रमाणें एका जळक्या इमारतीची भिंत आगदीं पडण्यास झालेली पाहून तेथून सर्व लोक एकीकडे तावडतोब काढिले तेणेंकरून जी पन्नास साठ मनुष्यांची प्राणहाणी तत्क्षणींच होणार होती ती दुराणी यांणीं टाळली हें दुःखांत सुख समजावयाचे.

सदर्हू १९।२० दुकानानें पेट घेतल्यावर म्युनिसिप्यालिटीचा व मोफसूजल कंपनीचा असे दोन बंब येऊन पोहोचले तेथील तालुका आफिसर, तहशिलदार, आननरी माजिस्त्रेट, व पोलिस यांणीं धावाधावी करून प्रज्वलीत झालेली आग शांत करून पुढें प्रसार होऊं दिला नाहीं. त्याचप्रमाणें एका प्यार महंमद नावाचे मनुष्यानेंही बक्षीस मिळविण्यासारखें साहस कर्म करून आग विजविली नाहींपेक्षां सर्व दुकानदार नाउमेद होऊन भाजीबाजारापर्यंत सर्व दुकानें मोकळी करून अग्निनारायणास भक्ष देण्याकरितां सिद्ध करून ठेविलीं होतीं असें समजतें. म्यानिसिप्यालिटीचे सेक्रेटरी मात्र शेवटपर्यंत तेथें हजर नव्हते असें ह्मणतात. एकंदरींत या वेळीं उमरावती पेठेची फार मोठी खैर झाली असें समजलें पाहिजे.

दुसरे दिवशीं जळलेल्या इमारतींतील निखोर विजवीत असतां व मलमा उचलींत असतां न कळत जमीनींत जळत असलेली त्या दणी एकदम खालीं बसल्यामुळें त्यासरसे ४ मजुरदारही आंत पडले त्यांपैकीं दोन पुरुष होते ते इतर मनुष्यांचे सहायानें लागलीच वर निघाले परंतु दोन स्त्रियांचा सायंकाळपर्यंत पत्ता नव्हता पैकीं एक अवरत सायंकाळीं भाजल्या वांग्यासारखा झालेली सापडली व दुसरी गेल्याचे मागील रविवारीं छिन्नभिन्न झालेली सांपडली असें प्रमोदसिंधू वरून कळतें.

---

दरवेड— उमरावती जिल्ह्यांत चांदूर तालुक्यांत एक व नांदगावाकडे एक असे दोन ठिकाणीं दोन दरवेड पडल्याचें वर्तमान प्रमोदसिंधूवरून समजतें. दरवड्यांची बातमी आह्मी दक्षिणेंतील व वायव्य प्रांताकडील ऐकत होतों परंतु हे जवळ व एकाच आठवड्यांत दोन ठिकाणीं दरवेड पडल्याचें ऐकून आह्मांस फार वाईट वाटतें. दक्षिणेकडील वगैरे दरवेडखोरांचे काय हाल झाले हें आपले इकडील दरवेडखोरांनीं ऐकिलें नसेल काय? कोणी फाशी गेले, कोणी जन्मठेपेच्या काळेपाण्यावर गेले, व कोणी सक्त मजुरी करण्याकरितां गेलांत गेले. ज्यांस आपलें जीवित, आपला देश व आपली स्थिति नकोशीं असेल त्यांचेच हातून अशीं घातक कृत्यें घडावयाचीं तरी बरें आहे कीं आमचे दयाळु सरकार त्यांची खबर घेण्यास तत्पर आहे. नाहींपेक्षां यांणीं कहर करून सोडला असतां यांत संशय नाहीं.

---

## वऱ्हाड.

---

मे० जुडिशियल कमिशनर साहेब बहादूर यांची स्वारी सर्व आठवडाभर एथेंच असून गेले सोमवारपासून आगरेचे खुनी मुकदम्याचें सेशन त्यांच्या पुढें चाललें होतें. त्रिंबक वगैरे आहा आरोपींस जन्मपर्यंत काळेपाण्याची शिक्षा गेले शनिवारीं सुनावण्यांत आली असें समजतें.

उमरावतीचे पोस्टमास्तर मि. तालिबुदीन यांस अकोल्यास नेमून उमरावतीस कोणी कानपुठीहून युरोपियन येणार आहेत असें समजतें.

वऱ्हाडमित्र नावाचें इलिचपुरचें वर्तमानपत्राचे अंक सर्व फेब्रुवारी महिन्यांत आह्माकडे आले नाहींत व त्याप्रमाणें बाहेरूनही वर्तमान आलें आहे कीं सदर्हू पत्र बंद झालें हें खरें असल्यास त्याबद्दल आह्मांस फार वाईट वाटतें.

रा. रा. वासुदेव सदाशिव पिसोळकर यांस यवतमाळ डिपुटी कमिशनरचे कायमचे क्षार्क आफ धि कोर्ट नेमिलें. असें उर्दू अखबार कर्ते लिहितात. ही जागा नुक्तीच खाली झालेली आहे हें आमचे वाचकांस आठवत असेलच. पिसोळकर हे यंदा लोअर स्थांडर्डच्या परीक्षेंत पास झालेले आहेत व हल्लीं इलिचपुरास डिपुटी कमिशनरचे क्षार्क आफ धि कोर्टचे काम पहात आहेत तेव्हां यांस ही जागा मिळणें साहजिक आहे व ती मिळाली हें ऐकून आह्मास फार संतोष होतो आतां मि. महमद इस्मायल हेही जुडिशियल कमिशनरचे डिपुटी क्षार्कचे जागीं कायम होतील असें वाटतें.

कालिदास नाटककार मंडळीनें गेले शनिवारीं मार्गे केलेल्या बहुतेक खेळांचे सारांश असे १८।२० भाग व एक फार्स केला. आतां लवकरच ते आपल्या मंडळीचे दोन भाग करून इंदूर वगैरेकडे जाणार आहेत. एत्या बुधवारीं सदर्हू मंडळी शेवटला खेळ धर्मशाळा व राजेश्वर यांच्याप्रीत्यर्थ करणार आहे. व जें उत्पन्न होईल तें धर्मार्थ दणार आहे हें पाहून आह्मांस संतोष वाटतो.

उमरावतीचे डिपुटी कमिशनर कर्नल मेंजिस व इलिचपुरचे डि० पोलिस सुप्रिंडेंटेंट मि. काटग्रेव्ह हे लवकरच विलायतेस रजेवर जाणार आहेत असें समजतें.

एथील सितरमल रामनारायण मारवाडी याच्या राघोबा नांमें गुमास्त्याचें प्रेत ब्याळे तालुके बाळापुर एथील विहिरींत पांच च्यार दिवसांपूर्वीं सापडलें. त्याचा रीतीप्रमाणें पंचनामा झाला त्यांत राघोबानें आत्महत्या केली असें निष्पन्न झालें सदर्हू इसम थोडे दिवसांपूर्वीं बाळापुरास गेला होता असें ह्मणतात.

मे० राइट साहेब उमरावतीचे पोलिस सुप्रिंटेंडेंट गेले गुरुवारीं तीन महिन्यांचे रजेवर विलायतेस गेले व त्यांचे जागेवर तेथील अ० सुप्रिंटेंडेंट मे० फ्रेजर सा. यांस अक्टिंग सुप्रिंटेंडेंट नेमिलें असें समजतें.

मे. आर्देसर दिनसाजी साहेब जळगावचे तहशिलदार यांणीं १४ दिवसांची रजा घेतली सबब मे० एदलजी बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर हे तेथील फौजदारी कामाचे व्यवस्थेसाठीं जळगावास गेले आहेत असें समजतें

मि० नारायण बाळकृष्ण गद्रे जुडिशियल कमिशनर कचरींतील क्षार्क यांची एथील डिपुटी कमिशनर कचेरींतील डिपुटी क्षार्कचे ७५ रुपयांवर कायम नेमणूक करावी ह्मणून मे. जुडिशियल कमिशनर साहेबांनीं शिफारस केली आहे असें उ. अ. कर्त्यांचे समजण्यांत आलें आहे.

पत्राची पोंच— "लायब्ररीचा कनवाळु" या सहीचें पत्र पोंचलें. कनवाळु ह्मणतो कीं "कालचे उर्दूअखबारांतील उभय मित्रसमाजांची लोककल्याणेच्छेच्या संबंधानें तुलना केलेली पाहून फार आश्चर्य वाटलें. त्यांनीं समाजापेक्षां उभय लायब्ररींची तुलना करावयाची होती वगैरे" हें पत्र फार उशिरानें पोंचल्यामुळें आजचे अंकीं सर्व घेतां आलें नाहीं पुढील वेळीं विचार करू.

मे. मोफेट साहेब पोलिस सुपारिंटेंडेंट हे ह्या आठवड्यांत दवऱ्यावरून परत येऊन पुन्हाः गेले शुक्रवार रोजीं फिरावयास गेले.

येथील स्टेशन मास्तर रा. रा. रामचंद्र धोंडदेव ह्यांची बदली मूर्तिजापुरास होऊन तेथील रा. रा. विष्णूपंत खरे हे येथें येणार असें ऐकितो.

शेगांवचे चीफ कान्स्टेबल मि. गनुसिंग ह्यांनीं पेनशन घेतल्यामुळें मि. रामराव कृष्ण देशपांडे हेडकान्स्टेबल ह्यांस ४० रुपयांचे चीफ कान्स्टेबल नेमले उ० अ०

उमरावती एथील आल्लाभाई चांदाभाईचे बोहरी गल्लीच्या आलीकडे जवळच लागून दुकान आहे त्यास आग लागू नये ह्मणून मालकानें १५०० रुपयांचा नवस केला होता त्याप्रमाणें परमेश्वर कृपेनें घडलें ह्मणून त्यानीं लागलीच तितक्या रकमेची खैरात केली

उमरावती हायस्कुलांतील हिंदुस्थानी मास्तर मि. महमद हुसेन यांचेकडे थोडे दिवसांपासून येथील हिंदुस्थानी शाळेचे सुप्रिंटेंडेंटचे काम दिलें व ते हें काम पाहूं लागल्यापासून गेल्या महिन्यांत २५।३० मुलांची संख्या वाढली आहे. प्र- सिं.

---

## नोटिस.

रामचंद्र वलद तुळजाजी सिंपी बेयेकर रहाणार बाळापुर यास खालीं सही करणोरे इसमांकडून नोटिस देण्यांत येते अशी कीं, तुमची नोटिस पावली. तुह्मी लिहिता तें सर्व खोटें आहे. व दस्तैवज कायदेसीर झाले आहेत. तुह्मी पाहिजे तर फिर्याद करावी नुकसान तुमचेंच होईल. हें मात्र खास समजावें.

दुसरे तुह्मी आमचे देण्यांत माल देऊन बाकीचें कर्ज तुह्माकडेस राहिलें आहे त्याचा निकाल लवकर न कराल तर तुह्मावर फिर्याद करण्यांत येईल. कळावें तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १८८०

सह्या

गोपालदास गुजराथी

साहेबराम मारवाडी

गोविंदराम मारवाडी

खुशालीराम मारवाडी

दस्तुर गोपालदास नारायणदास

रहाणार बाळापुर.

---

## वर्तमानसार.

आफगाणीस्थान— गजनीहून २,००० हजार लोक आपली राजनिष्ठा दाखविण्याकरितां आले होते.— ज० टैटलर मरण पावलें.— गजनीस दंगेखोरांचा जमाव फुटून लोक चहूंकडे गेले.— महंमद जाम याचीही फौज फुटली; त्याचे मदतगार इंग्लिशांस शरण येणार आहेत.

युरोप— जर्मन सरकार सैन्य वाढविणार- ता० १२ रोजीं पार्टमेन्ट सभा सुरू करतांनां तेथील बादशहानें असें सांगितलें कीं, शेजारच्या राज्यांच्या फौजांकडे पाहून आह्मास फौज वाढविणें योग्य वाटतें, बाकी आमचा लढाईचा इरादा नाहीं.

बंगाल इलाख्यांत गेल्या ता. १० रोजीं गोएशपूर येथें वडे वादळ होऊन तें सुमारें ५।६ मिनिटेंच होतें, पण तेवढ्या वेळांत त्या प्रदेशांतील शेकडो घरें व बहुतेक शेतें जमीनदोस्त झालीं व आलफापूर व श्रीपूर यांच्या दरम्यान २०० नावा बुडाल्या!

अंबाला येथील सर्व फौज सरहद्दीवर गेल्यामुळें पतियाळच्या महाराजांची फौज तेथील काम करण्यास ठेविली आहे असें कळतें.

होळकर सरकारचे उभय चिरंजीव हिंदुस्थानांत सफर करण्यास निघाले आहत.

गेल्या ज्यानेवारी महिन्यांत सिंध बंदरांतून २,७३,०४५ रुपयांचा कापूस बाहेर गांवीं गेला.

बंगाल्यांत एका विरोपियन गृहस्थानें एक नांगर तयार केला असून तो नांगर एकाद्या अगदीं अशक्त मनुष्यासही चालवितां येतो व त्याच्या योगानें आमच्या नांगरांपेक्षां जास्त खोल जमीन नांगरली जाते असें सांगतात, पण किंमत मात्र ११।१२ रु. आहे.

अहंमदनगर येथील प्रसिद्ध श्रीहरी भक्तपरायण परमानंद बाबा यांस ता० १५ मिनहू रोजीं रात्रीं देवाज्ञा झाली.

आह्मांस लिहिण्यास परमावधी दुःख वाटतें कीं, नगर येथील फर्स्टाक्लस मामलेदार रावसाहेब वासुदेव गोपाळ सोमण बी. ए. यांस नवज्वराचे आजारानें ता० १६ मिनहू रोजीं रात्रीं देवाज्ञा झाली.

इराणच्या फौजेनें हिरात आपल्या ताब्यांत घेण्याविषयीं वाटाघाट सुरू झाली आहे. हें एक नवीन प्रकरण उभें होणार आहे.

कलकत्ता एथील हुगळीचे सेशन जज्ज मि. ग्रांट यांणीं एका फौजदारी खटल्यांत एका पडद्यांत राहणाऱ्या हिंदु स्त्रीस कोर्टांत साक्षीस आणविलें. आणि ती साक्ष देत असतां मुसलमान चपराशाकडून तिचा पडदा भर कोर्टांत काढविला. याजमुळें बंगाल्यांतील हिंदु लोकांस फार वाईट वाटलें आहे.

नवीन सिंधी रेलवेच्या रस्त्यावर गाड्यांची टक्कर होऊन अपघात झाला. त्यांत सात विगारी मेले व दोन फार जखमी झाले आहेत. पुण्याच्या रिसाल्याच्या शिपायांत अथवा घोड्यांस इजा झाली नाहीं असें समजतें.

रशियाचे बादशाहा व त्यांचे घराण्यांतील मंडळी "विंटर पालेस" नावाच्या जाग्यांत जगावयाची होती तो प्रसंग मनांत आणून कोणी घातकी लोकांनी लांबून आंतून जमीन खणून दारू घालून उडविण्याचा प्रयत्न केला; परंतु दैवयोगे ज्यावेळेस हा प्रलय झाला त्यावेळेस मंडळी तेथें जमली नव्हती म्हणून तें सर्व वांचले.

"इकरान स्टेशन—गेल्या मंगळवारीं डाका घालणारांनीं लुटले व तेथील लोकांस ही मारहाण केली असें वां. ग्या. वरून कळतें. हें स्टेशन रजपुताना लैयनीवर आहे.

सु. प.

कलकत्ता ब्रह्मसमाजाचा वार्षिकोत्साह—गेल्या जानेवारीं महिन्याच्या शेवटल्या आठवड्यांत कलकत्यास ब्रह्म समाजाचा वार्षिक उत्साह झाला, त्यांत एके दिवशीं बंगाली भाषेंत कीर्तन झालें, आणि एके दिवशीं बाबु केशव चंद्रसेन यांनीं तेथील टौन हालांत "गाड व्हिजन" ह्मणजे 'परमेश्वर दर्शन' या विषयावर इंग्रजींत व्याख्यान दिलें, त्या व्याख्यानांत बाबु केशवचंद्रसेन यांचे ह्मणणें असे होतें कीं. "ईश्वर जलीं, स्थलीं, काष्ठीं पाषाणीं असा सर्वत्र भरला आहे. या वरून सर्व देव आहेत असें नाहीं. तरी सर्व वस्तूंच्या द्वारें त्याला ओळखावें." जर वास्तवीक त्यांचें ह्मणणें असेंच असेल तर मग त्यांच्या मतांत व अद्वैतवादी यांच्या मतांत काय अंतर? आणखी त्या व्याख्यानांत त्यांनीं ईश्वराला "भारतवर्षाची माता" असें ह्मटलें व आह्मास जुन्या गोष्टीचा कंटाळा आला; जुनी मतें, जुन्या प्रार्थना, जुनी तोंडे, जुन्या मतांचीं जुनीं मनुष्यें, जुन्या उमेदी यांचा तिटकारा वाटतो; परमेश्वरानें आह्मास नवी व्यवस्था दिली आहे. ती कोणती तर ईश्वर भरतखंडाची माता आहे हीच, वगैरे गोष्टी बोलून दाखविल्या. ईश्वर कसा आहे याविषयींचा सिद्धांतही नवीन तयार करावा असें त्यांचे ह्मणणें पडलें. तें असें:—सर्व पृथ्वींत निरनिराळ्या राष्ट्रांच्या व निरनिराळ्या धर्मांच्या लोकांत परमात्म्याविषयीं जीं मतें आहेत तीं सर्व जमा करून एकवट करावी, ह्मणजे खऱ्या देवाचें वास्तवीक स्वरूप दृष्टोत्पतीस येईल.—याशिवाय योनीं मागें जे विख्यात साधुसंत भविष्यवादी वगैरे महा पुरुष होऊन गेले त्यांच्या यात्रा करीत जाव्या यासाठीं विशेष ठिकाणें व विशेष वेळा नेमल्या जातील. त्यावेळेस व त्याठिकाणीं जाऊन मानासिक रीतीनें एकएका सत्पुरुषाची यात्रा करावी असें सांगितलें!!!

अ. द.

तांजोरचे राणी साहेबांनीं कल्याणचे स्टेशनावर स्टेशन मास्तर, असिस्टंट कलेक्टर व पोलिस इन्स्पेक्टर नुरखा यांनीं तजवीज नीट ठेविली त्यांस शाली बक्षिस दिल्याचें समजतें.

मद्रास इलाख्यांत एकंदर सन १८७८ सालांत सर्पदंश वगैरे घातूक जनावरांकडून ६१० मनुष्यें यमसदनीं गेलीं. नऊ वर्षांचे सरासरीनें पहातां ११० मनुष्यें कमी मेलीं असें समजतें.

जज्ज एल ड्रीज हे आपले कामावर बरोबर वेळीं गेले नाहींत सबब त्यांनीं आपल्यास दहा डोलर्स दंड केला असें समजतें.

अमेरिकेमध्यें बहिरे लोकांस ऐकूं येण्यासारखी कांहीं युक्ति नवीन निघाली आहे त्याजवरून स्पष्ट शद्ब व पियोनाचा अवाज चांगला ऐकण्यांत येतो असें समजतें.

ओलगा नदीवर एक मोठा पूल होत आहे. त्याची लांबी ४ मैल असून ८५ फूट उंच असल्याचें समजतें.

महाराज जोतेंद्र मोहन टागोर यांनीं नूतन झालेलें लग्नसमारंभाप्रीत्यर्थ डिस्ट्रिक्ट चरिटेबल सोसायटी यांस ८००० रुपयाच्या प्रामिसरी नोटी दिल्या व याचे व्याजाचे उत्पन्नांतून दर वर्षांस गरीब लोकांस उर्ण वस्त्रें वाटण्याचें योजिलें आहे. लग्नसमारंभाचे वेळीं आणखी पांच हजार रुपयांचीं वस्त्रें गरीब लोकांस वाटण्यांत आलीं असें समजतें.

खानदेशांत पोलिसावर संक्रांत येऊन गुदरली आहे. कोणास सस्पेंड कोणावर खटले होऊन ते कारागृहांत जात आहेत. कोणाबद्दल बारीक रीतीनें तपास चालू आहे तेव्हां पोलिस कामदारांनीं नेहमीं भिऊन काम करीत जावें असें आह्मी त्यांस सूचवितो.

खानदेशांत चोऱ्या व वाटमाऱ्या चालू झाल्या आहेत. खालीं लिहिलेल्या ठिकाणीं चोऱ्या वगैरे झाल्या त्यांचा तपशील. रु.

| | | |
|---|---|---|
| ता. धुळें, निमगुळ गावीं | (मारवाडी) | ८००० |
| ,, मेहेरगाव | ( वाणी ) | १५०० |
| पिंपळनेर | रस्तालूट | २५०० |
| शिरपुर | मामलेदाराचे घरीं | १२०० |
| शिंदखेड | पाटलाचे घरीं | २५०० |
| नंदुरबार | कारकुनाचे बायकोचे अंगावरील डागिने. | २५० |
| | | —— |
| | | १५९५० |

इंडियन मिरर पत्रास दोन हजार रुपये बक्षीस बाबू कालीकिसन टागोर यांनीं दिल्याचे कळतें.

पुण्यांतील पटाईत चोर फैजुल्लाखान यास पोलिस इन्स्पेक्टर मि. काईट यांनीं मोठे शिताफीनें धरला.

डाक्टर एन्स हे आफगानचे सरहद्दीवर गेले होते सबब त्यास बक्षीसा दाखल भत्ता १२००० रुपये दिले. याचप्रमाणें मि. जे. ड्याटन हे सणाचे दिवसांत सणाप्रीत्यर्थ अंडामन्स एथें गेले त्यांचा सर्व खर्च सरकारांनीं दिला.

ने. ओ.

ब्रह्मी लोकांत एक मोठी चमत्कारिक चाल आढळते. एका स्त्रीस पहिल्या नवऱ्यापासून दोन मुली झालेल्या असून दुसरा नवरा करण्याची पाळी आली तर ज्या मनुष्यास दोन मुलगे असतील त्याच्याशी ती लग्न लावते. तिला दोन मुलगे होऊन ती मेली तर तिच्या पहिल्या घरच्या मुलींपैकीं एक मुलगी तिचा नवरा आपल्यास बायको करतो व व त्या नंतर तो मेला तर त्याची नूतन विधवा त्याच्या दुसऱ्या बायकोच्यां एका मुलाशीं लग्न लावते. याचप्रमाणें तो अगोदर मेला तर सांगितल्याप्रमाणें त्यांचें रहाट गाडगें सुरू असतें. व या त्यांच्या विलक्षण नात्यामुळें हिशांची खटलीं सरकारांत फारच गमतीचीं येतात असे सांगतात

## आयुष्य काय करण्यांत घालवावें.

ह्या जगतामध्यें जेवढे सृष्ट ह्मणून पदार्थ आहेत त्यांनां कांहींना कांहीं तरीं उद्देश असतो हें आपणास उघड दिसतें ते पदार्थ असे केलेले असतात व त्यांचे अवयव अशा रीतीनें बनाविलेले असतात कीं, त्यांपासून स्वभावतःच अमुक एक गोष्ट घडून यावी. त्या गोष्टीस आह्मी त्या पदार्थांचा उद्देश अथवा हेतु असें मानितों. असा कांहीं उद्देश आमच्या जीवितापासून दिसून येतो काय? अर्थात् चोंहींकडे सृष्टांत अर्थाशिवाय जर गोष्ट नाहीं तर आमच्याही जीवितास कांहींना कांहीं तरी अर्थ असावा हें सांगावयास नको. ह्मणजे जीवित या शब्दामध्यें दर्शविले जाणारे जे अनेक शारीर व मानसिक व्यापार त्यांच्या कृति अशा योजिलेल्या असाव्यात असें वाटत कीं त्या सर्वांचा मिळून कल एकाच कोणत्या तरी गोष्टीकडे असावा ती गोष्ट कोणती असें जर विचारलें तर पुष्कळजण 'सुख, ह्मणून लागलेंच सांगतील. परंतु थोडा विचार केला तर असें दिसून येईल कीं हें उत्तर बरोबर नाहीं. कारण सुख हेंच जर आमच्या जीविताचा उद्देश तर ते सर्व मनुष्यांस सहजच प्राप्त होण्यासारिखें असावें. नाहीं तर तेंच प्राप्त करण्यासाठीं आमच्या शारीर व मानासिक शक्तीची योजना आहे असें कसें ह्मणतां येईल? पण हें सुख सर्वांच्या स्वाधीन नाहीं व तें थोडक्यांच्याच वांटणीस येतें एवढेंच नव्हे तर तें थोडक्याच मनुष्यांस मिळविण्याचें सामर्थ्य असतें. कित्येकांनां तर अनेक कारणांमुळें ह्या प्रपंचाचा बोजा इतका असह्य वाटतो कीं ते त्यापासून आपली सुटका करण्यास व आपल्याच हातांनें आपल्या प्रणाचा नाश करण्यासही चुकत नाहींत. कित्येक इच्छिलेले पदार्थ ज्यासाठीं ते भूक तान न मानतां रात्रीचा दिवस करून एकसारिखे सक्त मेहनत करितात ते त्यांस प्राप्त होत नाहींत ह्मणून खिन्न असतात, कित्येक जवळ असलेलें धन नाहींसें झालें ह्मणून शोक करीत बसतात, कित्येक परलोकीं आपले सुहृत् संबंधी गेल्यामुळें दुःखसागरामध्यें बुडून गेलेले असतात. सारांश, कोणता एक आपण काळ घेतला व त्यावेळीं त्यावधि जे मनुष्यप्राणी आहेत त्यांमध्यें सुखी किती आहेत ह्याचा जर शोध करूं लागलों तर खचित सर्वस्वी सुखी असें आपणास थोडकेच सांपडतील तर इतकें दुष्प्राप्य जर सुख तर तें साधन करणें हा आमच्या जीविताचा उद्देश असें ह्मणतां येत नाहीं. खचित तो उद्देश दुसरा कोणता तरीं असावा, तो कोणता? हा प्रश्न पुनः आलाच.

आह्मांमध्यें ज्या अनेक वासना आहेत त्या तृप्त करणें व आपणास सुख संपादन करून घेणें अशी आह्मांपैकीं प्रत्येकांची साहजिक प्रवृत्ति असते. परंतु तें प्राप्त करून घेण्यांत निमग्न झाला असतांना केव्हां केव्हां आमची सदसद्विचारशक्ति जागृत होऊन प्रश्न करिते कीं, हा आमचा सुखप्राप्त्यर्थ खटाटोप आहे हा योग्य आहे काय? सुखाकडे रोख धरून आमचें सर्व आयुष्य त्याजला अर्पण करणें हें योग्य आहे? व लागलेंच आपणच होऊन उत्तर करिते कीं, नाहीं. आमचा रोख जें आमचें कांहीं कर्तव्य असेल व जें आह्मास केलेंच पाहिजे असें असेल त्याजकडे असावा हें वाजवी. 'कर्तव्य' व 'केलेंच पाहिजे' या शद्बांमध्यें आज्ञा दिसून येते. ह्मणून जसें चाकरास आपलीं स्वतःचीं कामें टाकून आपल्या धन्याच्या आज्ञा बजाविल्या पाहिजेत तशाच प्रकारें सुखप्राप्तीच्या गोष्टी अशा ज्या आह्मांस वाटतात त्या सोडून आमचीं कर्तव्य आह्मांस केलीं पाहिजेत. परंतु हें जरी कबूल केलें तरी आमच्याकडून आमचीं कर्तव्येंच झालीं पाहिजेत असं ह्मणण्यास आमच्या अंतःकरण व्यवस्थेंत कांहीं आधार आहे काय? होय, आहे. अंतःकरण आमचें नेहमीं एकाच स्थितीमध्यें नसतें. त्यामध्यें निरनिराळे प्रसंगीं निरनिराळे तरंग येतांनां आह्मी पहातों. आमचे सुहृत्संबंधी जवळ असले ह्मणजे तें प्रेमभरित होऊन जातें. अनाथ आंधळा पांगळा कोणी रस्त्यावर पडलेला पाहिला ह्मणजे तें दयेनें आर्द्र होतें तसेंच कोणी चिढीची गोष्ट काढिली ह्मणजे क्रोधयुक्त होतें. प्रेम, दया, क्रोध इत्यादि हे अंतःकरणाचे निरनिराळे तरंग आहेत. त्यांमधीलच सदसद्विचार शक्ति ही एक होय, ही सर्वांमध्यें श्रेष्ट आहे. कारण इतर मनोविकार जेव्हां आपल्या तृप्त्यर्थ आह्मास वाईट मार्गानें जाण्याल प्रवृत्त करितात त्यावेळीं ही विचारशक्ति आपणच होऊन त्या सर्वांस आटोक्यांत ठेविण्यास पहातें. हें नियमन करण्याचा तिचा धर्मच आहे. त्यावरून ती सर्वांत श्रेष्ट आहे हें उघड दिसतें. तर इतर मनोवृत्तींस न मानितां जेव्हां जेव्हां विचाराचा व त्यांचा विरोध पडतो तेव्हां तेव्हां इच्याच प्रवृत्तीप्रमाणें जर आह्मी आचरण करूं तर आह्मी खचित तिचें श्रेष्ठत्व कबूल केलें असें होईल, आणि सर्वसृष्टा जो परमेश्वर त्याचा उद्देश सिद्धीस नेला असें होईल. आणि वर सांगितलें आहेच कीं आमच्या मनोवृत्ती आत्मतृप्तीकडे आह्मांस ओढितात व विचारशक्ति आमच्या कर्तव्याकडे ओढिते. तेव्हां आपलीं कर्तव्यें आपण करावी हें आपणास योग्य व हाच आमच्या जीविताचा उद्देश असें ह्मणण्यास आमच्या अंतःकरणाच्या घटनेंत प्रमाण मिळतें. ह्मणून आह्मी आपलें आयुष्य आपलीं कर्तव्यें करण्यांत घालवावें असा परमेश्वराचा उद्देश आहे असें ठरतें. तर तींच करण्यास आह्मी सदोदित प्रवृत्त असावें हें आह्मांस उचित. आणि सूक्ष्म रीतीनें पाहिलें तर आमच्या कर्तव्यांमध्यें व आमच्या खऱ्या सुखामध्यें कांहीं विरोध नाहीं असें आढळेल. परम कृपाळू परमेश्वर जो, त्याच्या दयेवर ज्याचा दृढ भाव आहे त्यास आमचीं कर्तव्यें आपल्या खऱ्या सुखाच्या आड येतात असें कधींहीं वाटणार नाहीं.

सु० प०

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख ८ माहे मार्च सन १८८० इसवी. अंक १०


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | रु० |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०।२ |
| डाक हाशील. | |
| वर्षाचे आगाऊ | १।० |
| „ अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल

## नोटिसाबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०।१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०।३ |
| „ दुसरे खेपेस | ०।२ |

## वसूल

| | |
|---|---|
| रा. रा. बापुराव कृष्ण वकील | ६०।२ |
| „ „ रामजी लेंड पाटील | १५ |
| „ „ किसन वल्लद चंद्रभान पाटील | २० |
| रा. रा. हरी मोरेश्वर शेवडे हे. मा. | १६।४ |
| „ „ कृष्णाजी विष्णु केळकर | १।८ |
| „ „ गणाजी वल्लद खानाजी पा. | ६।८ |
| मे. सयद नुरूद्दीन साहेब भख्याची | ६।८ |
| „ सुभानखा वल्लद बिलंदरखा मक्तेदार | ३ |
| „ शाबासखान तहशिलदार | २४।४ |
| „ अहमद अली जहागिरदार | ६ |
| रा. रा. बापुजी रंगनाथ ए. अ. क. | ६।८ |
| „ „ रामसेवक दीनदयाळ | ४ |
| „ „ रामप्रसाद लालचंद मास्तर | ६।८ |
| „ „ चिमणाजी त्रिंबक | ३९।१०।६ |
| „ „ शेषराव नागोराव देशपांडे | ३९।६ |
| „ „ देवराव सिताराम कु | ३९।१०।६ |
| रा. रा. जानकी सदाशिव बजारी | ८।६।८ |

## जाहिरात.

## पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळी.

### सन १८८०-८१ इसवी सालचा भाषण समारंभ.

पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचा चालू सालचा भाषण समारंभ सोमवार तारीख ३ माहे मे सन १८८० इसवीपासून सुरू होईल. समारंभाकरितां विषय व बक्षिसें वगैरे खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविलीं आहेत.

विषय.

पहिला:--हिंदुस्थानांतील एतद्देशीय संस्थानांत हल्लीं राज्यकारभार चालविण्याची पद्धत कोणत्या प्रकारची आहे, ती सार्वभौम इंग्रज सरकार, खुद्द संस्थानिक, व त्यांची प्रजा ह्यांच्या हिताचें वर्धन करणारी आहे किंवा नाहीं, व नसल्यास तींत कोणती सुधारणा केली पाहिजे.

दुसरा:- इंग्रजी विद्येचा फैलाव झाल्यापासून आपल्या लोकांच्या सामाजिक व गृहसंबंधी स्थितींत कोणता फेरफार झाला आहे, तो एकंदरीत हितावह आहे किंवा नाहीं, व नसल्यास तसा प्रकार न होऊं देण्यास काय तजवीज योजावी.

तिसरा:--समर्थ श्री रामदास स्वामीचा श्लोक

देहे त्यागितां कीर्ती मागें उरावी॥
मनीं सज्जना हेचि क्रीया धरावी॥
मना चंदनाचे परी त्वां झिजावें॥
परी अंतरीं सज्जनां नीववावें॥

या तिन्ही विषयांवर भाषण करणारांनीं कोणत्याही व्यक्तीस प्रत्यक्ष व परोक्ष रीतीनें अनुलक्षून बोलूं नये.

बक्षिसें व गुण.

वरील तीन विषयांतून इच्छेस येईल तो (एकच) विषय घ्यावा. पहिल्या विषयास रुपये ५० पन्नासांचें एक. दुसऱ्या विषयास रुपये ४० चाळीसचें एक, व तिसऱ्या विषयास मंडळीच्या फंडापैकीं रुपये १५ व कैलासवासी रा. ब. विष्णू परशुराम रानडे यांच्या स्मारक फंडापैकीं रुपये २५ एकूण रुपये ४० चें एक. अशीं एकंदर तीन बक्षिसें ठेवलीं आहेत. बक्षिसें मिळण्यास १०० गुणांतून निदान ५० गुण आले पाहिजेत.

उमेदवारांच्या समजुतीसाठीं सूचना

प्रत्येक भाषणास अर्धा तास दिला जाईल, परंतु अवश्य वाटल्यास ती वेळ कमी अथवा ज्यास्त करण्याचा अधिकार परीक्षकास आहे. भाषणांत विषयाची जुळणी, त्याचें प्रतिपादन व तें श्रोत्यांच्या मनांत उतरून देण्याची शैली या गुणांकडे विशेष लक्ष्य दिलें जाईल. परीक्षक ज्यांचीं भाषणें पसंत करतील त्या उमेदवारांनीं त्यांणीं केलेल्या भाषणाचा लेखी गोषवारा चिटणिसांस आणून दिला पाहिजे. उमेदवाराचें वय १८ वर्षांपेक्षां कमी नसावें. अर्ज तारीख २० एप्रिल सन १८८० चे आंत खालीं सही करणारांच्या नावें "पुणें सार्वजनिक सभेची कचेरी नगरकराचा वाडा विश्रामबागेचे वाड्या शेजारीं" ह्या पत्त्यावर पाठवावे. त्यांत प्रत्येक उमेदवारानें आपलें नाव, बापाचें नाव, अडनाव, धंदा, पत्ता, व गावचें नाव आणि त्यानें घेतलेला विषय अशीं स्पष्ट ल्याहावीं. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं. उमेदवारांनीं भाषणसमरंभाचे अगोदर एक दिवस चिटणिसास येऊन भेटावें, व जे न भेटतील ते भाषण करण्यास येत नाहींत असें समजून व्यवस्था करण्यांत येईल.

शार्ट ह्यांडरायटिंगबद्दल बक्षीस— सदरी लिहिलेले समारंभाचे वेळेस जीं भाषणें होतील तीं शार्ट ह्यांडरायटिंगनें ह्मणजे लाघवी लिपीनें जागचे जागीं सादंत उतरून घेण्याबद्दल कोणी यत्न केला असतां त्यास उत्तेजन येण्यासाठीं त्याचें लिहिणें पसंत ठरल्यास रुपये ७५ चें बक्षीस देण्यांत येईल. ज्या उमेदवारांची लिहून घेण्याची मर्जी असेल त्याणीं आपले अर्ज वर लिहिल्याप्रमाणें खालीं सही करणाराकडे पाठवावे.

पुणें तारीख २५ माहे फेब्रुवारी १८८०

मंडळीचे आज्ञेवरून.
सिताराम हरी चिपळोणकर.
भास्कर कृष्ण कोल्हटकर.
पुण्यांतील वक्तृत्वोत्तेजक मंडळीचे चिटणीस.

## नोटिस

प्राणसुक हरलाल बजाज दुकान अकोट वहिवाटदार रामचंद्र नथुराम परवार गुमास्ते यांस. साहेबलाल वल्लद रतनलाल परवार शिंदवाडेकर हल्लीं वस्ती अकोट याजकडून देण्यांत येते अशी कीं प्राणसुकदासजी आमचे सासरे असून बऱ्याच दिवसांपूर्वीं मैत झाले व त्यांचें कुटुंब ह्मणजे आमची सासू सुंदरबाई यांस आमचें कुटुंब एवढीच कन्या असून ते आह्मा उभयतांवर फार प्रेम करीत होते. सबब आह्मी आपले अजमास २५०० पंचवीसशें रुपयांचे डागिने त्यांचे जवळ धरवर ठेविले होते. व आह्मी शिंदवाड्यास होतो. सुमार दोन वर्षांपूर्वी सदर्हू सुंदरबाई आजारी झाल्या ह्मणून त्यांनीं आह्मांस पत्र पाठविलें. व त्या सरसेंच आह्मी तेथून निघून आलों पण आह्मी येण्याचे एक दिवसापूर्वीच त्यांचें प्राणोत्क्रमण झालें. व नंतर आह्मी येऊन पोंचलों. तरी सुंदर बाई आमची सासू मरणापूर्वीं त्यांनीं आपल्या सुनेस ह्मणजे मयनाबाईस व तुह्मास चार भलेमाणसांचे साक्षनिशीं सांगून ठेविलें कीं, २५०० रुपयांचे डागिनें आमचे धरवर आहेत ते आह्मांस देऊन शिवाय एक खानापुरचें शेत आणि रोख रुपये १०००, व सोनें तोळे ३०, इतकें आह्मांस व आमचे कुटुंबास देऊन आमचे कन्येचें लग्न करून द्यावें ह्मणून सदर्हू रकमा तुमचे स्वाधीन केल्या आहेत. सदर्हू ऐवज आह्मी अकोट मुक्कामीं आल्यावर तुह्मांस मागितला तेव्हां तुह्मी हां देऊं हां देऊं ह्मणून आजवर चाळविलें व आतां शीं तुह्मी दग्या फटक्याच्याही गोष्टी सांगूं लागले पण आमचे मालकीचा धरवर ऐवज देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर हो पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आमचा ऐवज आमचे स्वाधीन करावा व आमची पावती घ्यावी. वरील मुदतींत सदर्हू प्रमाणें न केलें तर कायदेशीर रीतीनें तजवीज करून वर लिहिलेला सर्व माल भरून घेऊं. या नोटिशीचा व फिर्यादीचा खर्च तुह्मापासून घेतला जाईल. कळावें. तारीख ५ माहे मार्च १८८० इसवी

(सही) साहेब लाल वल्लद रतन लाल परवार दस्तुर खुद्द.

## नोटिस.

येकोबा वल्लद विठोबा पाटील वस्ती मौजे मोमिणाबाद प्रगणे चांदूर तालुके मलकापुर यास खालीं सही करणार तुळसी मर्द येकोबा पाटील हल्लीं वस्ती मौजे फुली प्रगणें वडणेर भोलजी तालुके मलकापु जिल्हे बुलढाणें इजकडून नोटिस देण्यांत येते अशी कीं, मी तुमची लग्नाची बायको असून तुमचा मी घरसंसारही बरेच दिवस केला. सुमार आठ वर्षें झालीं तुह्मी मला वागवीत नसून मी आपले भाईचे जवळ आहे. मध्यंतरीं मी एक दोन वेळां तुझे घरीं बोलावण्यावांचून आलें पण तूं न वागवितां हाकून लाविलें. तरी मी तुमचे नावावर कर्ज काढून अन्नवस्त्राचा खर्च चालवित आहे. व तुह्मी मला घेऊन जाल अशा भरवशावर आजवर राहिलें. पण गतवर्षीं तुह्मी लग्नाची दुसरी बायको केली. ह्मणून आतां तुमचे नावावर बसणें व्यर्थ आहे असें वाटून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्या पासून आठ दिवसांचे आंत गेले आठ वर्षांत दरसाल पन्नास रुपये प्रमाणें खर्चास लागून ४०० चारशे रुपये कर्ज झालें आहे तें आणून देऊन मला घेऊन जावें. आगर मला वागविणें नसल्यास सदर्हू रुपये देऊन सोडचिठ्ठी द्यावी या दोहोंपैकीं एकही तुह्मी वरील मुदतींत न केलें तर मी दुसरा गंधर्वाचा घरठाव कायदेशीर रीतीनें करून सर्व खर्चाचे रुपये तुह्मापासून भरून घेईन मग तुमचें मजवर कांहीं चालणार नाहीं. वर लिहिले प्रमाणें मुदतींत मला घेऊन जावें, रुपये द्यावे, अगर फारकती द्यावी. हें न केल्यास तुमचें काय ह्मणणें आहे तें खुलासेवार नोटिसीनें ८ आठ दिवसांतच कळवावें. कळावें तारीख २ माहे मार्च सन १८८० इसवी.

(सही) तुळसाई मर्द येकोबा पाटील
बस्ती मौजे फुली प्रगणें वडनेर भोलजी तालुके मलकापुर जिल्हे बुलढाणें.

## नोटीस.

सखाराम वल्लद रामजी पिसाळ जात तेली राहणार मौजे चायगांव प्रगणें व तालुके मेहेकर यास खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येतेकीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न लागल्यास अजमासे २५ वर्षें झालीं आहेत. मी सज्ञान झाल्या नंतर दोन वर्षें तुझे घरीं राहिलें त्यानंतर तूं दुसरी पाटाची बायको केली त्याला पंधरा वर्षें झालीं आहेत. तेव्हांपासून मी मेहेकर येथें भावाचे घरीं राहत आहे. मध्यंतरीं मी आपणहोऊन तुझे घरीं आलें परंतु तूं मजला घरांत न राहुं देतां गांवांतही राहुं दिलें नाहीं. त्यामुळें जातीचे लोकांत प्रसंगानुसार. पंचायती झाल्या. परंतु तूं मजला नांदवीत नाहींस. याकरितां हल्लीं या नोटिसीनें कळवितें कीं ही नोटीस पावले दिवसापासून १५ दिवसाचे आंत मजला नेऊन मजसी संसार करावा. अगर मजसीं संसार करणें नसेल तर अन्नवस्त्राबद्दल सालीना ६० रुपये नेमणूक देऊन योग्य जामीन द्यावा. जर याप्रमाणें तुजकडून न घडेल तर मी रीतीप्रमाणें दावा करून मजवर जो तुझा लग्नसंबंधी हक्क आहे तो नाहींसा करून मी दुसरा नवरा क

रीनें मग मनवर तुह्मा लग्नाचे हक्काबद्दल दावा चालणार नाहीं कळावें तारिख १ माहे मार्च सन १८८० इसवी.

( सही ) सगुणा मर्द सखाराम तेली
निशाणी खुद.

---

नोटिस.

बाबुजी वल्लद नागोजी शिंपी रहाणार अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं अकोट एथील आमचे घरांत तुह्मी भाड्यानें रहाता आतां आह्मांस घराची अडचण असल्यामुळें आह्मी तुह्मांस घर खालीं करून मागितलें तर तुह्मी दिलें नाहीं सबब या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत घर खालीं करून द्यावें व नोटिसीचा खर्च द्यावा न द्याल तर रीतीप्रमाणें तजवीज केली जाईल. कळावें तारीख ७ माहे मार्च सन १८८० इसवी.

( सही ) सखाराम जयकृष्ण जती वस्ती
अकोट दस्तुर आबाजी
भोळानाथ जती.

---

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्याच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.

विनंति विशेष. आपलेकडे खालीं लिहिलेल्या चार ओळी पाठविल्या आहेत, त्यांस येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

एथील इं. मराठी शाळा स्थापन होऊन सुमारें १८ वर्षें झालीं, इतक्या दिवसांत आजच्याप्रमाणें पूर्वी कधीं थाट झाला नाहीं. कोणी परोपकारी अधिकाऱ्यांनीं एकादे सार्वजनीक सत्कृत्यास सहाय करण्याचें मनावर धरल्याशिवाय त्या खात्यांतील कोणत्याही हुद्देदारानें आपल्या खात्याचा उत्कर्ष होण्याविषयीं कितीही प्रयत्न केला तरीही जशा पूर्णस्थितींत तें यावें तसें आलेलें क्वचित आढळतें. त्याचप्रमाणें शाळाखातें सर्व प्रकारचे ज्ञानास मूळ पायाभूत आहे, इतकें सर्वांस माहीत असतांही याकडे लक्ष देणारे थोडेच आहेत; असें कितीएक प्रसंगीं अनुभवास आलेले आहेच; यास उदाहरण: या आमचे गावीं शाळा स्थापन झाल्यापासून मुख्यगुरू वगैरेनीं लोकांस पुष्कळ रितीनीं फायदे समजाविले. परंतु सर्व व्यर्थ झाले. आजरोजीं वार्षीक बक्षिसें वांटण्याचा समारंभ करविण्याविषयीं रा. रा. पुरुषोत्तम गणेश हेडमास्तर यांनीं रा. रा. बापूजी रंगनाथ ए. अ. कमिशनर यांस सुचविल्यावरून त्यांनीं गांवांतील सभ्य लोकांस निमंत्रणें देऊन समाज करविला. अशा कृत्यास सहाय करण्यास यांनीं अवतारच घेतला आहे असें वाटतें; जेथें जेथें हे गेले तेथें तेथें त्यांनीं अशीं सत्कृत्यें करून आपलें नांव गाजवूनच सोडिलें. उदाहरणार्थ" कारंजे" घेऊं. तेथील शाळा पूर्वी वाईट स्थितींत होता ती बापूसाहेब यांचे योगानें इतक्या उत्तम स्थितीस [illegible] कीं तशा शाळा या वऱ्हाड प्रांतांत थोड्याच सांपडतील. या सद्गृहस्थांनीं या समारंभाकरितां बरीच मंडळी जमविली, त्यांत रा. रा. शंकरराव राजे, उदाराम, रा. रा. गोपाळ रघुनाथ वकील, रा. रा. माधवराव यशवंतराव राजूरकर, काजी सरफराजअली जाहगिरदार उकळी, मेसर्स पेस्तमजी रस्तमजी, मनवर अली फिदाअली, आदिकरून शेटसावकार, सरकारी नौकर, व इतर सभ्य गृहस्थ मिळून सुमारें १५० लोक जमले होते. परंतु लिहिण्यास दुःख वाटतें कीं आमचे लोकप्रिय तहसलिदार यांच्या पुतण्याचें अकालीं मरणानें, त्यांचें मात्र येणें झालें नाहीं. या प्रमाणें सर्व समाज जमल्यावर रा. रा. बळवंत श्रीपत फर्स्ट असिस्टंट मास्तर यांनीं अध्यक्षस्थान बापूसाहेबांनीं स्वीकारावें अशी सूचना केली व यांचे ह्मणण्या प्रमाणें सर्व सभासदांनीं [illegible] दिल्यावर बापूसाहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. नंतर या शाळेच्या पूर्वीच्या व हल्लींच्या स्थितीविषयीं सर्व लोकांचे मनावर चांगला ठसा उठविण्या जोगें रा. रा. भाऊराव यादव क्लार्क नित. डे. इन्स्पेक्टर यांनीं सुरस भाषण केलें. नंतर सरकारांतून मुलांस बक्षिसें देण्याकरितां मिळालेलीं पुस्तकें थोडीं होतीं ती उणीव नाहींशी करण्याकरितां मंडळींत वर्गणी व्हावी असें बापुसाहेबांनीं प्रदर्शित केल्यावरून रकम रु० ९२॥ चो जमली. त्यापैकीं २० रु० दुकांकडे, ९ रु० मिठायाकडे, ५ त्वड्या काच्याकडे, १२ रु० नवीन घड्याळाकडे व बाकीचे नवीन कसरतीचे सामानाकडे खर्च करावे असें ठरलें. पुस्तकें वाटण्यापूर्वी शाळेतील कांहीं मुलांनीं सुरस कविता ह्मटल्या, व मुलींच्या शाळेतील कांहीं मुलींनीं सुंदर गाणीं सुरावर ह्मटलीं तीं ऐकून सर्व सभासदांस आनंद वाटला. नंतर बक्षिसें वाटल्यावर रा. रा. नारायण बल्लाळ अ. मास्तर यांनीं बापुसाहेब प्रभृतींचें स्तुतिपर सुरस भाषण केल्यावर मिठाई वाटली. व त्याच वेळीं काजी सरफराज अल्ली यांणीं वर्गणीशिवाय २ रुपयांची मिठायी वांटली. नंतर पानसुपारी, अत्तर गुलाब दिल्यावर सभा विसर्जन झाली. ही झालेली हकीकत आपणास कळविली आहे. कळावें तारीख ४ माहे मार्च सन १८८० इसवी.

मुक्काम वाशीम

सभेस जाणारा
एक " क्ष "

---

## वऱ्हाडसमाचार.

मिति माघ कृष्ण १२ शके १८०१

---

## अफगाणिस्थान.

अफगाणिस्थान प्रकरण सुरू होऊन पुष्कळ दिवस झाले. ३।४ महिन्यापूर्वींच वाटलें होतें कीं तिकडे सर्व शांतता झाली. व आतां तरवारीचें राज्य जाऊन पुस्तकाचें राज्य सुरू होईल. परंतु प्रतिदिवशीं गडबडीचींच वर्तमानें येतात त्यावरून दिसतें कीं, तिकडील लोक निवळ दांडगे आहेत व गैरसमजुतदार आहेत. ब्रिटिश सरकारचा प्रभाव जाणत नाहींत. एका ठिकाणीं गडबड झाली ह्मणजे सरकारचें सैन्य चहोकडून तेथें जाऊन बंदोबस्त करितें इतक्यांत दुसरे ठिकाणीं गडबड सुरू होते. अफगाणि प्रजा कडवी असून खवळलेली आहे. तिचें सर्वत्र समाधान अजून होत नाहीं. सरकारानें साम, दान, दंड, भेद असे सर्व प्रकार चालविले आहेत तेणेंकरून सरदार व कांहीं लोक सरकारास वश झाले आहेत व त्या योगें फौजेस अन्नसामग्री करतां येते. व शत्रूच्या शासनाच्या योजना करितां येतात. बाकीं बंडाव्याचा समूळ गड्डा अजून उपटला नाहीं व तो कधीं उपटेल हें निश्चयपूर्वक सांगवत नाहीं. हल्लीं तिकडील वर्तमानें आहेत तीं पुढें प्रमाणें:—

सरकारची फौज गिझनीवर जाऊन तो किल्ला सर करणार असें वर्तमान लाहोरच्या पत्रांतून लिहिलें होतें परंतु तें खरें नाहीं अशाबद्दल पार्लमेंट सभेंत नुकतेंच भाषण झालें आहे. हिरातवर स्वारी करून तो किल्ला सर करावा किंवा इराणच्या शहास देऊन त्याशीं सौरस्य राखावें अशीं वाटाघाट चालू आहे. प्रस्तुत हिराती व अफगाणी लोकांच्या लढाया चालू आहेत. हिरातचा अयुब व अफगाणी सरदार अबदुल रहमान यांजमध्यें पत्रव्यवहार चालू आहे व अयूबनें अबदुल यास लिहिलें आहे कीं, शहा हा हिरातच्या किल्ल्याकरितां ९ कोटि रुपये देतो आहे. त्यास अबदुलानें लिहिलें कीं रुपये घेऊ नयेत किल्ला राखून ठेवावा असें वर्तमान आहे परंतु यांत तथ्य किती आहे तें ठाऊक नाहीं. अबदुल जान यानें गिझनीहून मीर बुचा यास सैन्यासहित काबुलावर जाण्याविषयीं कळविलें आहे व तो लवकरच तिकडे येईल अशी खबर आहे. त्याजवळ हल्लीं १३ तोफा, घोडस्वाराच्या दोन पलटणी, व ४००० पायदळ आहे व आणखी तो फौज जमवीत आहे असें ह्मणतात. अबदुल रहमान तुर्कस्थानांत कांहीं कारस्तानाकरितां गेला आहे तो तिकडेसच असल्याची खबर आहे. काबुली लोक गुप्त घाले घालतात. ले. लमस्डन नावाचे आफिसर तंबूंत निजले असतां एका काबुलीनें आंत जाऊन त्यावर शस्त्र चालवून त्यास ठार केलें. तसेच एक आफिसर रस्त्यानें जात असतां मागून एका १३ वर्षांच्या काबुलीनें तरवारीनें त्यावर वार केला व दुसरे एका आफिसरावर एका काबुलीनें डोंगरावरून अडून गोळी घातली. लोगरमध्यें जुने अफगाण शिपाइ आहेत त्यांची पुन्हा भरती करण्याविषयींच्या यादी होत आहेत. बारिकाब गावा जवळ अर्धे मैल तारायंत्राची तार शत्रूनीं तोडून टाकली व खांब पाडून मोडून टाकिले. कोहिस्थानी लोक व लोगर कडील मल्लीक हे जमीनीचा सारा व सूल करिताहेत व जुन्या शिपायांच्या फौजा जमवीत आहेत असें वर्तमान आहे.

ब्रिटिश सरकारास मिळालेले इमानी ह्मटलेले कोहिस्तानी सरदारांतून कांहीं बेमान झाले. व त्यांनां लोकांनीं लुटून सफा केलें. जिवे मारण्याचें मात्र शेष राहिलें आहे तें एवढ्याच करितां कीं त्यांनीं ब्रिटिश फौजेशीं दळणवळण ठेवणार नाहीं अशी कुराणावर हात ठेवून शपथ घेतली आहे ह्मणून. ३ किल्यामध्यें धान्याचा मोठा सांठा आहे अशी खबर मीर सयदखान यास लागल्यावरून त्यानें जाऊन ती सर्व सामुग्री जाळून टाकिली. थळ प्रांताकडे वजीरी लोक त्रास देत आहेत अशीही खबर आहे.

याप्रमाणें अफगाणीस्थानांत तूर्त बखेडे चालू आहेत. हवा फार थंड आहे. कांहीं ठिकाणीं गुडघ्या इतकाले बर्फाचे थर आहेत. सरकारानें तिकडे असलेल्या दर नेटिव पायदळ पलटणींतून ६० लोक व एक सरदार निवडून काढून त्यांची घोडेस्वारांचीं पलटणें करण्याची तजवीज योजिली आहे. त्यांनां वाहनें इकडून जाताहेत त्यांपैकीं देणार. फारेन सेक्रेटरी मि. लायल साहेब लवकरच काबुलाकडे जाजार आहेत. कुरमव्यालीमध्यें फौजेंत कांहीं रोग होऊन नेटिव व युरोपियन लोक मरत आहेत. काबुलजवळ सरकारानें कांहीं नवीन घरें बांधिली होतीं त्यांस ता. २७ फेब्रुवारीं रोजीं आग लागून तीं जळालीं. त्याचें कारण समजलें नाहीं. जनरल मासे नावाचे सरदार लढाईवर असतां त्यांच्या फौजेंतील तोफा डिसेंबर महिन्यांत शत्रूनीं हस्तगत केल्या याजबद्दल ते दोषी ठरले व त्यांस आफगाणीस्थानांतून कम्यांडर इन् चीफ साहेब यांनीं परत बोलाविलें. तिकडील मुख्य सेनापति जनरल राबर्टस यांचीं सर्व कामें व बातबेत वरिष्ठ अधिकाऱ्यास पसंत होत आहेत व त्यांकरितां त्यांची मोठी तारीफ झाली आहे. येणेंप्रमाणें अफगाणांस्थानाकडील खबरा आहेत.

---

## मोठाल्या कामदारांचे पगार कमी करणार.

हिंदुस्थानांत खर्चाचें मान वाढत जाऊन देशस्थिति बिघडण्याच रंगास आली, ह्मणून सरकार कर वाढवितें. छोटे कामदार लोकांचे पगार कमी करितें, व दुसऱ्या कित्येक लहान सहान गोष्टी करितें पण हजारो रुपये ज्यांस पगार त्यांच्यांत कांहीं कमी करण्याचा विचार करीत नाहीं अशा बद्दल बराच बोभाटा आहे. सबब ती गोष्ट हल्लीं सरकारानें मनावर घेतली आहे असें दिसतें. पार्लमेंटच्या कामन्स सभेंत कायद्याचें बील प्रविष्ट झालें आहे त्यांत हिंदुस्थानचे गवरनर जनरल, मद्रास व मुंबई एथील गवरनर व त्यांचे कौन्सलदार, हिंदुस्थानचे कम्यांडर इन चीफ, व मुंबई आणि मद्रास एथील कम्यांडर इन चीफ यांचे पगार व अलावन्स जे आहेत त्यांत कांहीं कमी करावे असा अधिकार त्या बिलाच्या संबंधानें प्रधान मंडळीनीं दिला आहे. तेव्हां त्याचा विचार काय होतो तें पहावें. खरेंच या कामदारांचे पगार मोठमोठाले आहेत त्यांतून थोडथोडे जरी कमी केले तरी सरकारचा पुष्कळ नफा होणार आहे शेपन्नास छोटे कामदारांच्या उत्पन्नांतील काटकसर या पांच दहा मोठे कामदारांच्या काटकसरी इतकी देखील होणार नाहीं. सबब निघालेला विचार फार चांगला आहे व त्याप्रमाणें अवश्य व्हावें असें आह्मी इच्छितों. हल्लीं या अधिकाऱ्यांचे पगार आहेत ते येणेंप्रमाणें:—

व्हाइसराय साहेबांस २,५०,००० रुपये सालीना पगार आहे व त्या शिवाय एक लक्ष वीस हजार रुपये अलावन्स आहे. मुंबईचे व

मद्रासचे गवरनरांस प्रत्येकी पगार दरमहा १०६६६ रु. १० आणे ८ पै आहे. बंगालचे, वायव्यप्रांतचे, आणि पंजाबचे लेफ्टिनेंट गवरनर यांस दरमहा पगार प्रत्येकी ८३३३ रु. आहे. हिंदुस्थानचे कम्यांडरइन चिफ यांस दरमहा पगार ८३३३ रुपये ५ आणे. ४ पै. आहे. मद्रासचे कम्यांडर इनचिफ यांस ५७८९ रु. १० आणे ६ पै. पगार आहे मुंबईच्यास ५८३३ रु. ५ आणे ४ पै आहे. व्हाइसराय साहेबाच्या कौन्सलांतील ६ आर्डिनरी मेंबर यांस प्रत्येकी ६६६६ रु. पगार आहे. दुसरे ११ अडीशनल मेंबर यांस प्रत्येकीं २६०० रु. पगार आहे. मद्रासचे २ व मुंबईचे २ कौन्सलदार यांस प्रत्येकी ५३३१ रु. ५ आणे ४ पै. पगार आहे.

सदरील बिलांत हाय कोर्टाचे जड्ज तसेच रिविन्यु कमिशनर यांचे न्यूनाधिकाविषयीं कांहीं लेख नाहीं. जडजाचे पगार बरेच अधिक आहेत त्यांत रिडकूशन व्हावें व रिविन्यु कमिशनर अजीबाद काढून टाकावे असें टाईम्स आफ इंडियाचें ह्मणणें आहे. व बिशप ह्मणजे धर्माध्यक्षयांचे पगार कमी करणार ते करूं नयेत असेंही सदर्हू पत्रकर्ते सुचवितात.

---

ऐर्लंडांतील दुष्काळ

काळ दुष्काळ हा सर्वत्र लागूं आहे. सर्व संपन्न अशा युरोपांतील ऐर्लंड देशांतही दुष्काळ पडून तेथील प्रजा मोठ्या संकटांत पडली आहे. त्यांस सहाय्य व्हावें ह्मणून जिकडे तिकडे वर्गणी फंड सुरू आहेत. मि० पार्नेल साहेब तर अमेरिकेस जाऊन प्रयत्न करीत आहेत. व त्यांचे बोलणें ऐकून घेण्याकरितां युनैटडस्टेटचे पार्लमेन्ट विशेष सभा भरविणार आहे. अशा प्रकारचे शतशहा उपाय तिकडे चालू आहेत.

या सदरील दुकाळाच्या संबंधानें आमचे हिंदुस्थानांतही सर्वत्र राजे रजवाडे व संस्थानीक यांजकडून सहायार्थ हजारो रुपयांचे आंकडे पडत आहेत ते असे:—

आमचे हैदराबादेस ५०००० रु. पैकी खुद निजाम सरकारानीं २००००, नेक नामदार अमीर काब यांनीं १००००, व नबाब सर सालरजंग साहेबांनीं ८००० या शिवाय इतर १२००० एकूण पन्नास हजार रुपये जमा झाले, त्याचप्रमाणें जुनागडचे नबाब, बरद्वानचे महाराज, कलकत्याचे राजे कोमळकृष्ण मद्रासचे रामस्वामी यांणी एक एक हजार, म्हैसूरचे महाराजांनीं ५००० इत्यादिकें करून लक्षावधि रुपये जमा होऊन ऐर्लंडास जात आहेत. या आपल्या देशांतलि परोपकाराचे व औदार्य बुद्धीचें आपल्यास मोठें भूषण समजलें पाहिजे.

आमचे हिंदुस्थानांतील दुष्काळाचे वेळीं अशा प्रकारें सहाय मिळालें असतें तर आमचे देशाची गेले दोन तीन वर्षांत इतकी वाताहत झाली नसती असे पुष्कळांचे उद्गार अलीकडे बाहेर येऊं लागले आहेत पण त्याला उपाय नाहीं. आमचेकडे धार्मीक व उदार लोक नाहींत असें नाहीं. पण प्रजेचीं दुःखें, संकटें व अनर्थ वेळच्यावेळीं व जशाचीं तशीं अशा राजे रजवाड्यांच्या व दानशूरांच्या समोर आणणारांची आमचे लोकांत उणीव आहे ह्मणून त्यांचे हातून उपयोग होत नाहीं, नाहींपेक्षां आमचे देशांत अजून असे हजारो दाते आहेत कीं, जे एकामुठीनें हजारापासून पन्नास हजार रुपयेपर्यंत सत्कर्मीं खर्च करण्यास सिद्ध असतात. ही मोठ्या संतोषाची गोष्ट समजली पाहिजे.

---

## वऱ्हाड.

थंडी सकाळीं मात्र थोडी असते बाकी दिवसभर आणि रात्रीं गर्मी होऊं लागली आहे. ऊन कडक पडतें.

---

मे० जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी एथेंच आहे.

---

मे० जोन्स साहेब कामिशनर एप्रिल महिन्याचे आरंभीं तीन महिन्यांचे रजेवर विलायतेस जाणार आहेत.

---

डिपुटी कमिशनरचे क्लार्क रा. रा. कृष्णराव हरी कोल्टकर यानीं दोन महिन्यांची हक्काची रजा मागितली आहे. त्यांचे जागीं रा. रा. हरी रामचंद्र रोहणखेडकर बी. ए. अकोला हायस्कुलांतील असिस्टंट मास्तर यांस आफिशियेटिंग नेमणार आहे

---

वाशीम—डिपुटी कमिशनर साहेबांची स्वारी पुसद तालुक्यांत गेली आहे. इज्युकेशनल इन्स्पेक्टरही पुसद तालुक्यांत आहेत. डिपुटी इ. इन्स्पेक्टर मंगरूळपीर तालुक्यांत फिरत आहेत एथील सिविल सर्जन यांची स्वारी उमरखेडाकडे गेली आहे. १०।१२ दिवसांपासून एथें एक हिंदु स्त्री नाटक आलें आहे. त्यांत तीन स्त्रिया आहेत. ताई यत्तीण नावाची एक मास्तरीण यांत फार हुशार आहे. आजपर्यंत एथें जीं नाटकें आलीं त्यांत हें चांगलें आहे.

---

एथील लोकलफंड इंजिनियर यांनीं कान्हेरी कडच्या डोंगरांतून नळाचें पाणी अकोल्यास थोड्या खर्चानें आणण्याची तजवीज चालविली आहे. त्याविषयीं अधिक माहिती आह्मी पुढें लिहू.

---

रेलवेकडील एथील इन्स्पेक्टर मि० मेकनाटन यांनी कंपनीचे कांहीं सामान पुण्यास कोणास दिल्याचा तेथील पोलिसास पत्ता लागला त्यावरून प्रकरण चालू आहे. इकडून साक्षिदार वगैरे पुण्यास गेले आहेत. स्टोरमधून सामान बाहेर गेलें तस्मात असिस्टंट रेसिडेंट इंजिनियर आफिसांतील क्लार्क व शिपाई यांचहि या कामीं हात असल्याविषयीं पोलिसास वहिम आहे. अखेरीस काय निष्पन्न होतें पाहावें.

---

एथील पोलिस इन्स्पेक्टर रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी यानीं अगरच्या खुनाचें कामीं फार हुशारी केली असें जुडिशियल कमिशनर साहेबांनीं सेशनचे चौकशींत लिहून ठेविलें आहे हें ऐकून आह्मास फार संतोष होतो. हैसांग जवळची एक राहाजणीही त्यांनीं पकडून दोन आरोपी मुद्दे मालानिशी एथें आणिलें आहेत.

उमरावतीचे वकील रा. रा. रामचंद्र त्रिंबक यांनीं स्यांपर्टी करारानें ह्मणजे आपले स्वतांचे खर्चानें पक्षकाराचा दावा चालविला असें आढळल्यावरून त्यांची सनद रद्द करावी अशी जुडिशियल कामिशनर साहेबांनीं रेसिडेंट साहेबांस शिफारस केली आहे असें कळतें.

---

रेजिस्ट्रेशन खात्याकडे आणखी एक इन्स्पेक्टर १२५ रुपयांचा नेमणार असें उर्दू अखबारकर्त्यांस समजलें आहे.

---

मेजर ग्रांट साहेब इन्स्पेक्टर जनरल झाले त्यांचे संबंधानें खालीं वर्ग झालेला प्रसिद्ध झाला होता तो रद्दकरून नवीन अशी प्रसिद्धी झाली आहे कीं मे० थांपसन साहेब आफिशियेटिंग सेकंड असिस्टंट कमिशनर हे आफिशियेटींग फर्स्ट असिस्टंट कामिशनर झाले.

---

कारंजा व दारव्हायादरम्यानच्या सडकेकरितां मूर्तिजापूर व दारव्हा तालुक्यांतील १५ गांवची थोडथोडी जमीन पाहिजे होती तीं जकरितां सरकारानें रेसिडेन्सी आर्डरमध्यें जाहिरात दिली व ती घेतली.

---

वरूडचे सबरजिस्ट्रार खंडो अनंत यांस बरतर्फ केलें त्याचे जागेवर रा. रा. रामराव वैजनाथ यांस नेमिलें.

---

मेळनाटचे तहशिलदार रा. रा. परशराम गणेश यांस वऱ्हाडांत फर्स्ट ग्रेड सिविल जडजाचे व सेकंड क्लास माजिस्त्रेटचे अधिकार दिले.

---

उमरावतीच्या म्युनिसिप्यालिटीनें केरोसीन तेलाचा ४ डब्यांहून अधिक संग्रह एकाकडे असूं नये असा ठराव (बाय ला) केला आहे पण तसें तेल ठेवण्यासाठीं जागा तयार होईपर्यंत हा ठराव अमलांत येणार नाहीं.

---

कमिशनर साहेबाच्या आफिसचे हेडक्लार्क यांस यापुढें सुप्रिंटेंडेंट ह्मणत जावें असा ठराव झाला आहे

---

मि. डनलप साहेब थर्ड क्लास असिस्टंट कामिशनर होते ते विलायतेहून परत आल्या-तारखेपासून सेकंड असिस्टंट कमिशनर झाले.

---

अकोला म्युनिसिप्यालिटीची हद्द वाढविण्याचा विचार होऊन लिहून गेलें होतें त्याप्रमाणें रेसिडेंट साहेबाकडून हद्द मंजूर होऊन पहिले तारखेच्या रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झाली आहे.

---

अडगावचे एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रा. रा. केशवराव महिपत खारकर यांस त्या गावांत ३४ वे कलमाचे गुन्हे समरी ट्रायलचे रीतीनें पहाण्याचा अधिकार दिला.

---

मे. थामसन साहेब असिस्टंट कामिशनर २९ वे तारखेपासून ३ महिन्यांचे हक्काचे रजेवर जाणार आहेत.

---

बोर्डींग पैकीं एक मुलगा मैदानांत लघुशंकेस बसला होता व तिकडून डिपुटी कामिशनर मे० फिटझरल्ड साहेब जात होते त्यांनीं त्या मुलाजवळ जाऊन त्याचें नाव विचारून घेतलें. व ३४ कलमाप्रमाणें त्यावर खटला करविला. मुलास पुढें आठ आणें दंड झाला. त्या ठिकाणीं लघुशंकेसाठीं अडोशाची सोय नाहीं ती लवकर करविली जाईल तर बरें होईल. उघड्यावर लघुशंकेस बसणारांनीं सडकेवरून मनुष्यें चाललीं आहेत नाहींतें हें पहाणें अवश्य आहेत.

---

शिगाव एथें म्युनिसिपाल आक्ट सुरू करण्याच्या इरादानें सरकारानें रेसिडेन्सी आर्डरमध्यें जाहिरात दिली आहे. तेथील राहाणारांस कांहीं हरकत दाखविणें असल्यास ६ आठवड्यांत हैदराबादेस रेसिडेंट साहेबाचे वऱ्हाडचे सेक्रटरी यांस लिहावें.

---

गेल्या गुरुवारीं मे० राईट सा० उमरावती येथील पोलीस सुप्रिंटेंडेंट हे येथून विलायतेस जाण्या करितां मुंबईस गेले.

---

गेल्या बुधवारीं उमरावती येथील पोलीसच्या ताब्यांतून एक कैदी पळून गेल्याचें एकतें. अशी गलती पोलिसा कडून वरचेवर कां होते हें समजत नाहीं.

नरहरदास नांवाचा एक मनुष्य बदमाषापैकीं ज्यास पूर्वीं शिक्षा झाली होती त्या जवळ पुन्हा घातक शस्त्र सांपडलें ह्मणून त्यास माजिस्ट्रेटानें दोन दोनशे रुपयांचे दोन जामीन द्यावे ह्मणून ठरविलें व ते न दिल्यास ३ वर्षें शिक्षा भोगावी असें ठरविलें. सदर्हू मनुष्यास जामीन मिळाले नाहींत ह्मणून तो कैदेंत गेला असें समजतें.

प्र. सि.

---

## वर्तमानसार.

मुंबईचे गवरनर सर रिचर्ड टेंपल साहेब विलायतेस पार्लमेंट सभेंत मेंबर होणार व त्यांचे जागेवर राईट आनरबल सर जेम्स फर्ग्युसन बारोनेट हे विलायतेहून येणार आहेत.

हिंदुस्थान सरकारचें बजेट— गेल्या आठवड्यांत मंगळवार ता० २४ फेब्रुवारी रोजी हिंदुस्थान सरकारचे येत्या सालचें बजेट ह्म० जमा खर्चाचा अंदाज प्रसिद्धीस आला तो फिनान्झियल मिनिस्टर सर जान स्ट्राची यांनी वाचला. त्यावरून समजतें कीं, गुदस्ता ( १८७८--७९ ) सर्व खर्च जाऊन १,३०,००,००० रुपये शिलक राहील असा अजमास होता, पण राहिली २०४४३९१० रु; ह्म. ७४४३९१० रु. ज्यास्त. चालू ( १८७९– ८० ) सालीं वसूल व खर्चही अजमासापेक्षां ज्यास्ती होईल, ह्मणजे वसूल ६०,५८,३०,००० व खर्च ६७,४६,४०००० रु०; ह्मणून अंदाजाप्रमाणें १,३५,९०,००० रु० तूट न येतां ११,९०,००० रु० शिलक राहील. येत्या सालीं ६६,७४,६०, ००० रु० वसूल व ६६,३२,९०,००० रु० खर्च होईल, व ४१,७०,००० रु० शिलक राहील, व कर्ज कांढावें लागणार नाहीं, असा अजमास आहे.

प्रख्यात तात्याटोपेचा भाऊ बापू टोपी हा गेले दिसेंबर माहिन्यांत बारामती एथें वारला असें समजतें.

गुलाम हैदर यांनीं १६ लाख रुपये अबदुल रहमान यांजकडे पाठविले व बदकशान एथील फौज अबदुल रहमान यांस राजी आहे असें ता. १९ चे तारेवरून समजतें.

मुंबईचे पास झालेले ग्राजुयेट मि. फ्रामजी रतनजी हे विलायतेंत मेडिकल सर्विसच्या परीक्षेमध्यें पास झालें असें समजतें.

काबुलाकडेस आणखी ४,००० फौज पाहिजे आहे असें ह्मणतात.

वर्तमानपत्रासंबंधी नवीन नियम हुकुमावारून छापले गेले असें स्टट सेक्रेटरीचें ह्मणणें आहे असें समजतें.

गरम कपडे काबुलकडेस देणगी दाखल पाठविण्यांत आले होते त्यांजपैकीं एकशें एकेचाळीस गठ्ठे शत्रूंनीं गंडमक एथून जगदलक एथें जात असतां हल्ला करून नेले.

पुण्याचे आसपास पुन्हा दरवडे पडण्याचा संभव आहे याजकरितां सरकारानीं बंदोबस्त वेळेवर ठेवावा अशी डेकनस्टारकेंत सूचना करितात.

निहिलिस्ट प्रकरण—रशियाचे बादशहा झार याचे बिछान्याखालीं चमत्कारीक पत्र तारीख २० दिसेंबर रोजीं निहिलिस्ट सहीच सांपडलें. यांतील तात्पर्य बालेटर पत्रांतील एथील पत्रांत घेतलें होतें त्याजवरून रशियामध्यें निहिलिस्ट मताच्या लोकांचे विचार किती भयंकर आहेत हें समजण्याकरितां एथें देतों:—

आपण पाचवे वेळीं वाचला गेला आहां त. भूतदयेचे संबंधाचे नियमाप्रमाणें आपणावर पांचवेळ प्रसंग येणार असें ठरलें होतें. याजबद्दल आपण अद्यापि विचार करीत नाहीं. आमचा अम्मल व निश्चय आपण जाणतच आहात याजकरितां सहावे प्रसंगाकरिता हुशार असा. तुह्मी महान राजे ह्मणविण्यास इच्छितां काय? आज जे आपणास मारण्यास प्रवृत्त झाले आहेत ते मारणारे न होतां बुद्धिवाद देणारे असें ह्मणविण्यास इच्छिता काय? मनुष्य व्हा, जुल्मी राजे होऊं नका. मनुष्यास जे ईश्वरी नियमाप्रमाणें हक्क आहेत ते ( स्वातंत्र्य ) त्यांस मिळूं द्या. आह्मी ह्मणजे तुह्मास मारावें असें नाहीं. परंतु राजकीय संबंधानें विचारच होय. जावत्कालपर्यंत आपलें वर्तन बदलत नाहीं तावत्कालपर्यंत आह्मास जें करणें तें करणें कायमच राहणार आज तुह्मी वांचला पण उद्या मारले जाल. आमचा जीव घेतला अगर आह्मावर तोहमत आली तरी आमचें शस्त्र कायमच राहणार. आपण अमलाचे जोरानें काम करिता पण आह्मी न्याय मार्गानें काम करित आहित. अशा प्रकारानें चालण्याचा निश्चय केला आहे आणि हा हेतु सफल होईल. क्रिश्चानिटीचा मुख्य शिष्य अशा कामाकरितांच मेला गेला त्याचेच जाण्यानें रोम राज्य लयास पावलें. सावध व्हा आणि विचार करा.

आतां अशा चमत्कारिक प्रकारचें पत्र असे नाजूक ठिकाणीं जावयाचें हें नवलच समजावयाचें. जेथें सर्व देवता पाणी भरीत आहेत व ज्याचे राज्याचा ध्वनी सर्व जगभर पसरली आहे तेथें असें कसें व्हावें हें समजत नाहीं.

ठाण्यास नळाचें पाणी आणण्याचा विचार आहे.

मुंबई एथील हायकोर्टांतील रजिस्ट्रार मि. ए. सी. वाट यांची धारवाडचे जज्जाचे जागीं नेमणूक झाली असून त्यांचे जागीं मि. हार्सिंकग यांस नेमिलें आहे.

मुंबई एथील मीठखात्याचे असिस्टंट कलेक्टरचे जागीं मि. नारायण भिकाजी जोगळेकर यांची नेमणूक झाली असून त्यांनी गेल्या ता० ११ रोजीं सदर्हू कामाचा चार्ज घेतला.

आगबोट बुडाली— ता० २९ फेब्रुवारी रोजीं रात्रौ कराचीस जाणारी स्पेशल आगबोट सुरतेजवळ बुडाली. तिजवर सुमारें ५०० मनुष्यें होतीं. पैकीं फक्त ५०।६० वाचलीं असें कळतें.

बडोदें एथील खानगीच्या नाजूक कामावर रा. ब. रावजी विठ्ठ पुणेंकर यांचे बंधू मि. शंकरराव यांची कायमची नेमणूक झाली असें कळतें.

नेपाळचे सरदार जीतजंग हे तंजावरचे राणीचे पुतणीशीं विवाह करण्याकरितां दोन ेलोकांनिशी मद्रासेस गेले आहेत.

कोल्हापुरास नवीन कालेज स्थापन होणार ह्मणून बातमी आहे.

रुमेलिया प्रांतांतील इंग्लिश सैन्यापैकीं एक कर्नेल व त्याची बायको यांस ग्रीक दरवडेखोरांनीं सालेनिका एथें पकडले असून त्यांनीं आपणास अमूक पैसे द्या नाहीं तर तुह्मास ठार मारूं ह्मणून दहशत घातली आहे.

गेल्या तारीख ११ रोजीं जोधपुरचे महाराजांस पुत्ररत्न प्राप्त झालें.

गेल्या दशमीस पुण्यांत सुमारें २५० लग्नें झालीं. याच दिवशीं तेथें एका ३५ वर्षाच अंधळया भिकाऱ्याशीं एका सहा वर्षांचे मुलीचें लग्न लेकांनीं वर्गणी करून लाविल्याचें कळतें.

कोणी ग्रीक लोक ब्रिटिश सरकारची प्रजा झालेले यास त्यांनीं टर्कीच्या सुलतानास ठार मारण्याचा यत्न केला या आरोपावर कैद करण्यांत आले आहे.

मागील आठवड्यांत बंगाल इलाख्यांत बहुशा सर्व ठिकाणीं चांगला पाऊस पडला त्या योगें नांगरण्याचे कामीं व हल्लीं उभे असलेल्या पिकासही पुष्कळ उपयोग होईल असें ह्मणतात.

हिराताकडे काबुली व हिराती पलटणीची लढाई होऊन काबुली पलटणीचा पराभव झाला. इं. प्र.

म्हैसूरचे महाराज राज्यकारभार आपल्या हातीं घेण्यास काचकूच करतात ह्मणून वदंता उठली आहे ही कितपत खरी आहे कोण जाणे. खरी असल्यास त्यांस कांहीं तरी चमत्कारिक कारण असलें पाहिजे. या राज्याची व्यवस्था परिणामीं कशी होते याजकडे पुष्कळांचे डोळे लागून राहिले आहेत.

रशियामध्यें निहिलिजम ह्मणजे ईश्वर नाहीं न हक्क नाहीं असें मत याचा बराच फैलाव होत चालला आहे आणि त्या मताचा प्रवेश फौजेंतील लोकांत व्हावयास लागला आहे. या संशयावरून किति एक सरदारास कैद केल्याची बोलवा आहे.

म्हैसूरचें राज्य तेथील महाराजांच्या स्वाधीन ता० १ जानेवारी सन १८८१ पासून करावयाचें ठरलें आहे असें ह्मणतात

सु. प.

कलोत्तेजक मंडळी इंदूर एथें स्थापन झाल्याचे कळतें. यांस श्री. शिवाजीराव महाराज बाळासाहेब यांचा पूर्ण आश्रय आहे.

मि० जोन्स आरनालड या युरोपियनानें आपले स्वयपाक्यास खोलींत विन परवानगीनें आला ह्मणून जबरदस्त मारलें. त्यानें फिर्याद केल्यावरून त्यास १० रुपये दंड झाल्याचे कळतें.

पुण्याचे आसपास पुन्हा दरवडे पडण्याचा संभव आहे याजकरितां सरकारांनीं बंदोबस्त वेळेवर ठेवावा अशी डेकनस्टारकर्ते सूचना करितात.

श्री० पंतसचीव साहेब यांनीं ४०० रुपये विश्रामबागची जळालेली इमारत बांधण्याकरितां दिल्याचें समजतें.

युनायटेड स्टेटसमध्ये आतां ७५०० वर्तमानपत्रें आहेत. सन १७२२ सालीं फक्त दोन होतीं.

पुढील मार्च अखेर एकंदर पब्लिक वर्क्स खात्यांत नवीन व्यवस्था व कमजास्त फेरफार होणार आहे असें समजतें.

सिंध प्रांतांत तीन पोलिस शिपायास अपराध कबूल करण्याचे संबंधानें जुलूम केल्यावरून तीन तीन वर्षांची शिक्षा प्रत्येकास झाल्याचे कळतें.

सरकारी कामदार व वकील लोकांवर जो कर बसणार होता तो इंडिया सरकारानीं तूर्त तहकूब केल्याचें समजतें.

मक्का एथील एका ओढ्याची दुरस्ती करण्याकरितां मुंबई येथें फंड जमा होत आहे. टर्कीचे सुलतान सालीना ३४ हजार रुपये देत असतात. यास पाऊण लाख रु० लागणार असें अनमान आहे.

## भोजनविधि.

भोजनविधि.— हल्लींच्या स्थितीकडे पाहिलें असतां पृथ्वीच्या पाठीवर जितके राज्यकर्ते लोक ह्मणून आहेत तितके सर्व मांसाहारी आहेत. मि० हरबर्ट स्पेन्सर हल्लींचे विलायतेमधील महान तत्ववेत्ते हे ह्या गोष्टीची प्रतीति पाहाण्याकरितां स्वतां मांस खाल्याशिवाय कांहीं महिनेपर्यंत राहिले त्यामुळें त्यांची विचारशक्ति कमी होऊं लागली असें त्यांनीं शिक्षण ह्या विषयावर पुस्तक लिहिलें आहे त्यांत सांगितलें आहे. ह्याच पुस्तकांत त्यांनीं मांस खाण्याच्या आवश्यकतेविषयीं फारच सुंदर रीतीनें लिहिलें आहे हें तर खरें आहे कीं, आमच्या देशांत उष्णता अधिक असल्या कारणानें पाहिल्या वर्गांतील दुसऱ्या जातीचे पदार्थ ह्मणजे निरनिराळीं धान्यें, शर्करा, चरबी, तैल व आम्लपदार्थ यांची जरूर कमी आहे, कारण हे पदार्थ सेवन केल्यापासून शरीरांत चरबी जास्त होते. तसेंच हे पदार्थ थंड देशांत अंगांत बरीच ऊब उत्पन्न करण्याच्या कामीं उपयोगी पडतात, तर या दोन्ही गोष्टींची आह्मांस फारशी जरूर नाहीं. वनस्पतीवर उपजीविका करणाऱ्या प्राण्यांचीं ज्याप्रमाणें पोटें मोठीं असतात त्याप्रमाणें गणपतीसारखें पोट करून हातपाय व तोंड मोठें स्थूळ करून आह्मांस काय करावयाचें आहे? आमचे अलीकडील लोक लठ्ठ बरेच झाले आहेत त्यांना घेऊन काय करावें? एक जिना चढले कीं दम लागतो. आमच्या अंगांत शक्ति कमी ह्मणून आमच्या लोकांचा असा हा थंड स्वभाव. आमच्या एका तोंडांत मारली तर आह्मी लागलाच दुसरा गाल पुढें करणार इतके आह्मी साधू. असें न करूं तर काय करावें? आमच्यांत कुवत कोठें उरली आहे? तर लोक पाहिजे तितक्या दुराग्रहानें मांसाचा निषेध करीत परंतु ही गोष्ट खरी आहे कीं आमचे लोकांनीं तो आहार सोडल्यापासून ते निर्बल व विचारहीन होत जाऊन हल्लींच्या निकृष्ट दशेस येऊन पोंचले आहेत. आतां आह्मांमध्यें असे लोक सांपडतील कीं तसले पदार्थ सेवन न करितां एकादा सशक्त व विचारवंत मांसाहाऱ्याच्या सहज तोंडांत मारतील. परंतु असे लोक पुष्कळ सांपडणार नाहींत, हजारांत एकादा ह्मटलें तरी चालेल. कोणताही नियम घेतला तरी त्याला बाधकें ह्मणून असावयाचींच. त्यांतलेंच हें एक असें ह्मणण्यास हरकत ती कोणती? हें आहारप्रकरण संपविण्याच्या पूर्वीं एक गोष्ट सांगणे अवश्य आहे ती ही कीं; मांस हें उत्तम अन्न ह्मणून नुसता त्यावरच निर्वाह करूं ह्मटलें तर रक्तदोष उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाहीं, दर्यावरील लोकांस केव्हां केव्हां कांहीं महिनेपर्यंत ताजी भाजी व फळफळावळ न मिळाल्या कारणानें स्कार्व्हि ह्मणून एका प्रकारचा रक्तदोष होतो ह्मणून आंबट लिंबाचा रस प्रत्येक जहाजावर ठेवतात. तर मांस व धान्य, भाजीपाला इत्यादि नेहमी आमचे लोक भक्षण करतील तर हल्लींची आपली अजागळ दशा जाऊन कांहीं काळानें आपण पूर्वीप्रमाणें बलाढ्य व ज्ञानवान होऊं.

सु. प.

## नोटिस.

विठोबा वल्लद पुरणाजी वेव्हारे माळी राहाणार मौजे उकळी तालुके जळगाव जिल्हे अकोलें यांस तुळशी मर्द विठोबा माळी हल्ली वस्ती पातुर्डें तालुके जळगाव जिल्हा अकोला इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तूं माझा लग्नाचा नवरा असून मी झाल्यात नरींच वर्षे झालीं मी तुझे घरीं राहून निर्वाहही केला. अलीकडे दोन तीन वर्षांनीं तूं मला वागवीत नाहींस. माझ्या भावानें मला दोन तीन वेळां तुझे घरीं आणून घातलें पण तूं ठेवित नाहींस मी आपले भावाचेच घरीं आहे आतां तुला नोटिस देण्याचें कारण इतकेंच कीं ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत मला तूं आपले घरीं घेऊन जावें व माझे भावाचे दोन वर्षांत १०० रुपये खर्च झाले ते द्यावे व मला वागवावें मी येण्यास सिद्ध आहे. सदर्हू मुदतींत तूं नेलें नाहीं अगर फारकत व रुपये दिलें नाहीं तर मी दुसरा गंधर्वाचा घरठाव करण्याची कायदेशीर रीतीनें तजवीज करीन. मग तुझा मजवर कांहीं हक्क चालणार नाहीं. या नोटिशीचा खर्च व कोर्ट खर्च तुजपासून भरून घेईन कळावें तारीख ५ माहे मार्च सन १८८० इसवी.

( सही ) तुळशी मर्द विठोबा माळी
निशाणी हातची बांगडी.

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख १५ माहे मार्च सन १८८० इसवी. अंक ११


## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| | रु० |
| आगाऊ | ५ |
| अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाक हाशील. | |
| आगाऊ | १८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसांबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी. १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

नादारी मुकद्दमा नंबर १

१८८०

पंजाब नादारी रुळाप्रमाणें नादार झालेला नागोबा वल्लद राजाराम आमीन कटवर जात कोमटी रहाणार पोहोळुल तालुके पुसद जिल्हे वाशीम यांनीं तारीख १२।१।८० इसवी रोजीं नादारी रुळाप्रमाणें अर्ज दाखल केला कीं मला सावकारांचें देणें ४३३।।।- रुपये असून देण्यास ऐपत बिलकूल नाहीं. मजपाशीं एक बैल व कांहीं जून किमतीचीं भांडीं आहेत तीं सरकारांत घेऊन सर्व सावकारांस द्यावीं आणि मला मुक्त करावें. यास्तव सर्वांस कळविण्यांत येते कीं सदर्हू इसम नादार होऊं इच्छित आहे तर ज्यांला त्याजपासून कांहीं घेणें असेल त्यानीं रीतिप्रमाणें अर्ज दाखल करावे किंवा अर्जदार नादार नाहीं दार लागणे ऐपतदार आहे व त्याजपाशीं अमुक ठिकाणीं मालमत्ता ठेविली आहे, किंवा छपविली आहे ती दाखवून देतो वगैरे अर्ज करणें असल्यास तारीख ३० माह मार्च सन १८८० इसवीचे आंत अर्ज दाखल करावे. असे अर्ज मुदतींत न आल्यास अर्जदार यास नादारीचें सर्टीफिकेट दिलें जाईल. कळावें, तारीख ८ माहे मार्च सन १८८० इसवी. मुक्काम वाशीम.

बापुजी रंगनाथ
नादारी कोर्टाचे जडज.

## नोटिस.

रा. रा. गोपाळजी व विष्णाजी वल्लद राणुजी तेली रहाणार देऊळगाव साकरशा तालुके मेहेकर जिल्हे बुलढाणें यांस खालीं सही करणार दुलीचंद बाळमुकुंद मारवाडी रहाणार मौजे व जिल्हे मजकूर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आपण जवारी खंडी १० अक्षरीं दहाचा सवदा केला दर ६२ बसष्ट रुपये प्रमाणें त्यामध्यें एक खंडी सवाबारा मण मोजून घेतली बाकी ८ खंडी पावणे आठ मण जवारी मोजून घेणें आणि तितक्याचेच रुपये देणें. जर जवारी मोजून न घेतली तर कायद्या प्रमाणें तजवीज करण्यांत येईल आणि यासी मुदत या दिलेल्या नोटिशीचे तारखे पासून १५ पंधरा दिवसांचे आंत या वरील सवद्याचा निकाल करावा आणि जर न कराल तर कायद्या प्रमाणें योग्य रीतीनें कोर्टांत फिर्याद करून वरील लिहिलेला माल ( जवारी ) तुमचा तुह्मी घेऊन जावा व आमचे मालाचे रुपये आह्मास द्यावे. असें न केल्यास फिर्याद करून कोर्टखर्च व या नोटिशीचा खर्च आपले पासून भरून घेऊ.

कळावें तारीख ९ माहे मार्च सन १८८० इसवी.

( सही ) दुलिचंद बालमुकुंद

## नोटिस.

गुंजी मर्द गंसा सोनार रहाणार मौजे दापुरे सर्फे ह्लिसांग तालुके अकोलें इला खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझी लग्नाची बायको असून आजपर्यंत माझे घरीं होतीस. अलीकडे सहज ह्मणून तूं आपले भावाचे घरीं गेली व तेव्हांपासून आली नाहीं त्यास सुमार तीन वर्षे झालीं. तुला आणण्याकरितां मी जातीनें एक दोन वेळ आलों पण तूं आली नाहीं व येते येते ह्मणतेस परंतु अजून यत नाहींस सबब तुला या नोटिसीनें मुद्दाम कळविलें जातें कीं ही नोटिस पावल्यापासून एक महिन्याचे आंत माझे घरीं निघून यावें. वर लिहिलेल्या मुदतींत न आल्यास मी कोर्टांत फिर्याद करून तुला नेण्याची तजवीज करीन हें खूप समजावें. तुझ्या भावास असें चांगलें नाहीं सबब त्यानें तुला माझे घरीं आणून घालावें एव्हढें त्यांस सांगणें आहे. कळावें ता. ११।३।८०

( सही ) गंसा वल्लद मणूसा सोनार रहाणार अडगाव ता. अकोट
दस्तुर पर्वतराव देशमुख.

## पत्रव्यवहार.

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### लोकहितवादी त्रिकूट.

रा. रा. सुबोधपत्रिका कर्ते यांस,—

ग्रंथोत्तेजक मंडळीच्या संबंधानें सांप्रत वर्तमानपत्रांत बरीच चर्चा चालली आहे. कित्येक ह्मणतात कीं हिची व्यवस्था चांगलीशी नाहीं; कारण वर्गणीची उग्राणी करण्यास कोणी येत नाहीं. कित्येक तर वर्गणी पाठविली असतांही पुस्तकें आलीं नाहींत ह्मणून बेभाटा करीत आहेत. कांहीं लोक तर हिचे नियमच बरोबर नाहींत असें ह्मणतात. याप्रमाणें अनेक शंका अनेकांच्या मनांस येतात. या शंकांचें निरसन करण्यासाठीं पाठीमागें दोन गृहस्थांच्या नांवाच्या आंग्ललिप्यनुसार आद्याक्षरांचा शिक्का असलेलीं दोन पत्रें "नेटिव् ओपिनियन्" मध्यें छापण्यांत आलीं; व गेल्या इंदुप्रकाशांतही याच संबंधाचें नाशिकच्या बातमीदाराचें एक पत्र आहे. याप्रमाणें एकंदर तीन पत्रें प्रतिपक्षांच्या मुखानें मुद्रण व्हावें एतदर्थ लिहिलेलीं आमच्या पहाण्यांत आलीं. पण या त्रिकूटाचीं पत्रें वाचतांच मनांत असा विचार येतो कीं कोणी सत्पुरुषांनीं प्रांजळ मनानें व निष्पक्षपाती बुद्धीनें हीं पत्रें लिहिलीं असावीं किंवा कसें! ग्रंथोत्तेजक मंडळीनें जाहीर केलेल्या पुस्तकांची व ती निवडणाऱ्या मंडळीची सर्वतोमुख श्वप्रवृत्ति करण्याचा यांनीं जो विडा उचलला आहे तो न्याय्य व रास्त असें त्यांचीच अंतर्याम देवता त्यांस सांगत्ये काय? या मंडळीचा उद्देश छापलेल्या पुस्तकांस उत्तेजन द्यावें हा, कीं पुस्तकें चांगलीं व वाचण्यास लायक असतांही कर्त्यांजवळ द्रव्याची मदत नसल्यामुळें छापलीं जात नाहींत तसलीं कांहीं पुस्तकें बक्षीस देऊन घ्यावीं व तीं छापून प्रसिद्ध करावीं हा. पहिलाच त्यांचा मुख्य उद्देश हें जर माहित असतें तर आह्मापैकीं कोणीही वर्गणीदार झाला नसता. हिंदुस्थानाच्या इतिहासासारखीं सालगुदस्तां व शिवाजीचरित्रासारखीं पांच सहा वर्षां पूर्वीं छापलेलीं पुस्तकें आमच्याजवळ असल्यामुळें आह्मांस त्यांची अपेक्षा नाहीं हें स्पष्ट होय. तशांत किल्ले बांधल्यामुळें मराठे भित्रे इत्यादिक हेत्वाभासयुक्त प्रतिज्ञा करणाऱ्या लोकहितवादींचीं पुस्तकें आह्मांतून कोणासही इष्ट नाहींत. फ्रेंच लोक हे सर्व युरोपांत शूरत्वाविषयीं नावाजलेले आहेत; तरी त्यांचे "मेट्झ्" वगैरे स्थलीं बांधलेले किल्ले प्रसिद्धच आहेत. त्यांस काय लोकहितवादी भित्रे समजतात? ज्या महाराष्ट्रपुत्रांनीं रजपूतांसारिख्या शूर वीरांपासून अनेकवार खंडण्या घेतल्या ते जर भित्रे तर शूर ते कोण? शिवाजीसारख्या व बाजीरावसारिख्या विक्रांत पुरुषांचें रक्त ज्यांच्या वाहिन्यांतून वहात असेल ते असल्या लेखास काय ह्मणतील? व त्यांस तो शाद्ब तरी कितपतसा होईल? तशांत याप्रमाणेंच जर मंडळीनें छापलेलीं पुस्तकें विकत घेण्याचा क्रम चालविला तर आमची वर्गणी या त्रिकूटाच्या सूचनेप्रमाणें उधार ठेवून तरी काय करायाची? प्रतिवर्षीं येरे माझ्या मागल्या. मंडळीचा मूळचा उद्देश जर अन्यथा होत आहे, ह्मणजे नवे ग्रंथ छापण्यास उत्तेजन द्यावयाचें तें सोडून कोणी तरी कधीं तरी छापलेले ग्रंथ कसे तरी वर्गणीदारांचा गळ्यांत बांधण्यास ही मंडळी यत्न करीत आहे तर वर्गणीदारांनीं वर्गणी तरी काय समजून भरावी? नवी शाळा काढणार अशी दवंडी पिटून वर्गणी जमा करावी; नंतर मुक्तद्वार ब्राह्मणभोजन करून भूदेवांस तृप्त केल्याचें पुण्य तुह्मांस मिळालें व आणखीही मिळेल असे कुरकुर करणाऱ्या वर्गणीदारांस आशीर्वाद द्यावे ह्मणजे झालें. प्रतिज्ञाहानि दोष आला तरी कांहीं हरकत नाहीं, तो काय वेटा आंगास चिकटतो? असा कदाचित् या अपूर्व नैय्यायिक त्रिकूटाचा समज असेल तर असो. इतकेंच कीं पुनः कोणी दाक्षिणात्यांनीं असलें काम हातीं घेतल्यास सही देण्याच्या पूर्वीं शंभरवेळ विचार करणें जरूर पडेल. तेव्हां हे सर्व लेख लोकहितवादाच्या बुद्धीनेंच या त्रिकूटानें लोकांस सादर केले असतील असा भरवसा येत नाहीं.

वर आह्मी त्रिकूट असा शद्ब वापरला आहे खरा; पण व्यक्तीच्या त्रित्वाविषयी आह्मास बराच संशय वाटतो. इंदुप्रकाशाचे नाशिकचे बातमीदार हे त्यांच्या रासिक्याविषयीं अनेक ठिकाणीं डिंडिम वाजवीत आहेत व त्यांचा नाशिक वृत्ताबरोबर बराच संबंध आहे ते रा० रा० वामन बाळकृष्ण रानडे तर नसतीलना? यांचें लोकहितवादीबरोबर नैकट्य किती आहे हेंही लोकांस बरेंच विदित आहे. नेटिव् ओपिनियनांतील व्ही. बी. आर. हीं आद्याक्षरेंही यांच्या नांवालाबरोबर जुळतात. हा जर आमचा तर्क बरोबर आहे, तर या त्रिकूटाचें ( परमेश्वर करो व हें कूट एकच नसो ) लोकांत फारसें वजन पडेल असें वाटत नाहीं; व पुनः इंदुप्रकाशाच्या ठाण्याच्या बातमीदाराचें याच मतलबाचें जरी पत्र आलें, व त्या संबंधानें सूर्योदयानें कितीही भाटपणा स्वीकारिला, तरी त्यापासून कांहीं निष्पन्न न होतां लोकांस भरंवसा यावयाचा नाहीं तो नाहींच. मुंबई तारीख ३ माहे मार्च सन १८८० इसवी.

'क्ष' व 'य'

---

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस.

विनातिविशेष. आपलेकडे खालीं लिहिलेल्या चार ओळी पाठविल्या आहेत, त्यांस येत्या अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

मी येथें येऊन सरासरी थोडेच दिवस झाले इतक्या मुदतींत या फतेखेरड्यांतील राहिवासी संभावीत लोकांची चालचलन पाहून फारच खुष झालों. एथें हिंदुस्थानी शाळेचे इन्स्पेक्टर मे० नूरखान साहेब यांची स्वारी ता. ३ माहे मार्च सन १८८० इ. रोजीं आली व ता. ४ रोजीं हिंदुस्थानी शाळेची परीक्षा घेऊन ता. ५ रोजीं येथील मराठी शाळेतील पहिले आणि दुसरे वर्गांतील मुलांची परीक्षा घेऊन नंतर एक तासभर मराठी आणि हिंदुस्थानी शाळेतील मुलांकडून साधारण कसरत करवून कित्येक मुलांस खाऊकरितां कांहीं पैसे वाटले. व ता. ६ रोजीं हिंदुस्थानी शाळेंत सभा भरविली. याप्रमाणें एथील रा. रा. पंडित लोचनसुकुल चीफ कान्स्टेबल यानी व रा० रा० व्यंकटराव बाबा साहेब देशपांडे यांनीं गांवांतील इतर साहू सावकार व सभ्य गृहस्थ यांस निमंत्रणें देऊन समाज करविला. इतक्यांत मलाही बोलावणें आल्यावरून सभेचा थाट पहाण्याकरितां गेलों असतां स्कुलांत बराच समाज जमला होता. या ठिकाणीं जाऊन बसल्या नंतर अध्यक्ष स्थानीं रा. रा. व्यंक

टराव साहेब व आजुबाजूनें दोन खुर्च्या टाकिल्या असून त्यांवर चीफ साहेब, व मे. नूरखान साहेब व फैज महमद देवी डाकतर ही मंडळी बसलेली असून समोर बाकावर इतर सभ्य गृहस्थ बसले. या सभेच्या कामांत रा. रा. नारायण बव्याजी राजे हे. मा. मराठी शाळेकडील व मि० सयद अली हसन हे- मा. हिंदुस्थानी शाळेकडील यांनीं बरीच मेहेनत करून थाट चांगले प्रकारचा केला होता. व कांहीं उत्तेजक भाषणही केलें. नंतर एथील फर्स्ट अ. मा. नारायण भगाजी मोरे यांनीं विद्येपासून फायदा या विषयावर भाषण केलें. नंतर चीफ कानस्टेबल. व व्यंकटराब बाबा यांनीं हिंदुस्थानी शाळेकरितां वर्गणी जमविण्याविषयीं यादी केल्या अन्वयें यादीवर आंकडे टाकिले.

या दोन्ही शाळा स्थापन होऊन ११।१२ वर्षे झालीं असावींत. असें भाषणावरून कळतें. इतक्या काळांत हल्लीं या दोन वर्षांपासून सदरहू दोन्ही शाळांची स्थिति बऱ्याच स्थितींत सुधारलेली दिसते. याचें कारण कमेटीचे मेंबर व शिवाय रा. रा. हरबाजी शिवराम. देशपांडे. व रा. रा. श्रीपत रामचंद्र व हरजी नारायणजी पाटील यांचीहि विशेष मदत असल्याचें दिसतें. कळावें तारिख १० माहे मार्च सन १८८० इसवी.

| वर्गणीदारांचीं नांवें. | रु. |
|---|---|
| रा. रा. लोचन सुकूल चीफ कानस्टेबल. | १ |
| ,, ,, व्यंकटराव नथो देशपांडे. | १ |
| ,, ,, हरबाजी शिवराम देशपांडे. | १ |
| ,, ,, श्रीपत रामचंद्र देशपांडे. | १ |
| ,, ,, माधवराव गोपाळ देशपांडे. | १ |
| ,, ,, हिरालाल गंभीरमल. | १ |
| ,, ,, हरजी नारायणजी पाटील. | ८८ |
| ,, ,, गोविंदसा सावजी. | ८८ |
| ,, ,, पांडुदेव रघुनाथ देव. | ८८ |
| ,, ,, सलाउद्दीन काजी. | ८८ |
| ,, ,, फैजमहमद. देवीडाक्टर. | ८८ |
| ,, ,, बापुजी एकनाथ पो. मा. | ८८ |
| ,, ,, सेखहमीद. | ८८ |
| ,, ,, सवाइराम मारवाडी. | ८८ |
| एकूण रुपये | १० |

" सभेस जाणारा एक "

मुक्काम फत्तेखलडें. ( " क्ष ")

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांसः—

वि० वि० पत्रकर्ते महाराज फार, दिवसांनीं आपले सुंदर पत्रीं चार ओळी प्रसिद्ध होण्याकरितों पाठविल्या आहेत, या मर्जीनुरूप येत्रा अंकीं छापून प्रसिद्ध कराल अशी आशा आहे.

सरासरी पांच वर्षें झालीं. या वऱ्हाड प्रांतांत कनवाळु सरकारानीं सरफराज होऊन मुन्सरीमीच्या जागा मुक्रर करून त्या जागीं जमीदार ( देशमुख देशपांडे ) लोकच नेमले जावे असें सर्क्युलर करून त्या नेमणुकांबर जमीदार लोकांचा हक्क कायम केला. त्याप्रमाणें कित्येक जमीदार लोक रोजीस लागून सरकारचे आभार मानित आहेत. अशा प्रकारें सरकारच्या आश्रयें करून उत्तरोत्तर जमीदार लोक आनंदीत होताहेत परंतु अलीकडे थोडी दिलगिरी उत्पन्न होत आहे कीं, कांहीं दिवसांपासून इलिचपुर जिल्ह्यांत मुन्सरिमीच्या कामावर जमीदाराविराहितही लोक नेमले आहेत तेव्हां या बाबदींत दयाळू सरकार मर्जीनरूप लक्ष पुरवून सदहू उणीव दूर करतील व त्या जागेवर जमीदार लोकांचा हक्क ठेवितील अशी आशा बाळगून आहे.

दुसरें, पूर्वीं जमीदार ( देशमुख देशपांडे लोकांत प्रयेक परगण्याचें जमीदार मंडळींत दस्तकी एक किंवा दोन असत परंतु मध्यें मध्यें कांहीं लोकांनीं खटपटी करून अलग नावें केलीं. ह्मणजे पूर्वीं ज्या परगण्यांत एक किंवा दोन दस्तकी होते त्याच परगण्यांत तीन किंवा चार दस्तकी झाले आहेत. अशा प्रकारची व्यवस्था दयाळु सरकाराला बरोबर दिसून आली नाहीं; ह्मणून सरफराज होऊन सर्क्युलर केलें कीं, ज्या परगण्यांत जे दस्तकी आहेत त्यांपेक्षां ज्यास्त केलें जाणार नाहींत. हें सर्क्युलर झाल्या नंतरहे इलिचपुर जिल्ह्यांत जेथें दोन दस्तकी होते तेथें आतां चार दरतकी झाले आहेत. ह्या बाबदींतही कनवाळु सरकार मर्जीनरूप लक्ष पुरवून वरील उणीव नाहींशी करील अशी आशा बाळगून आहे. कळावें. तारीख ६ माहे मार्च सन १८८० इसवी.

क्ष.

## जाहिरात.

## ५० रुपये बक्षीस

आमची एक पाचाची आंगठी पाचाचे भोंवताली बारीक हिरकण्या जडल्या आहेत. पांच चौकोनी असून थोडा लांबट आहे व अगदी हिरवागार आहे. गिनीचे सोन्यांत बसविलेला आहे. ही आंगठी काल रोजी गहाळ झाली. जो कोणी सापडवून आणून देईल त्यास आली ५० रुपये इनाम देऊ. कळवें, ता० १३ मार्च सन १८८० इ०

बहिमनजी जामासजी. सी. आय. इ.

असिस्टंट कमिशनर.

## वऱ्हाडसमाचार.

मिति फाल्गुन शुद्ध ४ शके १८०१

## सर रिचर्ड टेंपल साहेब.

मुंबईचे गवर्नर सर टी रिचर्ड टेंपल साहेब यांची विलायतेस पार्लमेंट सभेत नेमणूक झाली. व त्यांचे जागेवर नवीन गवरनर नेमिले. एप्रिल महिन्यांत ते आल्यावर टेंपल साहेब विलायतेस जातील. असें गेले आठवड्यांत वर्तमान होते परंतु विलायतेहून लवकर येण्याविषयीं त्यांस तारेंतून बोलावणें आल्यावरून १३ वे तारखेस त्यांनीं मुंबईहून निघण्याचा बेत केला व त्याप्रमाणें ते तिकडे चालते झाले.

सर रिचर्ड टेंपल साहेब यानीं हिंदुस्थानांत उत्तम नावलौकीक मिळविला. यांच्या सारखा राज्यकारभारदक्ष व लोकप्रिय गवर्नर आजपावेतो कोणी झाला नाहीं, हे उत्तम विद्वान असून अति मेहेनती होते. यांच्या सारखी काम करण्याची शैली व उत्तम वक्तृत्व दुसऱ्यामध्यें क्वचित आढळेल. घोड्यावर बसून पाऊस, थंडी वारा, यास न जुमानतां शेंकडो कोसाच्या मजला यांनीं केल्या आहेत. काबुलाकडील रेल्वेचें काम जें इतक्या त्वरेनें झालें तें टेंपल साहेबाशिवाय इतर कोणाच्यानें झालें नसतें. यांची व्यवस्था, बातबेत, कौशल्य, व श्रम यांकडे लक्ष्य दिलें असतां व थोड्या काळांत हिंदुस्थानांत यानीं जी कीर्ति मिळविली आहे व सरकारचा जे उपयोग केला आहे तो मनांत आणिला असतां हे पार्लमेंट मध्येंच बसुन राहतील असें घडणार नाहीं. हिंदुस्थानास यांचा अति उपयोग आहे. सबब लार्ड लिटन साहेब व्हाइसराय यांच्या मागें हेंच हिंदुस्थानचे गवरनर जनरल व व्हाइसराय होऊन येतील असें बहुत लोक ह्मणतात. व तसें झालें असतां फार चांगलें होईल. हे नागपुरास चीफ कमिशनर होते व हैदराबादेस रेसिडेंट असतां इकडे आलले आहेत. त्यावरून त्यांची कर्तबगारी व लायकी इकडील लोकांनींही चांगली पाहिली आहे. व असे गृहस्थ लहान पदापासून चढत चढत इतक्या योग्यतेस आले व पुढें साऱ्या हिंदुस्थानचे मुख्याधिकारी झाले ह्मणजे ते कृतकार्य झाले व देशाचा त्या पासून चांगला उपयोग झाला असें ह्मणावयाचें.

## रावसाहेब व रावबाहादुर.

मुंबई इलाख्यांत मामलेदार, मुनसफ, इन्स्पेक्टर या लोकांस राव साहेब व दप्तरदार, प्रिन्सिपाल यांस राव बहादूर किताब दिलेले आहेत तसे वऱ्हाडांत देण्याचा विचार चालू असल्याचें आमचे उमरावतीकर बंधु प्रमोदसिंधुकर्ते यांचे समजण्यांत आलें आहे. व त्यांचें मत आहे कीं हे किताब फार मोठे आहेत सबब ते योजण्यांत जरा फाजिलपणा दिसतो. जुने रिवाज पाहिले असतांही मुंबई सरकारास एवढें मोठाले किताब योजण्याचें कारण नव्हतें. अधिकारी लोकांस वेगवेगळ्या पर्यायानें लिहावें एवढ्याकरितां राजश्री व राजमान्य राजश्री ही जुनी वाहिवाट योग्य होती व वऱ्हाडांत ही जनाब आणि मेहेरबान हे पर्याय चांगले रूढ आहेत सबब तेच योजिल्यास पुरे आहेत. आह्मांसही वाटतें कीं हें मत वावगें नाहीं पण मोठाले किताब योजण्याची रूढ पडून गेल्या नंतर आतां इकडील अधिकाऱ्यांस मात्र ते योजूं नयेत हें आह्मांस बरें वाटत नाहीं. इंग्लिश सरकारचे राज्यांत किताब फार स्वस्त आहेत व त्याचे प्रकारही पुष्कळ आहेत. पाटलास देखील एका कामाकरितां वऱ्हाडांतही राव साहेब किताब दिला आहे. तर असिस्टंट कामिशनर, अव्वाची, इन्स्पेक्टर, तहशिलदार या लोकांस ते कां नसावेत? मुंबई इलाख्यांत आमच्या शेकडो अधिकाऱ्यांस आजबरींच वर्षें हे किताब आहेत व त्यांच्याच बरोबरीचे त्यांचे देशबंधु इकडे तेच अधिकार चालवीत आहेत तर त्यांनांही समता राहण्याकरितां हे किताब सरकारानें अवश्य द्यावे असें आमचें मत आहे. जुन्या राज्यांत रावसाहेब रावबाहदूर हे किताब देत नव्हते पण इनाम, जाहागिरी, वर्षासनें विपुल देत असत ती देणगी किफायतीचीं होतीं; आतां तिचें मान संपुष्टांत आलें व तिचे बदला नामिनल व किताबांचॉ चंगाळ झाली आहे. तेव्हां हा मनूच पालटला आहे. सबब मन्वंतराप्रमाणे जें होणें तें सर्वत्र सारखें व्हावें हाच विधि होय. मोठा हुद्देदार होण्याला अधिक ज्ञान व अधिक विद्या लागते सबब तिचे संपादकास अधिक भूषणाई किताब योजिले तर अधिक चांगलें आहे असें आह्मांस वाटतें.

## मुनसफ स्कीम.

मुनसफीच्या ह्मणजे सबार्डिनेट जडजाच्या जागा करण्याचा सरकारचा विचार आहे त्यांत अनुभविक वकील लोकांसही नेमण्याची अवश्य तजवीज व्हावी अशी आमचे बंधु प्रमोदसिंधुकर्ते यानीं सूचना केली आहे ती रास्त आहे व मागें एक वेळ याबदल लिहितांनां आह्मीही याप्रमाणें लिहिलें होतें त्याची आमचे वाचकांस आठवण असेल. पण असें ह्मणतात कीं नवा अधिक खर्च सरकारास न पडूं देतां ही नवीन तऱ्हा अमलांत आणण्याचा जुडिशियल कामिशनर साहेबांचा विचार आहे. त्यामुळें नवीन कांहीं न्यायाधीश होण्याचा संभव दिसत नाहीं. एकंदर पंध्रा जागा कराव्या असें क. अल्लार्डाईस साहबाचें मत होतें त्यांत दर्यापुरास एक व मलकापुरास एक अशा दोन नवीन जागा योजिल्या होत्या त्या क. बेल साहेब नको ह्मणतात. १३ जागांत सुरळीत काम चालेल असें त्यांचें मत आहे, पैकीं ४ जागा असिस्टंट कामिशनरास, ६ जागा एकस्ट्रा असिस्टंट कमिशनरास, १ अव्वाचीस व एक पुसदेस तहशिलदार आहेत त्यांकडेच दिवाणी काम ठेवावयाचे अशा १२ पूर्वींच्याच गृहस्थांस निवडून एक तेरावी जागा मात्र नवीन २५० रुपये पगाराची करावी असा बेत आहे व तसे झाल्यास ती बहुधा रा. रा. भास्कर सखाराम जयवंत जु० क० चे क्लार्क आफ धि कोर्ट यांस मिळेल. कारण एक दोन वेळां त्यांचे हक्क मागें टाकले गेले आहेत. व जु० क० साहेबांनीं त्यांची शिफारस केली आहे व ती योग्य आहे तेव्हां नवीन व्यवस्थेंत अधिक जागा होत नाहींत व त्या वकील वगैरेस मिळत नाहींत असें दिसतें.

कोर्टांच्या योजनेविषयींही जु. क साहेबानीं चांगला विचार केला आहे असें कळतें. व रयतेस अधिक लांब जाण्याचे प्रयास पडूं नयेत हा त्यांचा मुख्य मुद्दा आहे व तो फार चांगला आहे. ह्मणजे खामगावास कोर्ट ठेवावें व त्या कोर्टानें कारणपरत्वें नांदुऱ्यास व मलकापुरास जाऊन काम करावें. तसेंच फत्तेखलड्याच कोर्टानें मेहकरास व चिखलीस कामें करावीं. व कारंजाचे कोर्ट मूर्तिजापुरास ठेवून त्यानें दर्यापुर व कारंजा एथेंही काम करावें. तसेंच राळे गावास कोर्ट ठेवून त्यानें केळापूर वणी वगैरे कडेही जाऊन काम करावें. डे. क. हेच डिस्ट्रिक्ट जडज व त्यांच्या हद्दी दिवाणी कामाच्या सोइ प्रमाणे नवीन प्रकारच्या करावयाच्या व रेल्वे संबंधानें जीं कोर्टें अकोल्याला जवळ आहेत त्यां वरील अपीलें जुडिशियल कमिशनर साहेबाकडे व बाकीचीं डिपुटी कमिशनर साहेबाकडे चालावीं अशी योजना केली आ-

हे ह्मणतात. इत्यादी प्रकारावरून ज्यु. कमिशनर [illegible] यांनीं ही युक्ती फार विचारानें सोईची अशी केली आहे. व ती मंजूर होऊन येऊन आमचे वऱ्हाडांत सुखकारक होंवो असें आम्ही इच्छितों. सन १८७८ सालीं [illegible]फीचें उत्पन्न १४६२२२ रुपये झाले होते. व नव्या योजनेंत एकंदर खर्च [illegible]१२३२ रुपये लागणार व बाकी सेव्हिंग [illegible]वे अशी योजना आहे. तेव्हां सरकारचा फायदा यांत अधिक असून सोय पुष्कळ आहे सबब ही गोष्ट अमलांत येण्यास कांहीं हरकत होणार नाहीं असें आह्मांस वाटतें.

## राजेश्वरची पानसुपारी.

शनिवारीं सायंकाळीं श्री राजेश्वर देवाल यामध्ये रा. रा. नानाभाई गणपतराव धैर्यवान व त्यांचे बंधु रा. रा. बाळजी गणपतराव धैर्यवान यांस राजेश्वर कमिटीनें पान सुपारीस बोलाविले होते. व त्या प्रसंगीं गावांतील प्रतिष्ठित मंडळीही बहुतेक बोलाविली होतीं. मे. द. बहिमनजी साहेब सी. आय. ई. हेही मंडळीच्या विनंतीवरून पान सुपारीस गेले होते. सभेचा थाट वर्णनीय होता. मे. बहिमनजी साहेब यांच्या सूचनेवरून खंडेराव बाळाजी फडके यांनीं भाषण केलें कीं आजचा समारंभ रा. रा. नानाभाई व त्यांचे बंधू यांच्याकरितां आहे. हे गृहस्थ कालिदास पुणेंकर नाटकाचे मालक असून यांनीं एथील धर्मार्थ वर्गणीनें चालू असलेली धर्मशाळा वें [illegible] राजेश्वर या प्रीत्यर्थ गेल्या बुधवारच्या मागील बुधवारीं नाटक केलें होतें पण त्या दिवशीं उत्पन्न कमी झाल्यावरून त्यांतील अंश इकडे न देतां राजेश्वराप्रीत्यर्थ पुन्हा एक स्वतंत्र नाटक करावें अशी मंडळीनें त्यांस विनंती केल्यावरून त्यांनीं ती कबूल केली व गेल्या बुधवारीं राजेश्वरासाठीं स्वतंत्र नाटक केलें व त्यांचे उत्पन्न सुमार १५३ रुपये झाले तें सर्व त्यांनीं देवास दिले हा त्यांचा मोठेपणा आहे. नानाभाई व त्यांचे बंधू हे मुंबईकर प्रतिष्ठित घराण्यांतील असून श्रीमान, उदार व सुस्वभावाचे आहेत. अकोल्यास त्यांनीं जी कमाई केली तिचा अंश अकोल्यांतील लोकांचेंच परम पूज्य दैवत जें राजेश्वर त्याला एवढ्या मोठ्या देणगीनें दिला हे त्यांनीं फार चांगलें केलें. व याचें प्रतिफल देवानें त्यांस बहुगुणीत द्यावें अशी सर्वांची इच्छा आहे. धर्मशाळेलाही त्यांनीं एका नाटकाचें उत्पन्न दिलें याबद्दलही त्यांचे आभार मानिल्यावाचून आमच्यानें रहावत नाहीं. याप्रमाणें भाषण झाल्यावर रा० रा० नानाभाई यांनीं भाषण केलें कीं एडिटर यानीं आह्मविषयीं जे सांगितलें व जो मोठेपणा आह्मांस दिला ती आमची कर्तबगारी नव्हे. मंडळीचें आह्मांविषयींचें जें प्रेम व अगत्य आहे त्यामुळें आमची अल्पसेवा त्यांस अधिक वाटली. व त्यांनीं आमचा गौरव केला यास्तव आह्मी सर्वांचे आभार मानितों. राजेश्वराप्रीत्यर्थ दिलेल्या नाटकाला चांगलें उत्पन्न झालें याजबद्दल आह्मा उभयतां बंधूस संतोष वाटतो. व प्रथमचे नाटकाचे उत्पन्न आह्मी धर्मशाळेला दिलें तें पन्नास रुपयालाही थोडें कमी झाले आहे सबब आह्मांस वाईट वाटून आणखी आह्मी पदरचे ५० रुपये धर्मशाळेला देणगी ह्मणून देतों. याप्रमाणें त्यांचें भाषण झाल्यावर मंडळीच्या वतीनें पुन्हा त्यांचे आभार मानिले व या धर्म वासनेबद्दल देवाचा आपणास आशीर्वाद असो असे उद्गार निघाले- नंतर रा. रा. बुटाजी देशमुख भसांगकर ज्यांनीं टाउनहाला पुढील कारंजास ७०० रुपये दिले त्यांनीं राजेश्वराचे नगारखान्याचे कामाकरितां ९९ रुपये दिले. व जानोरीकर रा. रा. बळवंत कानोजी देशमुख यांनीं २९ रुपये व रा. रा. सखाराम जयकृष्ण देशपांडे बाळापुरकर यांनीं २९ रुपये व रा. रा. रामराव कृष्णराव यांनीं १० रुपये दिले. या चौघांचेही मंडळीनीं आभार मानिले. नंतर पान सुपारी, अत्तर गुलाब, व पुष्पगुच्छ वाटले. आणि देणगी देणारांस प्रसादाचे नारळ दिले समारंभ आटोपला.

## वऱ्हाड.

डिपुटी कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट रा. रा. कृष्णराव हरी कोलटकर हे रजा घेणार व त्यांचें काम पहाण्यास रा. रा. हरी रामचंद्र रोहणकर बी. ए. यांस नेमण्याची मे० फिटझरल्ड साहेब यांची इच्छा असल्यावरून रजा मंजूर होऊन येईपर्यंत रोहणखेडकरानीं कामाची माहिती करून घ्यावी असें त्यांस सांगितलें व त्यावरून त्यांनीं हायस्कुलाकडून ४ दिवसांची किरकोळ रजा घेऊन बुधवारपासून तिकडे काम केलें. आतां हुकूम येईपर्यंत ते पुन्हा हायस्कुलांत आपले कामावर गेलें.

पलटणीतील युरोपियन मंडळी पैकी कांहीं व एथील स्टेशनपैकीं कांहीं युरोपियन स्त्रिया व पुरुष यांनीं मिळून गेले मंगळवारीं टौनहालांत एक नाटक केलें. व आणखी या आठड्यांत त्यांचें एक नाटक होणार आहे. नेटिव लोकांस पाहण्याची मोकळीक नाहीं असें ह्मणतात.

एथें बरेंच दिवस तळ देऊन असलेली ५ वी पलटण काबुलावर न जातां हिंगोलीस जाणार असें समजतें.

नायब तहशिलदार लोकांचे माजिस्त्रेटी अधिकार आलीकडे सर्व काढून घेतले आहेत. त्यामुळें कोणा तहशिलदारानीं रजा घेतली व त्यांचे जागेवर दुसरे तहशिलदाराची नेमणुक झाली नसून नायब तहशिदारासच काम पाहाण्याविषयीं हुकूम झाला तर तेथील माजिस्त्रेटी कामाचा बोभाट होऊं नये ह्मणून तालुका आफिसरांनीं त्याठिकाणीं जात जाऊन तेथील माजिस्त्रेटी कामें पाहावें असा ठराव झाला आहे. व त्याअन्वयें जळगाव तहशिलदारानीं रजा घेतली होती ह्मणून मि० एदलजी बहिमनजी साहेब असिस्टंट कमिशनर जळगावास गेले होते व ते या आठवड्यांत परत आले. त्यांची तेथें थोडी प्रकृति बिघडली होती पण आतां दुरुस्त आहे.

मि० डेविस साहेब डिस्ट्रिक्ट रजिस्ट्रार तालुक्यांतील दप्तरांच्या तपासणीकरितां च्यारी तालुक्यांत गेले होते तेही या आठवड्यांत परत आले.

रा. रा. भास्कर सखाराम जयवंत ज्यु० कमिशनरचे क्लार्क आफ कोर्ट २० दिवसांचे रजेवर मुंबईस गेले होते ते बुधवारीं परत येऊन आपले कामावर रुजू झाले.

धर्मशाळेजवळ विहीर खोदण्याचें काम चालू आहे तिला १५ फुटावर पाणी लागलें. पुढें काम चालू आहे.

मे० रतनजी जामासजी साहेब हैदराबादेकडे आहेत त्यांच्या पत्नी तेथें पारशी स्त्रियांची सभा भरवून ऐरिश लोकांचे सहायार्थ कांहीं द्रव्य जमाविलें हें ऐकून आह्मास संतोष होतो. अशी स्थिति आमच्या स्त्रियसां केव्हां येईल?

आह्मास लिहिण्यास वाईट वाटतें कीं रा. रा. बालकृष्ण काशिनाथ जोशी पोलिस इन्स्पेक्टर यांचें कुटुंब गेल्या शनीवारीं निवर्तलें. यांस दोन लहान मुलें आहेत. या बाईच्या डोळ्यांस थोडे दिवसांपासून विकार होऊन दोन्ही डोळे गेले होते. औषधोपाय पुष्कळ केला पण कांहीं गुण न होऊन शेवटीं या थरास गोष्ट आली;

अकोल्याचे नायब तहाशिलदार यांस दर्यापुरास नेमून तेथील नायब तहाशिलदार यांस अकोल्यास नेमिलें असें कळतें.

अलाहाबादचे पायोनियर पत्रांत लिहीलें आहे कीं सर रीचर्ड मिड साहेब हैदराबादचे रेसिडेंट दोन तीन महिन्यांची हक्काची रजा घेणार आहेत व त्यांचें काम पाहण्यास मि० जोन्स साहेब वऱ्हाडचे कमिशनर यांस नेमितील. ही बातमी खरी ठरेल तरे कमिशनर साहेब रजेवर जाणार आहेत ते तूर्तच जाणार नाहींत असें वाटतें.

या महिना अखेर वार्षीक फिरणें संपतें व शिमग्याचा सणही त्याच सुमारास आला आहे तेव्हां एक आठवड्यानंतर शिक्षाखात्याचे डायरेक्टर, इन्स्पेक्टर व डिपुटी इन्स्पेक्टर यांच्या स्वाऱ्या येथें येतील.

गावगन्ना देशमुख, पाटील वगैरे लोकांस शाळाखात्यानां मदत करण्याची मोठी चटक लागली आहे. आमचे जिल्ह्यांत वारंवार त्यांनीं सहाय दिल्याच्या गोष्टी ऐकूं येतात. हा परिणाम आमचे हुशार व चतुर डिपुटी इन्स्पेक्टर रा. रा. बजाबा रामचंद्र प्रधान यांचे प्रयत्नाचा होय. उगवेकर रा. रा. मुगुटराव देशमुख यांनीं तेथील शाळेस कसरतीचे सामानाकरितां ५० रुपये दिलें व हें समजतांच दुसरें देशमुख रा. रा. गोविंदरावजी यांनींहि आमचे ५० रुपये घ्या ह्मणून डि० इ० यास कळविलें. या आठवड्यांत तेच रा. रा. गोविंदराव देशमुख यानीं अकोल्याचे शाळेस कसरतीचे सामानाकरितां १५ रुपये दिले व मिठाई ५ रुपयांची दिली. या गोष्टी संतोषकारक आहेत.

अकोल्याचे रेल्वेकडील परमेनंट वे इन्स्पेक्टर यांचे पत्नीनें कंपनीचे मालाचा अभिलाष केला या मुद्यावर पुण्यास चौकशी चालली होती तींत मिसेस म्याकडोना इजवर आरोप शाबिद होऊन तिजला दोन महिने सक्त मजूरी कैदेची शिक्षा झाली असें परत आलेले साक्षीदारांचे सांगण्यावरून कळतें असिस्टंट रेसिडेंट इंजिनीयरचे क्लार्क मि० पुरुषोत्तम दौलतराव यांजवर कांहीं किटाळ आलें नाहीं हें ऐकून आह्मास संतोष वाटतो.

मे० दस्तुर बाहिमनजी साहेब सी. आय. ई. यांची नित्य हातांत असलेली पांचेची मोलवान अंगठी नाहींशी झाली आहे. ती हातांतून केव्हां व कशी गेली तें समजलें नाहीं. त्यानीं तिचा पत्ता लावणारास ५० रुपये बक्षिस देण्याची जाहिरात दिली आहे.

पोलिसचे इन्स्पेक्टर जनरल मे० ग्रांट साहेब येथें आले होते ते उमरावती जिल्ह्याकडे परत गेले.

झसांग राहाजणीच्या दोघा आरोपीस दोन दोन वर्षे सक्तमजुरी कैदेच्या शिक्षा झाल्या.

मि० फुलर या नावाचे एथें एक युरोपियन वकील काम चालविण्यास आले आहेत.

कालिदास पुणेंकर नाटक मंडळीनें आपल्या मंडळीचे दोन भाग केले. व दुसऱ्या भागाकडून शनिवारीं एथें नाटक केलें "निजलेला जागा झाला" या आरेबियन नाईट मधल्या गोष्टीचा त्यानीं फार्स चांगला केला. या त्यांच्या दुसऱ्या टोळीकरितां एक स्त्रीपात्रही त्यांनां चांगलें मिळालें तें गेल्या आठवड्यांतील आमच्या व. पं. तें वाशिमास नावाजलेलें ताई मास्तरीण हें होय. एका भागास पारू व एका भागास ताई हा उभयतांचा जोड आतां चांगला बसला. दोघीही तरुण, कुशल, सभाधीट उपयोगी, नाचणाऱ्या, व समयी डोक्यावर घेणाऱ्याच आहेत. यांचे नाटकाचा पहिला भाग आतां खामगावास जाणार,

जळगावच्या फर्स्ट असिस्टंट मास्तरच्या एथें सुमारें २००० हजार रुपयांची चोरी झाली ह्मणून ऐकतों.

म्याडम स्मिथ नावाच्या अमेरिकेच्या मिशनरी बाईनें उमरावती एथील कामिशनरचे आफिसांत गुरुवारीं सायंकाळीं सात वाजतां व सिटी लायब्ररींत शुक्रवारीं प्रातःकाळीं ७॥ वाजतां इंग्रजींत व्याख्यानें दि[illegible].

उमरावतीस पुरणमलच्या गौखान्यांत एका मनुष्यानें तेथील मंडळीस जादूचा ह्मणूत तमाशा दाखविला. यास जादूचा तमाशा ह्मणण्योपक्षां हात चलाखीचा, युक्तीचा, व कसरतीचा तमाशा आह्मी ह्मणतों. निरनिराळे पदार्थ काढून देणें ( मागूं ते नाहींत ) वगैरे गोष्टी पुष्कळ ठिकाणीं पुष्कळ मंडळीनीं पाहिल्या असतील. आणि ह्यांत तथ्यांश कितपत आहे हें शोधकांस माहीत आहेच.

प्र. सि.

## वर्तमानसार.

मुंबईचे नवीन गवरनर नामदार सर जेम्स फर्ग्युसन एप्रिलचे २ वे तारखेस विलायतेहून निघून तारीख २२ चे सुमारास मुंबईस येतील. सर रिचर्ड टेंपल साहेब १३ वे तारखेस विलायतेस गेले.

मुंबईच्या पाटबंधाऱ्याच्या कायद्यांत ठराव केला होता कीं शेजारचे शतवाले पोटाचें पाणी घेवोत किंवा न घेवोत त्यांपासून जास्ती कर घ्यावा. ती गोष्ट स्टेट सेक्रेटरी साहेबांस नापसंत वाटली व तशा अर्थाची त्या कायद्यांत पुन्हा सुधारणा करण्याविषयीं त्यांकडून लिहून आले आहे. प्रथम वाटाघाटींत आन. शेट मुरारजी गोकुळदास यांनीं हा आक्षेप घेतला होता पण बहुमतापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं.

मे. ड्यानिवल साहेब पुण्याचे पोलिस सुप्रिंटेंडेंट पुढील महिन्यांत रजा घेऊन विलायतेस जाणार आहेत.

पुण्याच्या सिविल इंजिनियरिंग कालेजास कालेज आफ सायन्स असें नाव दिलें.

पुण्याच्या सिटी पोस्टांत कोणी बनावट केलेली पाव आण्याची एक कार्ड सांपडली.

मुंबईत एका गुजराथ्यानें अडीच हजारांच्या नोटा खिशांत ठेवून एक आगकाड्यांची पेटीही खिशांत ठेविली होती. दुर्दैवानें ती पेटी पेटून त्याच्या नोटी जळून खाक झाल्या!

विंचूरकर श्री. रा. आण्पा साहेब यानीं अग्निहोत्र घेतलें देव मामलेदार यशवंतराव महादेव विंचुरास आहेत.

नाशिक--- विद्याखात्याचे डायरेक्टर मि. चाटफील्ड सा. यांची स्वारी एथें आली आहे. त्याचप्रमाणें रशिया देशांतील प्रोफेसर मि. मेनीएक सा. एथें आले आहेत हायस्कुलांतील मुलांनीं प्रोफेसर यांस संस्कृतांत मानपत्र दिलें. व उभय साहेबास रा. रा. नारायण आपाजी बाड वकील यांनीं विड्यास बोलाविले होतें.

लार्ड सालिस्बरी ज्वरानें आजारी होते त्यांची प्रकृती आतां दुरुस्त झाली.

ब्रह्मदेशच्या राजानें नवीन तहनामा करण्याविषयीं वकील पाठविला आहे.

नागा लोकांचा दंगा मिटत चालला आहे. कांहीं लोक धरले आहेत, कांहीं शरण आले आहेत, तरी कोहिमा एथें त्यांच्यांतील लोकांनीं एक संत्री व एक पोलिस शिपाई यांवर गोळ्या घातल्या.

तुर्कस्थानांत रशियन वकिलापैकीं दोघांवर गोळ्या घातल्या. व त्यांपैकीं एक जखमी झाला आहे.

मसुरी एथें याकुबखानास ठेवण्याचा निश्चय होऊन एक वाडा विकत घेतला.

वासुदेव बळवंत फडक्याच्या संबंधांत एका चांभारास मुंबईचे चीफ कान्स्टेबलानीं पकडून पुण्यास नेलें आहे.

श्री० छत्रपती महाराज संस्थान कोल्हापुर यांची स्वारी महाबळेश्वराहून गेल्या सोमवारीं सकाळीं पुणें एथें येऊन दाखल झाली. बरोबर एक युरोपियन डाक्टर व आक्टिंग स्टेट कारभारी रा. ब. यशवंत मोरेश्वर केळकर हे आहेत. महाराजांची तबियत पुष्कळ अंशीं बरी झाली आहे असें दिसण्यांत येतें. तें कळविण्यास आह्मास फार संतोष वाटतो.

मि० वासुदेव कृष्ण धैयवान बी. ए. एल. एल. बी. यांची ब्यारिस्टरची परीक्षा उतरली असून त्याणीं हायकोर्टांत काम करण्याची शपथ घेतली. ज्ञा. प्र.

लग्नसंबंधी देश रिवाज व चाली— देशरिवाज व चालींचीं चमत्कारिक उदाहरणें पूर्वीं बहुत वेळां प्रसिद्ध झालींच आहेत परंतु अलीकडे एक दोन नूतन समजण्यांत आलीं आहेत तीं पुढें लिहिल्याप्रमाणें:— गुजराथेंतील कुडाव जातीचे कुणबी ह्मणजे ज्या जातींत प्रसिद्ध मि. बेचरदास अंबाईदास आहेत त्या जातींत १२ वर्षांनीं एकदां लग्नें करितात. तें लग्नाचें वर्ष चालू सालीं आलें आहे व त्या धनानें लहान मुलांचीं इतकेंच नाहीं तर गर्भस्थ बालकांचींही लग्नें लावण्याची सुरवात झाली आहे. हीं गर्भस्थ बालकें जर दोन्ही कन्या व पुत्र अशीं झालीं तर योग्यच आहे. पण दोन्ही कन्याच किंवा दोन्ही पुत्रच झाल्यास त्या परस्परांचें एकमेकाशीं बहिणी बहिणीचें किंवा भाऊ भावाचे नातें होतें. कन्या आधीं जन्मून मागाहून पुत्र जन्मला तर काय प्रकार होत असेल अशी शंका उद्भवणारी आहे. परंतु गर्भधारणाच्या कमजास्त मासांच्या अनुरोधानें लग्नें ठरत असतील किंवा एक दोन महिन्यांच्या फरकाचा फारसा निर्बंध बाळगीत नसतील असें वाटतें.

नेटिव संस्थानिकांच्या तहनाम्यांत हरएक प्रसंगीं एकमेकांस मदत करावी असें एक कलम आहे त्या कलमा अन्वयें त्यांच्यापासून काबूल लढाईचे खर्चास मदत करून घ्यावी अशी उत्तर हिंदुस्थानांतील एका राजनिष्ठ गृहस्थानें सरकारास सूचना केली आहे.

जपानी आणि चिनी लोकांस लढाई होण्याचा भरपूर संभव दिसत आहे चिनी लोकांनीं ८०००००० डालर्स खर्चून आपले सर्व किल्ले मजबुत केले आहेत व जपानाकडील वातमीवरून असें समजतें कीं याकोस्काचे संरक्षणाकरितां किल्ले बांधण्याचा विचार करीत आहेत.

डाक्टर किलहार्न साहेब याणीं डेकन कालेजांतील आपल्या जाग्याचा चार्ज घेतला. आता मि. भांडारकर हे मुंबईस जाऊन मि. कुंठे हे पुणें हायस्कूल हेडमास्तरचे जागीं येणार.

डाक्टर किल्हार्न साहेब याणीं डेकन कालजांतील आपल्या जाग्याचा चार्ज घेतला आतां मिस्तर भांडारकर हे मुंबईस जाऊन मिस्तर कुंटे हे पुणें हायस्कूल हेडमास्तरचे जागीं येणार. ज्ञा. च

गेल्या शुक्रवारी मुंबई एथील विक्टोरिया गार्डनमध्यें फुलांचें व भाजांचें उत्तम प्रदर्शन झालें. मंडळी पुष्कळ होती. गव्हर्नर साहेबही गेले होते व त्यांणीं कांहीं भाषणही केलें.

हौस आफ कामन्समध्यें जे सभासद नेहमीं अडथळे आणतात त्यांस सस्पेंड करण्याची शिक्षा तीन तास वादविवाद होऊन ठरल्याचें तारीख २८ चे लंडनचे तारेवरून समजतें.

परशियाचे शहानें बाहेरप्रांतीं धान्य जाण्याचे लोकांचे हाल शमनार्थ बंद केल्याचें समजतें.

इंडियां सरकारानें विलायतेहून कांहीं वैद्य लोक पाठवावे ह्मणून विनंतीपत्र पाठविल्याचें समजतें.

जिल्हेंनिहाय पलटणींत लोकांची भरती करण्याचें काम ज्यारी असल्याचें समजतें

कलकत्यास नवीन नेटिव लोकांचा व्यांक व्यापार वगैरे वाढविण्याच्या संबंधानें निघाली आहे. याचा उद्देश शेतकरी लोकांस मदत व्हावी असा दिसतो. अशा प्रकारची व्यांक इकडील इलाख्यांत फार जरूरीची आहे.

सर्पाचें विष उतरण्यावर औषध—मनुष्यास सर्पदंश झाला असतां एरंडाच्या पाल्याचा रस सुमार ४ चमचे काढून त्यांत थोडें पाणी घालून तें फार वेळ न होऊं देतां तात्काळ पाजावें आणि एरंडाचींच पानें थोडीं शेकवून दंश झाल्या ठिकाणीं बांधावी. एरंडाचा रस पाजल्यावर वांती न होईल तर अर्ध्या तासानें पुन्हा तसाच रस पाजावा. ह्मणजे वांती होईल आणि त्या वांतीच्या वाटे विष निघून जाईल. याची परीक्षा अशी आहे कीं ती वांती तांबड्या रंगाची होईल. उपचार करून पाहा.

विंचु चावल्यास त्याजवर औषध.—मनुष्यास विंचवानें नांगी मारल्यास तावडतोब लोखंडाच्या पळींत तिळांचें तेल कढवून त्याची वाफ चावल्या ठिकाणीं कांहीं वेळ दिली असतां आराम होईल. यत्न करून पाहावा.

युनैटेड स्टेटमध्यें दर वर्षास ७२,००,००० घड्याळें विकलीं जातात. हीं सर्व इंग्लंडहून रवाना होतात असें समजतें.

गुजराथसमाचाराचे कर्ते व मालक यांस गेल्या सप्टेंबर महिन्यांत लोकांच्या अब्रूस धक्का पोंचण्यासारखे मजकूर लिहिल्याबद्दल अडीचशें रुपये दंड झाला होता. हल्लीं याच प्रकारच्या आरोपावरून त्यांस सेशन कामिट केलें आहे असें ह्मणतात.

बर्लिन एथें ता० ३ रोजीं बडा खाना झाला त्यावेळेस फ्रान्सचे वकील हजर असतां विलियम बादशहा स्पष्टपणें बोलले कीं फ्रान्स व जर्मनी यांजमध्यें चालू असलेल्या दोस्तीमध्यें अंतर पडण्याची भीति नाहीं.

इस्टर्नसायबेरिया प्रांतांत रशियन सरकारास १४ सोन्याच्या खाणी सांपडल्याचें समजतें.

अलहाबाद एथें वकिलीचे परीक्षेस बारा शेवर लोक गेल्याचें समजतें. हे सुचिन्ह दिसत नाहीं. ने. ओ.

---

## आरोग्यशास्त्र.

मागिल अंकावरून एकाच प्रकारचे ह्मणजे नुसतें नैट्रोजन असणारे मांसादि पदार्थ किंवा नुसतें कारबान असणारे चरबी इत्यादि पदार्थ भक्षन मनुष्याचा निर्वाह होणार नाहीं असें सिद्ध करून दाखविलें. मुळींच नैट्रोजन नसणारे पदार्थ ह्मणजे चरबी निरनिराळ्या जातींचे क्षार व उदक हे होत. तर असले पदार्थ, वनस्पतीवर उपजीविका करणाऱ्या प्राण्यांच्या नेहेमीच्या अन्नांत ह्मणजे निरनिराळ्या प्रकारचें धान्य, गोंद, साखर, तेल इत्यादि पदार्थांत फारच थोडे असतात. धान्यें वगैरे पदार्थांत नैट्रोजन बरेंच असल्या कारणानें तीं खाणाऱ्यास जीवनास अवश्य असे जे दोन पदार्थ नैट्रोजन व कारबान ते मिळून त्यांचें उपजीवन होतें. ही शरीर पोषणाची गोष्ट झाली. आतां जे निराहार करितात ह्मणजे कोणत्याच प्रकारचें अन्न घेत नाहींत त्यांची काय अवस्था होते तें पाहूं.

१ शरीराचें वजन दिवसेंदिवस कमी होतें. तें पहिल्या थोड्या दिवसांत अतिशय च कमी होतें. परंतु त्याचप्रमाणें पुढें होत नाहीं. सुमारें दोन पंचमांश कमी झालें ह्मणजे मृत्यू जवळ आला असें समजावें. निरनिराळ्या भागाचें निरनिराळ्या प्रमाणानें वजन कमी होत जातें तें येणेंप्रमाणें.

| | शेकडा अंश. |
|---|---|
| चरबी | ९३ |
| रक्त | ७५ |
| प्लीहा | ७१ |
| प्यॉनक्रियास | ६४ |
| यकृत | ५२ |
| काळीज | ४४ |
| अंतर | ४२ |
| हलनचलनाचे स्नायु | ४२ |
| जठर | ३९ |
| अन्न व श्वासोच्छ्वासाच्या नळ्या | ३४ |
| त्वचा | ३३ |
| मूत्रपिंड | ३१ |
| फुप्फुस | २२ |
| अस्थि | १६ |
| नेत्र | १० |
| मज्जामंडळें | २ |

२ निराहारानें शरीरांतील ऊब कमती होते. दिवसास १° किंवा २° वर खालीं होण्याबद्दल ५° किंवा ६° फरक पडत जातो. ह्यानेंच मनुष्याची प्राणहानि होते. अशा प्रकारच्या अन्नाशिवाय प्राण जाणाऱ्या मनुष्यास अन्नापेक्षां उबेचीच गरज अधिक असते. त्यास अन्न जास्त दिलें तर अंगांत उष्णता फारच कमी असल्या कारणानें तें पाचन करण्याची शक्ति मुळींच राहिली नसते. मागील दुष्काळांत कित्येक उदार व धार्मिक लोक अनाथांस अन्न पुष्कळ देत व त्यापासून त्यांचें संरक्षण न होतां उलट अतिसाराचा उपद्रव मात्र होत असे. त्या गरीबांस ऊर्णा वस्त्रांची जेवढी जरूर तेवढी अन्नाची जरूर नव्हती.

३ अन्न न मिळालें ह्मणजे पहिल्यानें क्षुधा अतिशय लागेत, कांहीं वेळानें ती क्षुधा अगदीं नाहींशी होऊन जठराच्या ठिकाणीं पेटके येऊं लागतात. तहान फार लागेत झोंप मुळींच नाहींशी होते. शरीर दुर्बळ होऊन कृश होत जातें. श्वासोच्छ्वासाला व सर्वांगाला दुर्गंधी सुटते. व शेवटीं आंतसार किंवा सन्निपात होऊन प्राणहानि होते

४ मुळींच अन्नोदकावांचून राहिलें तर मनुष्य सहापासून दहा दिवसांच्या आंत मरण पावेल. इतक्या दिवसांत थोडें पाणी जरी प्याला तरी कांही दिवस अधिक वांचेल. कित्येक साधु मुळींच अन्नाला शिवत नाहीं किंवा नुसता निंबाच्या रसावर राहतो अशा ज्या आपण गोष्टी ऐकतों त्या सर्व गप्पा समजाव्या.

५ अन्नाशिवाय राहिल्यानें आंतील सर्व इंद्रियांचें आकुंचन होऊन तीं शुष्क पडतात. जठर व अंतरें पापुद्र्यासारखीं पातळ व पारदर्शक होतात, शरीरांतील सर्व धातु वाळून जाते, परंतु पित्ताचें त्याप्रमाणें होत नाहीं. मरणानंतर शरीरास लागलीच दुर्गंधी सुटून तें कुजूं लागतें. पु.

---

हें पत्र अकोलें एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १४ अकोला, सोमवार तारीख २२ माहे मार्च सन १८८० इसवी. अंक १२

## वऱ्हाडसमाचाराची किंमत.

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५० |
| „ अखेर | ६ |
| किरकोळ अंकास | ७ |
| डाक हाशील. | ०४ |
| वर्षाचे अगाऊ | १८८ |
| „ अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारे लोकां कडून अगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०३ |
| „ दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

### ५० रुपये बक्षीस

आमची एक पाचाची आंगठी पाचाचे भोंवताली बारीक हिरकण्या जडल्या आहेत. पांच चौकोनी असून थोडा लांबट आहे व अगदी नवीनागार आहे. गिनीचे सोन्यांत बसविलेला आहे. ही आंगठी काल रोजी गहाळ झाली. जो कोणी सापडवून आणून देईल त्यास आह्मी ५० रुपये इनाम देऊं. कळावें, ता० १३ मार्च सन १८८० इ०

बहिमनजी जामासजी. सी. आय. इ.
असिस्टंट कमिशनर

## नोटिस.

दवलत वल्लद महिमा पाटील रहाणार मौजे फुली प्रगणे वडनेर तालुके मलकापुर जिल्हे बुलढाणे यांस खाली सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते की तुह्मी व आह्मी साक्षात बंधू असून आजपर्यंत एकत्र विचारानें होतो हल्लीं तुमचा आणि आमचा बेबनाव झाल्यामुळें आह्मी निराळे झालों आहों परंतु वडिलोपार्जित व स्वसंपादित मिळकत स्थावर जंगम सर्व तुह्मी वडील असल्यामुळें तुह्मा जवळ आहे त्या मिळकतीचे विभाग हिशेरसीदीप्रमाणें होण्याचे असून ते झाले नाहींत यास्तव या नोटिसीनें तुह्मास कळविण्यांत येते कीं ही नोटिस पावल्यापासून पंधरा दिवसांचे आंत सर्व जिनगीचे सारखे विभाग करून आमचे कबजांत द्यावी. न दिल्यास रीतीप्रमाणें तजवीज करून नोटिशीचे खर्चा सुद्धां घेण्यांत येईल हें खूप समजावें. कळावें तारीख १४ माहे मार्च सन १८८० इसवी.

(सह्या.)
सपत वल्लद महिमा पाटील
दस्तुर खुद.
गणू वल्लद महिमा पाटील
दस्तुर खुद.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रिसवड ता. १२-३-८०

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. फार दिवस झाले आपल्या पत्राच्या भेटीस येण्यास बनलें नाहीं याची पत्रकर्ते महाराज माफी असावी व चार ओळी आपल्या पत्रांतून प्रसिद्ध करण्याकरितां पाठवीत आहे याचा अंगीकार करावा.

सालमजकूरीं रबीचीं पिकें उत्तम येऊन फार स्वस्ताई होत चालली आहे हल्लीं १८ रुपये खंडी जवारी मिळते. गहू २०—२२ रुपये खंडी आहेत. या मापाचा अंदाज आपल्या लक्षांत येण्यासाठीं त्याचे परिमाण सांगतों----(वीस पक्या शेरांची पायली सोळा पायलीचा मण व वीस मणाची खंडी) गव्हांची रेलचेल उडाली आहे. गरीब लोकांची पंढरी पिकली आहे. सावकार लोक आपले धान्याचीं घरें भरीत आहेत. कुणबी लोक कर्जाबद्दल साहुकार लोकांच्या घरांत धान्याचीं पोतीं नेऊन सोडीत आहेत लोकांचा असा समज आहे कीं, सावकार लोकांच्या घरांत धान्य गेल्यावर पुन्हा महरगना होईल. ईश्वर करो व तसा प्रसंग न येवो.----हल्लीं उष्णता भासूं लागली आहे. रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं. खोकला मात्र कोठें कोठें आढळतो. गावांत सडका वगैरे चांगल्या आहेत. रोग न यावा ह्मणून चीफ कान्स्टेबल व आनररी माजिस्त्रेट सफाईचा चांगला बंदोबस्त ठेवीत आहेत. गावचे अधिकारी पाटील पांडे हे आपल्या कामांत हुशार असून रयतेच्या हिताची रात्रंदिवस कळकळ बाळगितात. आपल्या कामाकडे हे चांगले लक्ष घालतात. लोकांची सुधारणा करण्यास हे फार झटतात. एथील पाटलांचें घराणें नामांकित आहे. यांच्या घराण्यांतील एक तहशिलदार होऊन गेले. येथें मुख्य व्यापार मारवाडी लोकांच्या हातांत आहे. इतर लोकही करितात परंतु मारवाडी लोकांच्या वरचस्वा पुढें इतरांचे तेज पडत नाहीं. मुख्य तीन साहू जाड आहेत. तिघेही नामांकित आहेत एथें हुंड्या वगैरे चालतात. अमिचंद ह्मणून मोठे साहुकार आहेत. यांनीं चांगला उत्तम बगीच्या केला आहे. आजपर्यंत या बागेप्रीत्यर्थ यांनीं ५--६ हजारापर्यंत रुपये खर्च केल्याबद्दल लोक बोलतात. बागेंत संत्रे, नारिंगे, जांब व इतर पुष्कळ पदार्थ लाविले आहेत. मध्यभागीं बंगला बांधला आहे. ही बाग फार मनोवेधक व पाहाण्यास चांगली असल्यामुळें नवीन कोणी आला असतां ती पहावयास जातो. हे शेटजी मोठ्या आनंदानें सर्वांस ती पहावयास बोलावितात. या शेटजीनां विद्येची गोडी आहे व या कारणानें ते येथें शाळेतही मात असतात व शाळेच्या कामीं मदत करितात असें ऐकतों. हें खरें असल्यास ही गोष्ट मोठी आनंदाची मानिली पाहिजे. विद्येच्या कामीं मदत केल्यानें यांचा दर्जा सरकारांतही विशेष वाढणार आहे. हे आपल्या मुलांनांही विद्या शिकण्यास शाळेंत पाठवितात असें ऐकतों. या शेटजीस पैसा अनुकूळ आहे. यांनीं सार्वजनीक कामाकडे लक्ष दिल्यास यांस हे मोठें भूषण आहे. ह्या गांवातील शाळा पूर्वीं पन्नास रुपयांची होती इंग्रजी शिकण्याचा हुकुम होता. परंतु कित्येक कारणांनीं ती नीच दर्जेस आल्यानें इंग्रजी बंद झालें. पुढें ती मराठी झाली व ती मराठी दर्ज्यांत तरी कायम रहाते किंवा नाहीं अशी लोकांनां पंचाईत पडली होता परंतु आमच्या रिसोडवाशी लोकांच्या सुदैवानें गेल्या जून महिन्यांत एथें रा. रा. गंगाधर रावजी सोहोनी या नावाचे मास्तर बुलढाण्याकडून आल्यानें ती भीति नाहींशी होऊन लोकांचीं मनें शाळेबद्दल फार आनंदीत झालीं आहेत.

पूर्वीं या शाळेची सुधारणा अशी कधीं झाली नव्हती असें ऐकतों. बाग किती सुंदर लाविला आहे, तालिमखाना किती चांगला केला आहे, कसरत करून मुलें किती आनंद पावतात? इतकें असूनही अभ्यासाच्या व मुलांच्या बाबदींत किती सुधारणा केली आहे! गेल्या वार्षिक परीक्षेचा तर उत्तम

निकाल झाल्याचें जिकडे तिकडे बोलतात ५५ पैकीं ४२मुलें पासझालीं असें कळतें. सर्वांचें मनें शाळेकडे लागलीं आहेत. गावांत एकही मुलगा खेळतांनां दृष्टीस पडत नाहीं या मास्तरासारखा मेहेनती मास्तर आह्मीं कधींच पाहिला नाहीं. यास जेवणास सुद्धां फुरसत सांपडत नाहीं धर्मोपदेशकाप्रमाणें यांचा उपदेश जेथें पाहावें तेथें चालू असतोच, तालमीचें सामान करण्याविषयीं यांची तर धन्यच होय. मलखांब तर रोविलाच आहे. जोड्या तर पडल्याच आहेत. यांनीं ५० रुपये वर्गणी जमविली व चाळीस रुपये खर्चून शाळेला तरटपट्टीची बैठक करविली असें समजतें. बाहेरून कोणी सरदार आले, कोणी मोठा मनुष्य आला तर त्यास भेटण्यास जाणें, त्यास शाळेंत आणणें, शाळेची व्यवस्था दाखविणें, हें काम तर यांसच साधलें आहे ह्मटलें तरी चालेल. यांच्या विनंती वरून कोयाळचे लक्ष्मी नारायण मारवाडी यांनीं गरीब मुलांचे फीकरितां दरमहा आठ आणे देण्याचें कबूल केल्याचें कळतें. तसेंच या गावांतील रामचंद्र मारवाडी येत्रकर यांनीं आपण होऊन एका गरीब मुलाची फी देण्याचें पतकरिलें आहे.

तारीख ८ रोजीं रा. रा. भीमराव अनंत नायब तहशिल्दार ता. वाशीम यांची स्वारी एथील हिंदुस्थानी शाळेचें घर हरास करण्याकरितां आली होती. त्यांनीं शाळा पाहिली. मुलांची कसरत व अभ्यास पाहून खुष झाले व आनंदाने एक रुपयाची मुलांनीं बरफी वाटली. हे नायब तहशिल्दार हुशार, मेहनती असून यांनां विद्येची गोडी चांगली आहे. गरीबाकडे यांचें लक्ष उत्तम आहे.

तारीख १० रोजीं मेहेरवान अ. कमिशनर साहेब यांची स्वारी शाळा पाहण्यास आली होती. बाग बगीच्या, मुलांची मोठी संख्या, शाळेची सुधारणा, व मुलांची कसरत पाहून साहेब बहादुर फार खुष झाले. व मुलांना दोन रुपयांची मिठाई दिली असें कळतें साहेब बहादुर विद्येच्या कामीं चांगली मदत देतात व गरीबा गुरीबांवर यांची कृपेची नजर असते.

या गावांतील शाळेस मदत तीन असामी देतात. एक आनररी माजिस्त्रेट दुसरे त्रिमण राव त्रिंबक पांडे, तिसरे यनोजी खंडोजी देशमुख. या पत्राचा स्वीकार करून छापावें. पत्रविस्ताराची माफी करावी हे विनंती

आपला दास
एक "ग्रामस्थ"

## धैर्यवान नाटककार यास हितबोध.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि० वि० आपल्या अकोल्यास आज बरेच दिवस कालिदास पुणेकर नाटक आलें आहे. त्याचे मालक रा. रा. नानाभाई गणपराव व बाळजी गणपतराव धैर्यवान या नावाचे उभयतां बंधू आहेत. त्यांचे नाटकाचें स्वरूप व पात्राची खुलावट कित्येक वेळां आपले पत्रांतून प्रसिद्ध झाली आहे. व मी कित्येक खेळ आणि त्यांचा खटाटोप पाहिला आहे. त्यावरून माझी कल्पना अशी झाली आहे कीं, ते या योगानें लवकरच कुबेरासही भिकारी करूं शकतील. सदर्हू उभयतां गृहस्थ तरुण असून भोळसर व मनाचे मोकळे आहेत व त्यांनीं नाटकाचा सार्वजनिक उद्योग आरंभिला आहे. तर त्यांस आपलें कर्तव्य कर्म ह्मणून समजुतीच्या व हिताच्या दोन गोष्टी सांगून पाहाव्या. उपयोग झाल्यास नाटकाची सुधारणा किंवा द्रव्यापव्ययाची बंदी तरी होईल असें मनांत आणून पुढील लेख लिहिला आहे. याजबद्दल मनांत राग न आणितां निष्प्रांजलपणानें त्यांनीं हिताहिताचा व कीर्ति अकीर्तीचा विचार करावा व अजून वेळ गेला नाहीं तो उमजावें आणि सावध व्हावें. अशी माझी इच्छा आहे. ती परमेश्वर सफळ करो.

धैर्यवान यांचा पूर्वापार इतिहास मला ठाऊक नाहीं. ते मुंबईचे राहणारे असून पैसेवाले आहेत. व मुंबईस पुण्यास इतर नाटकवाल्यांनीं ते कंत्रांट घेत असत असें ऐकण्यांत आहे. पुढें नाटकाची यांस गोडी लागली ह्मणजे नाटकपात्रें जमवून त्यांचे आपण मालक होऊन नाटकें करावींत अशी यांस इच्छा झाली. द्रव्याची घरचीच अनुकूलता मग मनांत येईल तें करावयास अशक्य काय? त्यागलीच नाटक उभें केलें त्यास सुमारें दोन वर्षें झालीं. तीसचाळीस मंडळी नाटकांत भरली. आपलें नाटक लोकांनीं चांगलें ह्मणावें हीच हौस. पण त्याची परीक्षा नाहीं व ती करण्याचे कामांत विद्वानांचें सहाय्य घेतलें नाहीं. मागें मराठी नाटकें रंगभूमीवर करण्या

चा प्रचार सुरू झाला त्यावेळीं नाटक कसलें ही रुचत होतें. तें तमाशाच्या वरच्या पायरीचें असलें ह्मणजे झालें. व त्यांत थोडे अधिक बोलके ह्मणजे महा पंडीत. ह्मणून तशा वेळीं नाणावलेले, विद्येचा ज्यांस ह्मणण्यासारखा गंध नाहीं, असे कोणी देव पाटांत, कोणी राक्षस पाटांत, कोणी स्त्री पाटांत, नावाजलेले असे लोक जुने कपी होऊन घरीं बसले होते किंवा कोणी दुसरे कोणाचे नाटकांत होते त्यांस मोठ माठाले पगार देऊन यांनीं नोकर ठेविले. ह्मणजे पाउणशे, साठ, पन्नास, चाळीस असे असे पगाराचे कांहीं ठळक लोकांची भरती केली व दहा, पंधरा, वीस असे पगार बाकीचे लोकांस देऊं करून तीस चाळीस लोक जमविले व नाटक सुरू केलें आणि बाहेर प्रांतीं स्वारी निघाली असें ह्मणतात. प्रत्येक पात्राला कपडा उत्तम, किरीट कंढलें उत्तम, सामान सुमान उत्तम, पडदे चांगले, भपका चांगला लोकांनाही पगार चांगला ह्मणून तेही असल्या अकलेंत झटून काम करणारे तेव्हां मालकाचें मन रमलें. मालक श्रीमान त्यांनां बाहेर प्रांतीं भिकार स्थितींत राहण्याची सवय नाहीं व मुंबईप्रमाणें ह्मटला जिन्नस बाहेर मिळण्याची अडचण, मग तंबू डेरे राहुट्या बरोबर घेतल्या, घोडे गाड्या बरोबर घेतल्या. श्रीमंत लोक त्यांनां बाहेर कसें करमावें ह्मणून मोठाले पगार देऊन मनमोहक पाखरेंही जवळ केलीं. अमुक जिन्नस मिळत नाहीं, मुंबईहून पार्सल करून आणा. पडेल ती किंमत व मागेल तो खर्च. हर जिनसेकरितां मुंबईसी पत्रव्यवहार. त्यात कामें त्वरेचीं आणी सरकारचें टपाल फार मंद गतीचें मग तारायंत्राशी गाठ ठेविली. तरी महिना पंधरा दिवस गेले कीं मुंबईस जाण्याचे काम पडावें मग चालले मुंबईस, रिटर्न टिकेट, व बसावयाचा दर्जा पहिले क्लासचा, पांचच्यार तरी मनुष्यें बरोबर असावयाचीं असा क्रम चालला ह्मणतात पण ही खानगी गोष्ट आहे यावर टीका करण्यास मला अधिकार नाहीं व मी करित नाहीं. श्रीमानाच्या पदरचे नोकर त्यांस वाईट कशाला ह्मणतात, त्यांतून हे नोकर नाटकवाले ह्मणजे रसभरित बोलणें, तबेत खुश ठेवणें, आपल्यावर मर्जी बहाल करून घेणें इत्यादि प्रकारचा खुश मस्कऱ्याचा धंदा त्यांनां करतळमळ. राहाण्यास चांगलें घर न मिळेनाका, व बसावयाच्या ठिकाणीं धडाभर केर असेनाका, पण नाना साहेब, खारव्यांची गादी खरखरीत लागते, मखमलीची असावी असें भोवतालच्यानीं ह्मटलें कीं मखमलीचें सांगशन, मग त्यांत गाद्या, उशा, तक्के, तिवासे यांची एकदमच तयारी ! असो माझा सूचनेचा मुद्दा पुढेंच आहे. सदरीं लिहिल्या प्रमाणें जुन्या चालीचें नाटक यांनीं चालविलें आहे. व मी भीत भीत ह्मणतो कीं च्यार पांचशें रुपये दरमहा पगाराचे लोक यांचे पदरीं असतील. च्यार पांचशें रुपये भोजन खर्चास लागत असतील, शे दोनशे रुपये कापड खर्चास, शे दोनशे रुपये इतर खर्चांस, व शे दोनशे रुपये नव्या सामानास मिळून दीड दोन हजार रुपयाला गाठ आली. यांत पांच च्यारशे किंवा कांहीं अधिक रुपये नाटकाच्या टिकिटापासून निवळ जमें त पडत असतील तरी महिना हजारभर रुपये शिवाय पाहिजेत असें या हिशेबावरून झालें. वर्षा मानाने आज दोन वर्षांत २५ हजार रुपयांचा सुमार खर्च झाला असावा. तेव्हां किती वर्षें असलें पुण्यपरायण नाटक करण्याचा यांचा संकल्प आहे व किती लाख रुपये यांत घालविण्याचा यांचा निश्चय आहे. तें समजत नाहीं. आतां तर एका नाटकाचीं यानीं दोन नाटकें केलीं तेणेंकरून लवकर लवकर खर्चाची रकम वाढण्यास मोठें सोईचें साधन झालें असें वाटतें.

नानासाहेब व बाळासाहेब, आपली धन्य आहे व आपलें औदार्य विलक्षण आहे. पण माफ करा, मी ह्मणतो याचा राग मानूं नका, मी तुम [illegible] लिहितों व इमानें इतबारें तुह्मा [illegible] कांहीं महाराज, काय हा तुमचा खर्च! [illegible] ही पैशाची चीज! काय हा खटाटो[illegible] आणि काय ही तुमची हौस! या तुम[illegible]सारख्या औदार्यांत मी खरोखर सांगतो कीं, तिलमात्र पुण्य नाहीं, परोपकार नाहीं, प्रतिष्ठा नाहीं, सद्व्यय नाहीं व योग्य बदला नाहीं. रुपयांच्या गोण्याच्या गोण्या खर्च करून नाटक असलें ढपळशाई? काय राक्षसाचें अलललल! काय विदूषकाच्या चेष्टा! काय 'सांगतो श्रवण कर' हा थाट! काय फार्साच्या काहण्या! अहाहा! यांत कांहीं सौरस्य आहे काय? कांहीं नाहीं. अशा विपुल खर्चानें नाटक बाणेदार करावयाचें होतें तर बि ए एम ए चार विद्वान जवळ करावयाचे होते. गरीब कुटुंबांतील पांच पंचवीस चणचणीत मुलें बेताचे पगार देऊन ठेवावयाचीं होतीं. व त्यांनां शास्त्रोक्त शिक्षण द्यावयाचें होतें. आणि संस्कृत, प्राकृत, इंग्लिश नाटकें करून कालिदास, भवभूती, शेक्स्पियर परशुरामपंत तात्या यांची धन्यता सर्वतोमुखीं करवून शाबास! नानाभाई शाबास! असें ह्मणवून घ्यावयाचें होतें. व आपलें नाव अमर करावयाचें होतें. हल्लींचीं आपलीं नाटकें अडाणी व साधारण समजुतीच्या लोकांच्या करमणुकी पुरती आहेत. व तशीं करणारे नाटकांचे तांडे देशावर खंडोगणती झालेले आहेत. तुह्मी श्रीमान व थोर गृहस्थ या कामांत पडला तरें याची खरी थोरवी जगास दाखविण्याचें काम तुमचें होतें. तें तुह्मीं आजपर्यंत केलें नाहीं व पुढेंही तुह्माकडून होईल असें वाटत नाहीं. कारण तुमचा भर दुसरीकडेस वळला. मागें कोणी प्रेक्षकानें तुमच्या नाटका विरुद्ध वऱ्हाडसमाचारांत एक पत्र लिहिलें होतें तें वाचतांनां तुह्मी ह्मणाला, "बरें आहे, याना दाखवूं, तसले खेळ दाखवू. मृच्छकटीक दाखवू, शाकुंतल दाखवू" पण त्याप्रमाणें कांहींच न करितां तुह्मी निघून गेला. सबब मी ह्मणतो कीं यापुढेंही तुह्मांकडून तसें होण्याजोगें नसल्यास बस करा. व हात आटोपा. पाण्यासारखा पैसा तुह्मी खर्चुन त्याचें हें चीज करित आहा याबद्दल तोंडावर नाहीं, पण पाठीमागें बहुत लोक नावें ठेवितात. लोकांनां तुमची काय भीड? गायकवाडानीं खबुतराचें लग्न केलें तेव्हां ते तर राजे होते पण लोकांनीं त्यांनां बरें ह्मटलें नाहीं. आपण आपल्या द्रव्याचे सर्वतोपरी मुखत्यारें आहा पण आपण देवादिकांचीं नाटकें करिता आणि आपलें नाटक असें आहे हें बरें नाहीं. आपण लक्षाधीश असला तर ईश्वरकृपेनें कोट्याधीश व्हा पण पैशाचा सदुउपयोग करा. 'ज्यात " इदंच नास्ति, परं न लभ्येत" असें आहे तें करूं नये असे सुज्ञ ह्मणतात तर तें कळविलें आहे. याचा राग मानूं नये. खरा हितवाद तुह्मांस सांगितला आहे. विस्ताराची माफी असावी. कळावें तारीख १८।३।८०

तुमचा मित्र
हितेच्छु

---

# वऱ्हाडसमाचार.

मिति फाल्गुन शुद्ध ११ शके १८०१

सुटी— येत्या सोमवारचा आमचे वर्तमानपत्राचा दिवस शिमग्याचे सुटींत आला आहे सबब त्या दिवशीं वऱ्हाडसमाचार निघूं शकणार नाहीं.

## वासुदेव बळवंत फडके याचे साथीदार.

प्रख्यात वासुदेव बळवंत फडके यास गेले सालीं जुलै महिन्याचे तारीख २१ रोजीं मोगलाईंत मौजे देवनगरी जिल्हा कुलगुल एथें कैद करून पुण्यास नेलें त्याच सुमारास कांहीं ब्राह्मण वगैरे ३६ असामी फडके मजकूर यास सामिल असल्याचे चार्जावर पकडून मोगलाईत गुलबर्गा एथील जेलांत शृंखळा बंधन करून ठेवले होते. मोगलाई जेलखान्यांत कैदी लोकांची स्थिति नीट राहत नाहीं. सदर्हू ३६ असामि कैदेंत ठेवल्या नंतर इन्साफावांचून नऊ महिनेपर्यंत ते कुजत पडले होते. त्यांपैकीं चार असामी हीव तापानें कैलासवासी झाले. पुढें चालते महिन्याचे तारीख १० रोजीं शहाबाद एथें कामिशनापुढें खटला सुरू झाला. कामिशनर मेहेरबान डाब साहेब बहादूर सुप्रिन्टेंडेंट पोलिस व रेलवे माजिस्त्रेट हे इंग्रिश सरकारतर्फे व एक मुलाखान साहेब सदर तालुकदार मोगलाईतर्फे असे नेमिले होते. मि. अबदुलहक इकडून रजेवर असलेले असिस्टंट कमिशनर हे प्रासिक्युशन तर्फे होते आणि कैदी तर्फे डिफेन्साकरितां दैवयोगानें एक हुशार व धूर्त पार्शी वकील सिकंद्रराबादेहून व दुसरे वकील नारायणराव गुलबर्ग्याहून असे दोन आले होते. खटला तारीख १० मिनहूस चालू होऊन तारीख १७ रोजीं समाप्त झाला. तो असा कीं प्रथम दिवशीं खटल्याचे सुरुवातीस सुमारें १५ असामीवर बिलकुल खटला चालविण्यास जागा नसल्यामुळें कामिशनर लोकांनीं त्यांनां सोडून दिले. बाकी राहिलेले १७ असामीवर खटला बारीक व शुद्ध तपासानें चालून निकाल झाला तो येणेंप्रमाणें:—

एकास सात वर्षें, एकास दीड वर्ष, व एकास एक वर्ष कैद आणि दोन दुसऱ्या कैदीस प्रत्येकास ५० रुपये दंड. तो न दिल्यास दोन महिने सक्त मजुरी व बाकी राहिलेले असामी १२ यांजवर पुरावा नसल्यामुळें सोडून दिले. डोंगर पोटीरी आहे त्यांतून कांहीं तरी मोठी वस्तू जन्मास येईल परंतु भुरकन ऊंदीर निघाला; त्याप्रमाणें या खटल्याविषयीं झालें. मि० अबदुल हक यांणीं नऊ महिनेंपर्यंत भपका व बोभाटा मांडला होता त्याचा परिणाम असा झाला. सदर्हू कैदी लोकांवरील खटला इंग्लिश हद्दींत माजिस्त्रेटापुढें चालला असता तर एकंदर कैदी सुटले गेले असते असें ह्मणतात. कारण आरोपी यांनीं पोलिस अमलदारांपुढें कांहीं कबूल जबान्या दिल्या होत्या त्यां खेरीज दुसरा कांहीं पुरावा नव्हता असें ह्मणतात.

वरील हकीकतीवरून कळेल कीं, सुमारें २७ असामि विनापराध विनाकारण धरून अटकेंत ठेविले होते. त्यांचे खाण्याविषयीं कांहीं दाद फिर्याद नसल्यामुळें त्यांस कैद केल्यापासून सात महिनेपर्यंत गांठचें खावें लागले पुढें त्यांपैकीं चार असामी मरण पावल्यावरून मोगलाई सरकारापर्यंत बोभाटा गेला तेव्हां त्या सरकारानें त्यांस खाण्याचा खर्च देण्याचा ठराव केला. या खटल्यांत मोगलाई पोलिस अमलदारांनीं थोडासा साधारण विचारें खर्च करून काम बजावलें असतें तर विनाकारण बापडे २७ निरापराधी लोकांचे नुकसान, त्यांनां त्रास व ज्या चार असाम्या जेलांत मेल्या हीं विघ्नें टळलीं असतीं.

---

## वऱ्हाड

रा. रा. रामजी शाळिग्राम वणीचे पोलिस इन्स्पेक्टर यांची खामगावास नेमणूक झाल्याप्रमाणें ते या आठवड्यांत एथें आले. हल्लीं त्यांस अकोटास नेमून मि० स्पावियल साहेब यांस खामगावास नेमिलें व ते त्याप्रमाणें तेथें गेले. रामजी शाळिग्राम हेही ८।४ दिवसांत अकोटास जातील. रा. रा. बाळकृष्ण काशिनाथ जोशी एथील पोलिस इन्स्पेक्टर हे ६ दिवसांची रजा घेऊन नाशकास गेले आहेत.

कालिदास नाटकाची अर्धी मंडळी खामगावास गेली. तेथें शनिवारीं त्यांचें नाटक झालें. व अर्धी मंडळी एथें आहे तिनें शनिवारीं एथें नाटक केलें. रा. रा. नानाभाई खामगावास गेले असून धाकटे बंधू रा. रा. बाळजी हे एथें आहेत. व नवीन पडदे वगैरेची तयारी चालली आहे.

मि० नसरवानजी कामा एथील बारिस्टर हे बिगर परवानगी जु० कमिशनर आफिसांत आंहीं कागदपत्र पहात होते सबब क० बेल साहेब यांनी त्यांस तेथून घालवून दिलें असें कळतें. या विषयीं सविस्तर हकीकत पुढे लिहू.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं, मे० दस्तुर बाहिमनजी साहेब सी. आय. ई. यांचे हातांतील जी पाचेची अंगठी हरवली होती व जिजबद्दल त्यांनीं ५० रुपये बक्षिसाचा जाहिरनामा लाविला होता ती अंगठी स्टेशनावर वेटिंग रूममध्यें सापडली.

एथील डिस्पेन्सरीचें काम वें ह्मणून तिजवर म्युनिसि रांतून ५ गृहस्थांची ए

आहे. व ती प्रति महिन्यांत पहिले सोमवारी डिस्पेन्सरीमध्यें जमत जावी असें ठरलें आहे.

---

रेसिडेंट साहेब रजेवर जाणार असें मागें पायोनियरमध्यें वर्तमान आलें होतें. हल्ली मुंबईच्या निद्याच्या इंग्लिश पत्रांतून तीच खबर तारेंतून आलेली आहे त्यावरून निश्चय दिसतो. पण त्यांत आमचे कमिशनर साहेब [illegible] असें अजून प्रसिद्ध

---

जुडिशियल कमिशनर साहेब चिखलदऱ्याकडे गेले

---

जुडिशियल कमिशनर साहेबाचे डिपुटि क्लार्क आफ धि कोर्टचे जागेवर मि० महमद इस्मायल एथील डिपुटी कमिशनरचे डिपुटि क्लार्क यांस आफिशिएटिंग नेमिलें होते. व महमद इस्मायल यांचे जागेवर जु० आफिसांतील ६० रुपयांचे क्लार्क मि० नारायण बाळकृष्ण गद्रे यांस नेमावें अशी शिफारस झाली होती पण त्याप्रमाणें घडून न आल्यामुळें जु० क० साहेबांनीं गद्रे यांस आपलेच आफिसांत आफिशिएटिंग डिपुटी क्लार्क नेमिलें. त्यामुळें महमद इस्मायल हे आपले जागेवर डिपुटी आफिसांत गेले. इतक्यांत तेथील क्लार्क आफ धि कोर्ट रा. रा. कृष्णराव हरी कोल्टकर यांची रजा मंजूर होऊन आल्यामुळें डिपुटी कमिशनर मे० फिटझरल्ड साहेब यांनीं त्यांसच आपले आफिशिएटिंग क्लार्क आफ कोर्ट नेमिलें. आणि या एकंदर कारणामुळें रा. रा. हरी रामचंद्र रोहणखेडकर बी. ए. हे क्लार्क आफ कोर्ट होण्याचे तयारींत असतां व शाळेकडून किरकोळ रजा घेऊन ४ दिवस कामाची माहितीही करून सज्ज झालेले असतां त्यांचा बाण केवळ वायबार गेला व त्यांनां स्वस्थपणें पाहिलेच आपले कामावर रहावें लागलें. याबद्दल त्यांनां बरेंच वाईट वाटेल व लोकांनांही थोडें चमत्कारिक वाटत आहे. पण यांत कोणाचा कांहीं इलाज नाहीं. तथापि आह्मास पुन्हा इतकें वाटतें कीं, रोहणखेडकर यांस थोडे दिवस तरी ही जागा मिळाली असती तरी बरें होतें. मुनसफीच्या परीक्षेच्या तयारींत ते एक वर्षभर गढलेले होते तोही त्यांचा उद्योग या खटाटोपांत दिला पडून याही खटपटीचें कांहीं चीज झालें नाहीं. अस्तु. त्यांनीं निरुत्साह न व्हावें. पुढें कधीं संधी येऊं शकेल.

---

जु. क. आफिसांत मि. नारायण बाळकृष्ण हे डिपुटी क्लार्क झाल्यामुळे त्यांचे ६० रुपयांचे जागेवर मि. मिनास यांस नेमिलें व मि. मिनास यांचे जागेवर उमेदवार मि. परेरा यांस नेमिल्याचें कळतें.

---

मौजे सर्पाची कान्हेरी तालुके आकोलें येथे मोकदम पाटिल लोकांनीं पेवपट्टीचा कर गांवांतील रयत लोकांवर व इतर भाऊबंदावर बसवून तीनशें साडेतीनशें रुपये अजमास वसूल केले, अशा प्रकारचा अर्ज त्यांच्या भाऊबंदांपैकी एका औरतेनें मे० किट साहेब अ० क० यांजपुढें दिला. त्याची कच्ची हकिकत समजण्याकरितां त्यांनीं तो चीफ कानस्टेबल बारीटाकळी यांजकडे रवाना केला. त्याचा चवकशी होऊन ता० १९ माहे मार्च रोजीं तो परत रवाना झाला. मे० किट साहेब यांजपुढें पूर्ण चवकशी होऊन अखेर निकाल काय होईल तो पहावा.

---

वायव्य प्रांतांकडून नवीन नेमणुक झालेले जंगल खात्याचे डिपुटी कनसरवेटर मि. वागशा इकडे येऊन आपले कामावर रुजू झाले.

---

खामगावचे म्युनिसिप्यालिटींतील मेंबर नवे जुने करून कायम केले ते:---

टी हॅकेट इस्कायर, एच एस रीड इ० ए हिगिंग इ०, सी एच मेन इ०, मि. पुरणमल जयनारायण, मि. शामलाल ओंकारदास, मि. वामन लक्ष्मण, व मि. भोलाखान लालखान. या शिवाय हुद्याचे नात्यानें मेंबर आहेत ते, डिपुटी कमिशनर, असिस्टंट कमिशनर, स्यानिटरी कमिशनर, पोलिस सुप्रिंटेंडेंट व तहशिलदार.

---

मि० काटग्रेव्ह साहेब पोलिस सुप्रिंटेंडेंट यांस २० वे तारखेपासून ३ महिन्यांची हक्काची रजा मिळाली. व ते परत येई तोपर्यंत मि० फ्रेजर आफि० असिस्टंट पोलिस सुप्रिंटेंडेंट यांस आफिशिएटिंग पोलिस सुप्रिंटेंडेंट नेमिलें.

---

रा. रा. सदाशिव भास्कर मेहेकरचे तहशिल्दार यांस सेकंड क्लास माजिस्त्रेटचे व सन १८७२ चा आक्ट १० यांतील कलम २९ अ ( पैकीं ४ थी रकम शिवाय करून बाकी )चे अधिकार दिले.

---

मलकापुरास पगारी सब रेजिस्ट्रार आहेत त्यांची चिखलीस नेमणूक केली. व मलकापुरचें काम तहशिलदाराकडे सोंपविलें.

---

गेल्या महिन्यांत मि. राईट साहेब पोलिस सुप्रिंटेंडेंट यांस तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली त्या संबंधानें सुप्रिंटेंडेंट लोकांत वर्गाबर्गी झाली ती अशी:---

मि कंबरलीग साहेब सेकंडक्लासचे आफिशियेटिंग फर्स्ट क्लास झाले--मेजर गनत्राप साहेब थर्ड क्लासचे आफिशियेटिंग सेकंड क्लास झाले. व मि. मोफट साहेब ४ थे क्लासचे आफिशियेटिंग थर्ड क्लास झाले.

---

रा. रा. गिरराव रामचंद्र उमरावतीचे तहशिल्दार यांची लोअर स्थांदर्ड परीक्षा पास झाली सबब त्यांस बुक सर्क्युलर नंबर ३४ यांतील रूळ ८ बरहुकूम वऱ्हाडांत तहशिलदाराचे रिविन्यु फुलपावरचे अधिकार दिले.

---

यवतमाळचे क्लार्क आफ धि कोर्टची जागा रिकामी आहे तिजवर रा. रा. आत्माराम अनंत हल्लीं तेथें काम करीत असलेले यांस कायम करून त्यांचे ८० रुपयांचे जागेवर एथील मि० महमद इस्मायल यांस नेमावें अशी शिफारस झाल्याचें ऐकतों. व त्याप्रमाणें झाल्यास त्यांची ७० रुपयांची जागा रा. रा. यशवंत महादेव खामगाव स्माल काज कोर्टाचे सेकंड क्लार्क यांस मिळेल असें ह्मणतात.

---

वऱ्हाडांतील पब्लिकवर्क खात्याच्या भागांची वाटणी पुढें लिहिल्याप्रमाणें केली.

१ पश्चिम वऱ्हाड भाग याचें सदर स्टेशन अकोलें. यांत बुलढाणें व अकोलें हे दोन जिल्हे.

२ पूर्व वऱ्हाड भाग---सदर स्टेशन उमरावती यांत उमरावती व इलिचपुर हे जिल्हे. पण यांतील खालीं लिहिलेले रस्ते गाळाऊ करून

३ दक्षिण वऱ्हाड भाग--सदर स्टेशन यवतमाळ. यांत जिल्हे वाशीम व वणी. शिवाय उमरावती जिल्ह्यांत असलेला यवतमाळ डामरगाव सडकेचा भाग आणि दारव्हा कारंजा मंगरूळ पीर सडकेचा भाग.

---

इलिचपूचे डिपुटी क्लार्क रा. रा. गणेश गोविंद यांस वाशिमास मि० शाबासखान यांचे जागेवर तहाशिलदार नेमिलें असें समजतें. आतां शाबासखा रजेवर जातील.

---

पातूर येथील दुर्गे खान ह्याचे येथील घरफोडीपैकीं कांहीं मालाचा- मि. स्याविल यांनीं तपास लावून अरोपी पकडून आणिले होते. त्यांची मे. किट्स सा० अ. क. यांजपुढें चौकशी होऊन प्रत्येकांस तीन तीन वर्षांची सक्त मजुरींची शिक्षा झाली. त्याच प्रकरणांत ह्या चोरीपैकीं कांहीं माल घेतल्याबद्दल येथील रामप्रसाद नांवाच्या एका सोनारास पोलिसानें कैद केलें होतें. त्याचीही चौकशी होऊन त्यास ५०० रु. दंड व तो न दिल्यास ६ महिने कैदेची शिक्षा झाली.

उ. अ.

---

उमरावती येथील एका परवार जातीच्या दलालानें पोलिसांत अशी खबर दिली आहे कीं, आपल्या येथें १०,००० दहा हजार रुपयांची चोरी झाली. सदर दलालानें खजिन्याची पटी कार्तिक पौर्णिमेस उघडली होती तेव्हां पासून तो गेल्या आठवड्यांत त्यानें पेटी उघडून त्यांत रुपये नाहींत असें पाहून पोलिसास वर्दी दिली तेथ पर्यंत पुनः पेटी उघडली नव्हती आणि खेरीज ती पेटी तेव्हां पासून तिची किल्ली गंजली होती ह्मणून उघडी असे.

गेल्या बुधवारीं रात्रीं उमरावती येथील जेलांतून एक १२ वर्षांच्या शिक्षेचा कैदी पळून गेला. हा कैदी पूर्वी एक वेळ पळून गेला होता ह्मणून समजतें.

मे० कमिशनर सा० यांची स्वारी दवऱ्यावरून उमरावतीस परत आली.

मुंबई कडील वकील रा. रा. हरी महादेव पंडित व रा. रा. कृष्णाजी काशिनाथ देशमुख उमरावती येथें वकिलीचें काम करण्याकरितां आले आहेत.

प्र. सिं.

---

मागाहून आलेली नोटिस.

रा. ह्मसाजी वल्लद सालु जात वंजारी अडनाव लाड वस्ती मोझरी प्रगणे व तालुके मूर्तिजापुर जिल्हे उमरावती यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचें माझें लग्न होण्यास सुमारें २० वर्षे झालीं व मजला ऋतुप्राप्त होण्यास ही ८ वर्षे झालीं आहेत. त्यांत तुमचे एथें ऋतुप्राप्त झाल्यावर दीड वर्ष पर्यंत होते परंतु तुह्मी पुरुषांत नसल्यामुळें मी आपला जीव जाळून राहिले होते. अखेरीस तुह्मी मजकरितां परपुरुष आणिल्यामुळें त्रासून मी माहेरीं राहिलें. आतां आपणास सांगणें हेंच आहे कीं आपली परिक्षा पंचासमक्ष एकाद्या कळवांतिणीसी करून माझे बंधूची खात्री करून द्याल तर मी नांदण्यास येतें तुह्मी माझे खाण्या पिण्याच्या खर्चाबद्दल दर साल ३६ छत्तीस रुपये प्रमाणें माझे भावास देऊन जावें. हे नोटिस पावल्यापासून पंध्रा दिवसांचे आंत करावें जर तुह्मी या प्रमाणें न केलें तर मी दुसरा घर ठाव पाहून गंधर्व विवाहाचा नवरा कायद्याप्रमाणें करीन मग तुमचा काहीं हक्क मजवर चालणार नाहीं हें खूप समजावें तारीख २८ माहे मार्च सन १८८७ इसवी.

( सही ) संती मर्द ह्मसाजी पालन करणार

विठोबा वल्लद हरी रहाणार

मंगरूळ पीर ता. म.

---

## वर्तमानसार.

मृत्यू.– श्री. रा. रा. दाजीसाहेब बुटी, नागपूर येथील नामांकित सावकार यांस मंगळवारीं शिवरात्रीचे दिवशीं सुमारें तीन वाजतां देवाज्ञा झाली. हे आलीकडे बरेच दिवस आजारी होते. जसे हे लक्ष्मीप्रसन्न होते तसेच सरस्वतीसंपन्नही होते. यांचें वय मरणसमयीं सुमारें ६० वर्षांचें होतें. यांच्या द्वितीय संबंधाच्या अल्पवयस्क अपत्यहीन कुटुंबास आणि इतर स्वजनांस यांच्या मरणानें असह्य दुःख होणार आहे. इं. प्र.

मुंबईस रशियन वकील ठेवण्याचा गुदस्ता ठराव झाला व त्या प्रमाणे एका फ्रेंच मनुष्यास रशियनसरकारानें पंधरा दिवसांपूर्वी मुंबईस आपला वकील नेमला. ही पहिलीच नेमणूक फ्रेंच मनुष्याची केली यांत रशियाचा कांहीं मतलब नसेलना अशी कित्येक शंका घेत आहेत, पण विचार करूं लागल्यास त्यांत कांहीं मतलब असण्याचा संभवच दिसत नाहीं. ही नवीच नेमणूक असल्यामुळें आणि यावेळीं दुसरा कोणी रशियन मनुष्य मिळत नसेल ह्मणून कोणाची तरी नेमणूक करावयाची असें समजून ही नेमणूक केली असेल.

मि. वामन रामचंद्र गोंद्रे हे रत्नागिरी जिल्ह्याचे डिस्त्रिक्ट फारेस्ट आफीसर झाले असें समजतें.

पंढरपुरच्या शेजारीं जें एक मोठें तळ्याचें काम चाललें आहे त्याकामावर ठाण्याच्या तुरुंगांतले सुमारें ५० कैदी ता. ११ रोजीं ठाण्याहून रवाना झाले.

ठाण्याचे सरकारी वकील मि. रामचंद्र त्रिंबक आचार्य यांस रावबहादूर असा किताब देण्याविषयीं सरकारांत शिफारस झाली असून तो किताब देण्याचा समारंभ लवकरच होणार असें ह्मणतात.

सुरतेच्या जज्जकोडतांत एक चमत्कारीक खटला चालला आहे. तेथील स्यानिटरी आफिसरची बायको हनन ही वादी असून तिचें ह्मणणें आहे कीं, मुसलमान जातीची १४।१५ वर्षांच्या वयाची जी अमुक मुलगी आहे. तिच्या धर्मसंबंधी व्यवस्थेचा अधिकार मला मिळावा. वादी ख्रिस्ती असून मुलीचे आईबाप कोणत्या धर्माचे होते याबद्दलचा पुरावा घेण्यावर खटला तहकूब आहे.

अ. ट.

मि० माधवराव मोरेश्वर कुंटे मुंबईहून पुण्यास जाऊन त्यांणीं तेथील हायस्कूल हेड मास्तरच्या जागयाचा चार्ज गेल्या शनवारीं घेतला.

निहिलिस्ट पक्षाचे लोकांनीं हल्लीं एक असा जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे कीं, रशियाचे बादशहाचा प्राणघात करण्याचा प्रयत्न आजपर्यंत निर्फळ झाला ही मोठी दुःखाची गोष्ट आहे, व बादशहानीं राज्य कारभार न सोडला तर अथवा रयतेस कायदे कानू न दिले तर त्याचा प्राणघात करण्याचा प्रयत्न फिरून होईल. ज्ञा. प्र.

कच्छ प्रांतांत फिरून राजे सर टी माधवराव हे ता. १६ रोजीं मुंबई एथें जाणार होते.

सर रिचर्ड टेंपल साहेब जातांनां आपलें स्मरण मुंबई एथील लोकांस रहावें ह्मणून स्पर्शजन्य रोगाच्या प्रतिबंधार्थ केलेला कायदा येत्या महिन्यापासून एथें चालू व्हावा व त्याची देखरेख पोलिस कमिशनर यांजकडे असावी अशी योजना त्यांनीं केली आहे. पैसा पुरविण्याची तजवीज तशीच मोघम ठेविली आहे.

रशिया सरकारानें अबदुल रहिमान यांस पुष्कळ पैसा व कांहीं सरदार लोक देऊन त्यास काबुलास खटपट करण्याकरितां पाठविलें आहे. शिवाय बोखाऱ्याचे खानानें ही पैसा पाठविल्याची खबर असल्याचें कळतें.

इंग्रज सरकारांनीं मेहेरबान होऊन माणिपूरचे महाराजास १००० बंदुका बक्षीस दिल्याचें कळतें.

इंडिया सरकारानें बेडफर्ड शायरचे बारोनेट यांचे बहिणीचा पत्ता लावला आहे. ही मोठी रूपवती असून गेलें १८५७ चे दंग्याचे वेळीं गमावली होती. ही मक्का एथें उघडकीस आल्याचें समजतें.

सेक्रेटरी आफ स्टेट यांनीं जनरल ब्रौन व राबर्टस यांस आफगाणिस्थानचे मोहिमेवर असले संबंधानें नेहमी ३५०० रु. आलौन्स देण्याचें ठरविलें आहे.

ऐरिश रिलिफ फंडास अमेरिकेंत ४०००० पौंड जमा झाल्याचें न्यूयार्क हेरल्डवरून समजतें.

इरिगेशन बिलाचे दुरुस्तीचें बिल ता. ८ चे कायदे कौन्सलमध्यें एकेच बैठकींत तीन वेळ वाचन होऊन पसार झालें.

न्यायाचा मासलाः— पब्लिक वर्क्स खात्याचे मिनिस्टरची जागा दुसरी कायमची नेमणूक होईपर्यंत मेजर जनरल ए. फ्रेजर इंडिया सरकारचे सेक्रेटरी यांस दिली. पूर्वीं ही जागा कमी करणार असा विचार होता, पण पुन्हा सरकारचा बेत कां फिरला हें कळत नाहीं. गरीब बिचारे लहान पगाराचे शेंकडो लोक कमी करून जात्यांस मोठी आशा दाखवून लोंबत ठेविले आहेत. आणि मोठ्या जागा रिकाम्या झाल्या असतां कायम ठेविल्या. ने. ओ.

अमळनेरचे सावकार रा. रा. हरी महादेव यांनी आपल्या मुलाची मुंज करून १५ दिवसांनीं लग्न केलें. मुलाचें वय ९ वर्षांचें आहे!

धुळ्याहून ६ लक्ष रुपये इंदुराकडे रवाना झाले.

प्रसिद्ध बाबू लालमोहन घोस हे गेल्या आठवड्यांत कलकत्याहून मुंबई येथें येऊन आगबोटींतून विलायतेस गेले व त्याच्या जाण्याचा उद्देश पार्लमेंटच्या सभासदांची निवड थोडक्याच दिवसांत व्हावयाची आहे त्यावेळीं या देशाविषयीं हकीकत कळवून उद्योग करावा असा आहे.

आह्मांस लिहिण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं, मि. नाना मोरोजी यांस आणखी एक वर्षपर्यंत माजिस्ट्रेटच्या हुद्यावर राहण्याची सरकारांतून परवानगी मिळाली.

मुंबई येथील कायदे कौन्सिलांतील माजी सीनियर सभासद आणि मुंबई युनिव्हर्सिटीचे व्हाइस चान्सलर मि० जेम्स गिब्स यांची हिंदुस्थान सरकारच्या कायदेकौन्सिलांत सर ए. जे. आर्बथनाट यांच्या जागीं नेमणूक करण्यांत आली.

मद्रास स्टांडर्ड पत्रास विजगापटम येथून एक पत्र आलें आहे त्यांत रंपा येथील दंगेखोरांचा नाईक चंद्या हा मेला नसून जिवंत आहे व तो मोठ्या टोळीचा प्रमुख असून लुटालूट करीत आहे असें लिहिलें आहे.

घोड्याच्या केसांची वकणी करून ती पिठांत कालवून तिच्या गोळ्या कराव्या आणि ज्या बिळांत उंदीर असतील त्यांत टाकाव्या. त्या त्यांनीं खाल्ल्या असतां ते मरतात. अनुभव पहावा.

कालपीपासुन कानपूरपर्यंत ४० मैलांची रेलवे लाईन बांधण्याचें ठरलें. या कामास १८ लाख रु. लागतील असा अंदाज आहे.

धारवाड डिपोंत आलेली तूट कोणाच्या बोकांडीस बसते याची आजवर शंकाच होती, पण ही तूट सरकारानें तोटाखातीं खर्च लिहून आपल्या आंगावर घेतली असें शाळाखात्याच्या वार्षिक रिपोर्टावरून समजतें.

प्रसिद्ध मोगलाईंतील तीन दरवडेखोरांपैकीं मुख्य तकाराम यास मौजे रामपूर ता. कोपरगांव व वैजापूर याचे दरम्यान ता.२ रोजीं नगरचे स्पे. पोलिसानें पकडलें आहे. यास पकडण्याकरितां १,१०० रु० चें बक्षीस लावण्यांत आलें होतें असें समजतें.

✓ कलकत्ता येथील ट्रेडूस असोशिएशन नांवाच्या मंडळीनें लायसेन्स ट्याक्स हा कर न बसविण्याविषयीं हिंदुस्थान सरकारास अर्ज केला होता; परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

---

## ✓ हिंदुस्थानदेशाची वास्तविक स्थिति.

आमच्या देशांतील लोक दिवसेंदिवस निर्धन होत चालले, जमीन निःसत्व होऊन चांगलें पीक येईनासें झालें, सरकारी करानीं व जुलमी कायद्यांनीं लोक असंतुष्ट आहेत. अशाविषयीं एतद्देशीय वर्तमानपत्रकर्ते वारंवार लिहितात; परंतु त्यांचें राजदरबारीं वजन नसल्यामुळें त्याचा कांहींच उपयोग होत नाहीं. इंग्लिश पत्रकर्त्यांमध्यें आमच्या देशाच्या संबंधानें कैवार घेऊन लिहिणारे कोणी नाहींत. बहुतेक विरुद्धच. असें पाहून पुष्कळ वर्षांपूर्वीं या शहरांत मि. राबर्ट नाईट यांनीं आमच्या देशाच्या तर्फेनें इंडियन स्टेट्समन या नावाचें पत्र चालू केलें. त्यास मिळावा तसा लोकाश्रय न मिळाल्यामुळें तें बंद होऊन त्याच गृहस्थानीं पुढें दुसरीं दोन पत्रें उत्तर हिंदुस्थानांत चालविलीं होतीं. आणि हल्लीं तेच गृहस्थ विलायतेस स्टेट्समन या नावाचें पत्र काढीत असतात. त्यांचा हेतु आमच्या देशाच्या संबंधानें विलायतेस व पार्लमेंट सभेंत जें औदासिन्य दिसून येतें तें घालवून या देशाच्या राज्यव्यवस्थेंतील अव्यवस्था व तिच्या योगानें प्रजेवर होत असलेला जुलूम त्यांच्या नजरेस आणून द्यावा असा आहे.

त्या पत्राच्या १२ व्या अंकांत (तारीख १४ फेब्रुवारी १८८०) सदर्हू पत्रकर्त्यांनीं, मि० आलनओ. ह्यूम यांनीं "Agricultural reform in India" या विषयावर एक पुस्तक विलायतेस नुकतेंच छापून प्रसिद्ध केलें आहे त्यांतून एक उतारा घेऊन वरील विषयावर निबंध लिहिला आहे. मि. ह्यूम यांनीं या देशांतील सरकारी खात्यांत मोठ्या हुद्याचीं कामें केलीं आहेत. सन १८५७ सालच्या बंडांत ते आपल्या शौर्यानें आणि राज्यकारभार संबंधी योग्यतेनें विशेष प्रसिद्धीस येऊन त्यांस सी. बी. ही पदवी मिळाली. यांनीं या देशांतील शेतकीकडे विशेष लक्ष्य देऊन त्याचा अगदीं अभ्यासच केला होता ह्मणून सुमारें १० वर्षां पूर्वी अग्रिकल्चर, रेविन्यु आणि कामर्स हें नवीन खातें उपस्थित करण्यासाठीं माजी अर्ल मेयो यांनीं या गृहस्थांची योजना केली होती. हें खातें अलीकडे सरकारानें बंद केलें. तें बंद होईतों पर्यंत मि. ह्यूम हे या खात्यावरील हिंदुस्थान सरकारचे सेक्रेटरी होते. यावरून या गृहस्थांनीं लिहिलें आहे तें, ज्यांस या देशाच्या खऱ्या स्थितीचें ज्ञान करून घेणें असेल त्यांनीं अवश्य वाचून पाहण्याजोगें आहे असें त्यांच्या निबंधांतील खालीं लिहिलेल्या उताऱ्याच्या तात्पर्यावरून लक्ष्यांत येईल.

“ लोकांवर थोडासा उपकार केला ह्मणजे पुरे किंवा ज्या गोष्टी आपल्या हिताच्या असें आपण समजतों त्यांस अनुसरून नाहींत अशा गोष्टी दुसऱ्यास हितावह होतील असें मानून चालावयाचें नाहीं. जमीनी संबंधानें आणि कायद्याच्या संबंधानें आह्मी ज्या सुधारणा ह्मणून केल्या त्यांमुळें लोकांमधील बंधनें नाहींशीं झालीं; शांतीच्या ठिकाणीं तंटे उपस्थित झाले, ज्या लोकांचा परस्परांशीं अगदीं संबंध ह्मणजे सावकार व शेतकरी, जमीनदारें व कुळें, आणि या देशांतील एकंदर प्रजा या परस्परांमध्यें विरोध उत्पन्न केला.

या देशांतील कित्येक सरकारी कामदारांचे वर्तन कितीहि दोषार्ह असले तरी, या देशाच्या संबंधानें इंग्रज सरकारचे हेतु व उद्देश शुद्ध आणि योग्य असतात ही गोष्ट या देशांतील शहाणे व जाणते असे सर्व लोक कबूल करितील; परंतु परोपकार बुद्धीनेंच इंग्लंडची स्थिति हुबेहुब हिंदुस्थानांत उतरावयाची अशा समजुतीनें हलक्या मनाच्या कामदारांच्या हातून जे दोष घडले आहेत त्यांबद्दल आपल्यास दोष लावणार नाहीं असा एकही गृहस्थ आढळणार नाहीं.

ज्या स्थितींत लोक पूर्वी होते ती स्थिति एकंदरीनें त्यांस सुखावह होती, त्यांस लोत्रास भोगावा लागला तो त्यांच्या स्थितींत अथवा देशरूढीनें त्यांस प्राप्त झालेल्या हक्कांत कांहीं दोष होते ह्मणून सोसावा लागला नाहीं, तर ते हक्क आपण नाकबूल केल्यामुळें आणि देशरूढीचें उल्लंघन केल्यामुळें सोसावा लागला हें कोणाच्याही लक्षांत आलें नाहीं.

लोकांस जमीनी संबंधी प्राप्त झालेल्या हक्काचा संबंध देशाच्या पूर्व इतिहासाशीं फार असतो ह्मणून सर्वांस सारखे हक्क न मिळतां भिन्न भिन्न प्रकारचे मिळाले आहेत. ह्मणून ते हक्क कायम राखणें हेंच या देशस्थितीस इष्ट आहे. देश स्थिति बदलत जाईल त्याप्रमाणें त्या हक्कांत फेरफार केला पाहिजे ही गोष्ट खरी परंतु तो फेरफार हळुहळू समजुतींत न येई अशा रीतीनें केला पाहिजे. तसें न करितां ते फेरफार जर एकदम सक्तीनें चालू केले तर तसें करण्यास कितीहि योग्य हेतु असले तरी त्यापासून अनिष्ट परिणाम घडून यावयाचे हेंही कोणाच्या लक्ष्यांत राहिलें नाहीं.

आमची कारकीर्द [illegible] प्रकारचे हक्क अतिशय [illegible] होते. ह्मणजे ऋणकोच्या ह्यातींत सुद्धा धनकोस त्याची जमीन जप्त करवत नसे. आह्मी हे हक्क जास्ती वाढविले खरे परंतु त्याविषयीं सुरक्षितपणा होता तो वारिसांच्या सल्यावाचून नाहींसा केला.

यामुळें प्रथम कांहीं मोठें नुकसान झालें नाहीं, कारण या फेरफाराकडे कोणाचें लक्षच गेलें नाहीं, त्यावेळेस कायदे जाणणारे लोक नव्हते. कोडतें थोडीं त्यांत न्याय होत असे तो नीतिशास्त्रास व सारासार विचारास अनुसरून होत असे आणि दिवाणी मुकदमे बहुतेक जुन्या वहिवाटीस अनुसरून लोक आपसांतच फैसल करीत असत.

परंतु कांहीं काळानें नवीन नवीन कायदे होत गेले, कोडतें वाढत जाऊन त्यांत हळुहळू कायदेशीर रीतीनें काम चालूं लागलें, त्यामुळें न्याय मिळण्यास फारच अडचणी उत्पन्न होऊन नीति व सारासार विचार याचें कोर्टांतून उत्पाटण झालें. वकीलांची विपुलता झाली. त्यांत वाईटांचा भरणा मोठा, पंचायतींकडून होत असलेल्या ठरावास मान मिळेनासा झाला. ज्या क्षुल्लक प्रकरणाचा गावांतल्या गावांत चार सभ्य गृहस्थांकडून एका तासांत योग्य निकाल होत असे अशा प्रकरणाचा निकाल करून घेण्यासाठीं लोकांस आतां आपलीं घरें दारें संसार महिनोमहिने किंवा वर्षोंवर्षे सोडून देऊन एका कोडतांतून दुसऱ्यांत, दुसऱ्यांतून तिसऱ्यांत तंगड्या तोडीत फिरावें लागतें. व प्रत्येक ठिकाणीं नवे वकील, कारकून वगैरे लोकांस फी ह्मणून, बक्षीस ह्मणून, अनेक रीतीनें जवळचे पैसे सरल्यास, असेल नसेल तें गहाण टाकून देऊनही त्यांत यश मिळतेंच असा नियम नाहीं.

अपयश आलें ह्मणजे बिचाऱ्याच्या फजितीस पारावारच नाहींसा होतो. त्याची सर्व मालमत्ता जप्त होते. आणि जेव्हां सावकार त्याची मालमत्ता ताब्यांत घेण्यासाठीं येतो त्यावेळेस त्याचे देहभान नाहींसें होऊन सोटा घेऊन त्याच्या अंगावर चालून जातो त्यावेळेस उभयतांमध्यें बरीच चकमक झडून, इंग्रज सरकारच्या औदार्यानें व परोपकार बुद्धीनें उत्पन्न केलेल्या या भयंकर नाटकाची समाप्ति होते.”

यावरून मि. ह्यूम यांस या देशाच्या स्थितीविषयीं किती बारीक माहिती आहे हें सांगणें नको आणि मि. राबर्ट नाईट यांचे प्रयत्नानें मि. ह्यूम सारखे लोक आमच्या देशाच्या संबंधानें प्रसिद्धपणें लिहूं लागले आहेत हें खरोखर सुचिन्ह होय. पु. प.

---

हें पत्र अकोलें येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत [illegible] फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.